This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
हस्तलिखित संग्रह
1374
दाखल क्र M1474 विषय अद्वैतवेदान्त
नाव. श्री ब्रह्मसूत्र चतुःसूत्री भाष्य व्याख्यान (मराठी)
लेखक/लिपीकार प्रेसकॉपी भाग २ श्री धुं. धर्माधिकारी Ms.
पृष्ठ 174 काळ इ.स. 1968 पूर्ण/अपूर्ण

प्रेसकॉपी

॥ श्री ॥

ब्रह्मसूत्र चतुःसूत्री भाष्य व्याख्यान

सविवरण व भाषा व्याख्यानासह

प्रथमवर्णक

भाग २

पृ. १६० ते ३३३

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

M 1374
H/12107

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

लोकव्यवहार मिथ्या अज्ञान निमित्त (=नैमित्तिक) स्वरूपा जातो. आगन्तुकत्वानें तरि नव्हे. त्यानें नैसर्गिकत्व नैमित्तिकत्वाशीं विरुद्ध येत नाहीं.

आत्मा चैतन्यैकरस असला तरी त्यांत अज्ञानकल्पितच सामान्यविशेषभावही संभवतात. त्यामुळेंच त्याचे स्फुरणरूपानें सामान्य ज्ञान असून विशेष ज्ञान नाहीं. तसेंच अध्यास दाखविला असल्यामुळेंच आत्मानात्मे प्रत्यक् परागादिरूपानें पृथक् उपलब्ध होत.

॥ विवरण ॥

अभिव्यक्ति होत असल्यामुळें असा 'म्हणून' शब्दाचा अर्थ.

पूर्वी पूर्वपक्षांत आत्मानात्म्यांच्या अध्यासाविषयीं पूर्वज्ञानसंस्कार, सादृश्य, सामान्य अंशाचे ज्ञान होऊन विशेष अंशाचे अज्ञान किंवा विवेकाग्रह या सामग्रीचा अभाव असल्यामुळें अध्यास संभवत नाहीं, असा जो आक्षेप घेतला होता; त्यांत 'नैसर्गिक' पदानें पूर्वज्ञानसंस्कार व 'तथापि' शब्दानें वस्तुमात्र सादृश्यादि दाखविलें. सांप्रत आत्म्यांत सामान्यविशेषभाव व अविवेकाग्रह दाखवितात - 'आत्मा चैतन्यैकरस', 'अज्ञानकल्पितच' - कारण साक्षी स्वरूपाच्या ठिकाणीं आवरण नसल्यामुळें त्याचें सामान्य ज्ञान असून पूर्णानंद स्वरूपाचे ठिकाणीं आवरण असल्यामुळें त्याचें विशेष ज्ञान नाहीं. म्हणून त्यांत अज्ञानकल्पित सामान्यविशेषभाव आहेत असा अर्थ. भाष्यांत अध्यासात्मक लोकव्यवहाराला अज्ञान निमित्त (=उपादान) दाखविलें असल्यामुळें तेंच सामान्यविशेषभावाला ही निमित्त दाखविलें असा 'च'काराचा अर्थ. "अध्यास दाखविला असल्यामुळेंच" = अपरोक्ष अध्यास मौक्तिक मध्यानें

॥ विवरणव्याख्यान ॥

नैसर्गिक पदानें

'आत्मा' इत्यादि ग्रंथाचें निमित्त दाखवितात - 'पूर्वी', 'पूर्वज्ञानसंस्कार' - पूर्व प्रमज्ञान संस्कार 'सादृश्यादि' येथील आदि शब्दानें कारणान्तर अज्ञान दाखविलें. 'आवरण नसल्यामुळें' = कारण साक्षी अज्ञानाचा साधक असल्यामुळें त्याचे ठिकाणीं अज्ञानकृत आवरण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

५।१८
नसल्यामुळे त्यांच्या विवेकाचे अग्रहणही सिद्ध होते. अशारितीने अहंकर्तृत्व प्रमुख क्रियाकारक फलात्मक लोकव्यवहार नित्य शुद्ध बुद्ध मुक्त स्वभाव आत्म्यांत अध्यस्त आहे. म्हणून तशा प्रकारच्या ब्रह्मात्मानुभव पर्यंत ज्ञानापासून अनर्थहेतु अध्यासाची निवृत्ति उपपन्न होते. त्यामुळें अनर्थनिवृत्ति व ब्रह्मात्मा जाणणे विषय व प्रयोजन आहेत अशा वेदान्त मीमांसा शास्त्राच्या प्रारंभ उपपन्न होतो, असा भाव. ५२।५३

॥ विवरण ॥

निरसित्त होत नाही, असा अर्थ. अज्ञान साधनपूर्वक विरोध परिहार करुन व्याख्यानाकरिता अध्यास सिद्ध केल्यावर प्रकृत फलाच्या अध्यासानुवादपूर्वक उपसंहार करितात.- 'अशारीतीने' दृष्ट्यांत दृश्याच्या व्यासाळा अविद्याध्यास्त असतां शास्त्रीय विषयप्रयोजनांची सिद्धि फलाळा प्राप्त होते असें सांगतात.- 'म्हणून तशा प्रकारच्या' तशा प्रकारच्या ब्रह्मात्मानुभव व बंधनिवृत्ति उपपन्न होते असा अर्थ. विषयप्रयोजनांची सिद्धि झाळी असतां काय प्राप्त झाले? त्यावर शास्त्रारंभ कर्तव्यता सिद्ध होते असें सांगतात.- 'त्यामुळे अनर्थनिवृत्ति'
७७।१४

॥ विवरणव्याख्यान ॥

नाही, असा अर्थ. 'विरोध परिहार करुन'- नैसर्गिक व्यवहाराला नैमित्तिकत्व असणे या विरोधाचा परिहार असा अर्थ. प्रयोजनाचाच उपसंहार केला असल्यामुळे विषयाला अविवक्षितत्व आहे? अशी आशंका असतां उपलक्षण परतेनें व्याख्यान करितात- 'तशा प्रकारच्या' नित्य शुद्ध बुद्ध मुक्त स्वभाव लक्षण वस्तु 'तशा प्रकारच्या' शब्दाचा अर्थ. 'ब्रह्मात्मानुभव'- ब्रह्मात्म्याचा अनुभव- चैतन्य स्वरुप तो ब्रह्मात्मानुभव असा अर्थ. ८५।२१

८५।२८
पण शास्त्रारंभ सिद्ध झाला असल्यामुळें 'अथशब्द आनंतर्यार्थी आहे' इत्यादि शब्द व्याख्यान करावयास पाहिजे होते. 'आहकोऽयम्' इत्यादि भाष्याचा काय उपयोग? अशा शंकेच्या निवृत्ति करिता 'आहकोऽयमध्यासोनाम' इत्यादि असें म्हटले. येथें आदि शब्दानें 'अस्मत्प्रत्यय होतो' हे भाष्य देखील ग्रहण केलें आहे अशा शंकेच्या निवारणा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥
(~~येथून~~ ('सर्व लोक प्रत्यक्षः' येथपर्यंत)

५।२३ 'आह कोऽयमध्यासो नाम' इत्यादि ~~(आरम्भकरून)~~ अध्यासाच्या सिद्धिपर भाष्य आहे. त्यांतही 'आह कोऽयं' येथून 'सिद्धैव बुद्धिरिति' येथपर्यंत लक्षणानें अध्यासाच्या स्वरूपपर भाष्य असून 'कथं पुनः प्रत्यगात्मनि' येथून 'मोक्षपराणि' येथपर्यंत त्याच्या संभावनापर भाष्य आहे. व 'कथं पुनः अविद्यावद्विषयाणि' येथून 'सर्व लोकप्रत्यक्षः' येथपर्यंत त्याच्या सद्भावाच्या निर्णय करण्याकरितां प्रमाणपर भाष्य आहे असा विभाग आहे. पण असें आहे तरी त्याचें स्वरूप व त्याच्या संभावनेच्या पृथक् उपन्यास करण्याची आवश्यकता नाहीं.

॥ विवरण ॥

१८।१९ 'सर्वलोकप्रत्यक्षः' येथपर्यंतच्या पुढील भाष्याचें तात्पर्य सांगतात - 'आह कोऽयम्' आसा विभाग-करून अवान्तर तात्पर्य दाखवितात - 'त्यांतही'. लक्षण संभावनापर भाष्यावर आक्षेप घेतो - 'पण असें आहे तरी'.

॥ विवरणव्याख्यान ॥

कशी तें सांगतात - सर्वलोकप्रत्यक्षः; 'आह कोऽयम्' इत्यादिकाळा अध्यासपरत्व असतां एका भाष्यानें अध्यासाची सिद्धि होत असल्यामुळें बहु भाष्याचें काय? अशी आशंका असतां अध्यासाच्या लक्षणादिपरत्वामुळें त्यांना वैयर्थ्य नाहीं. असें 'त्यांतही' येथें सांगितलें तें अनुपपन्न आहे. कारण अध्यासपरत्व व लक्षणादिपरत्व एकच आहे? किंवा नाना? पहिल्या पक्षीं उत्तरभाष्याला वैयर्थ्य येतें, दुसऱ्या पक्षीं परस्पर व्याहति होते. कारण एकाला उभयपरत्वाची अनुपपत्ति आहे! अशी आशंका असतां सांगतात - 'आतां विभागकरून'. लक्षणादिकांनें अध्यासाचें प्रतिपादन करावयाचें असल्यामुळें लक्षणादिकांत अवान्तर तात्पर्य असून अध्यासांत महातात्पर्य आहे. म्हणून व्याहति नाहीं असा अर्थः पण दुसरीकडून सिद्ध अध्यासाचें उपस्थापकत्व असतांही जसें 'तथाऽपि' इत्यादि भाष्याला अर्थवत्त्व आहे तसें लक्षणादि भाष्याला हि आहे!, अशी आशंका असतां सांगतो - 'लक्षणसंभावना'. 'तथापि' इत्यादिकाळा
(तरहा 'असें आहे तरी' यानें लक्षणभाष्यावर आक्षेप करतात.)

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ।

कारण ज्याच्या प्रमाणानें निर्णय होतो ते अनिर्ज्ञातस्वरूप व असंभाव्यमान नसतें. विशेष-
करून होणाऱ्या प्रत्यक्षानुभवनिर्णयांत तसें हें दुःसंपादनीय आहे? सांगतो - देहेन्द्रिया-

(शंका - प्रमाणप्रभाष्य असल्यामुळें असा अर्थ) विवरण ।

१ पण लक्षण व संभावनेची अपेक्षा काय म्हणून नाहीं? त्यावर सांगतो - 'कारण ज्याच्या' प्रमाणाच्या तर दुसऱ्या-
च्या दुसऱ्या रूपानें अवभास या अध्यासप्रमेयाला व्यवस्थापन करीत स्वदेशकाल उपाधींत संघटित रूपाला
व सर्वांकडून व्यावृत्त (= पृथक्) कारण स्वभावाला व्यवस्थापित करितें. पृथक् लक्षण व संभावनेच्या उप-
न्यासानें काय उपयोगी असा अर्थ. पण अनुमानादि प्रमाणांनीं निर्ज्ञात वस्तुमात्रांत विशेष लक्षण व संभा-
वनेची अपेक्षा असते? त्यावर सांगतो - 'विशेषकरून होणाऱ्या', असाधारण आकारानें व्यावृत्तीनें होणाऱ्या.

॥ विवरणव्याख्यान ॥

अध्यासानुवादानें विषयादिपरत्वामुळें अर्थवत्त्व आहे तसें याला लक्षणादिपरत्वामुळें नाहीं वेदें उक्त होत नाहीं, कारण
दुसरीकडून लक्षणादिकाची सिद्धि होते असा अर्थ. पण प्रमाण भाष्याला असंभावित = (= ज्याच्या विषयीं असंभावना के-
लेली जात नाहीं) व असंकीर्ण (= निश्चित) ज्ञानजनकत्वाच्या अभावामुळें लक्षणादि व्यर्थ नाहीं? अशी शंका घेतात - 'पण ल-
क्षणसंभावनेची'. प्रमाणाला अर्थाच्या संभावनादि ज्ञानजननामुळें त्यांना वैयर्थ्य आहे, असें सांगतो - 'त्यावर सांगतो'. भाष्य
स्पष्ट करितो - 'प्रमाणान्तर'. 'स्वदेशकाल उपाधींत' = व्यवस्थापन करतें. पण प्रमाणानें सिद्ध असतांही संभावनादिका-
ची पृथक् अपेक्षा दिसत असल्यामुळें लक्षणादि अर्थवत् आहेत? अशी शंका घेतात - 'पण अनुमानादि'. प्रत्यक्ष कार्य
लिङ्ग वरून कारणमात्राची प्रतिपत्ति असता त्याच्या विशेष ब्रह्म परमाणु आदिकांत जसे लक्षणादि अर्थवत् दृष्ट आहेत तसें येथे
असा अर्थ. पण प्रत्यक्ष दृष्ट ह्या पृथिव्यादिकांत लक्षणादिकांची अपेक्षा दिसत असल्यामुळें 'विशेषकरून होणाऱ्या प्रत्यक्षा-
नुभव निर्णयांत हें दुःसंपादनीय आहे' असें कसें ठरलें? त्यावर सांगतो - 'असाधारण' - सामान्य करून दृष्टांत लक्षणा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

दिकांत अहं ममाभिमान वानांकाच प्रमातृत्व प्रदर्शनमात्रानें त्याची अध्यासात्मकता सि-
द्ध होत नाहीं. तीं कोणाहेतूनें? लोकांत शुक्तिरजत हिंचंद्रादिकाप्रमाणे येथें अध्यासाच्या
अनुभवाचा अभाव असल्यामुळें. कारण, बाध असतां तो असतो; येथें तर तो नाहीं. म्हणून

॥ विवरण ॥

असा अर्थ. तेथें अन्य द्रष्टयाच्या अन्य दृश्यरूपानें अवभास आहे. एवढ्यांत प्रमाण सांगणार आहेत. त्याच्या अवि-
द्या, भ्रान्ति, अध्यास, मिथ्यात्वा विषयीं नाहीं. म्हणून ते (अविद्यादि) प्रमाणानें सिद्ध होत नाहीं. असा परिहार करि-
तात- 'सांगतां, देहेन्द्रियादिकांत.' पण दुसऱ्याचा दुसऱ्यारूपानें अवभासाच्या प्रमाणानेंच त्याची मिथ्यात्वही प्रम-
ाणाच्या ऐक्यामुळें सिद्ध होते? अशी शंका देतात- 'तीं कोणा हेतूनें?' अनुभव येत नसल्यामुळें, असा परिहार करतात-
'लोकांत शुक्तिरजत.' पण प्रमाण असतां अनुभवाचा अभाव काय म्हणून? प्रमाणभेदामुळें असें सांगतात- 'कारण बाध
असतां.' बाधाची अनुपपत्ति मिथ्यात्वाविषयीं प्रमाण आहे. व (येथें) प्रत्यक्ष अनुमान व अर्थापत्तीची अनुपपत्ति व आगम.

॥ विवरणव्याख्यान ॥

दिकांची अपेक्षा असतांही असाधारणाकारानें पाहिल्यानें दृष्टांत दुसऱ्याची अपेक्षा नसते, असा अर्थ. पण प्रमाणभाष्यानें अहं-
ममाभिमानच सिद्ध होतो अध्यास नाहीं? असें कसें म्हटले? कारण त्यांत ऐक्य आहे अशी आशंका असतां समुदायाचें
तात्पर्य सांगतात. 'तेथें = प्रमाणभाष्यांत.' ज्ञानानें निरास तत्त्व = अवबाधत्व, प्रतिभासमात्र शरीरत्व = भ्रान्तता, सत्यानृत
मिथुनीकरणात्मकत्व = अध्यासत्व, सदसद्विलक्षणत्व = मिथ्यात्व. सिद्धान्तीं या आशयाला न जाणणारा शंका घेतो-
'पण दुसऱ्याचा दुसऱ्यारूपानें.' गूढाभिसंधीनें परिहार करितात- 'अनुभवे येत नसल्यामुळें.' पण प्रमाण असतांही अ-
नुभव नाहीं हें व्याहत आहे? अशी शंका घेतो- 'पण प्रमाण असतां.' मिथ्यात्वाविषयीं प्रमाणान्तर नाहीं असा आशय स्पष्ट
करितात- 'प्रमाणभेदामुळे.' पण बाध असतां अध्यासानुभव होतो हें कसें? कारण त्याला अध्यासानें निवर्तक उक्त आहे? अशी आ-
शंका असतां सांगतात- 'बाधाची अनुपपत्ति.' सत्यत्व असतां आत्म्याप्रमाणे बाधाच्या अनुपपत्तीमुळें मिथ्यात्व आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अध्यासाचें लक्षण सांगून त्या लक्षणानें व्याप्तांच्या सद्भाव प्रमाणानें कथनीय आहे. पण असे

॥ विवरण ॥

आल्यांत अनात्म्याच्या अवभासाविषयीं प्रमाण ओसरत असा भाव. पण येथें हीं बाधाच्या निमित्तानें इतराच्या इतराहून विवेकावांचून ह्या दुसऱ्याच्या दुसऱ्यारूपानें अवभास आहे असें म्हणणें शक्य नाही. अन्यथा हा स्वतःच्या स्वतःरूपानें अवभास कां असणार नाही? यावर नाहीं असें सांगतात– 'येथें अंतरतो नाहीं'? यौक्तिक ज्ञानादिकां नें परोक्ष विवेकाच्या आश्रय करून परस्परात्मतेचा अवभासाचा निश्चय होतो. परंतु भ्रान्तीच्या प्रतिभासाचा उच्छेदकरणाच्या अपरोक्ष बोधाच्या अभावामुळें स्पष्ट मिथ्यात्वाचा निश्चय होत नाहीं. म्हणून अविद्यात्वाच्या स्पष्टीकरणाकरितां लक्षण सांगितलें पाहिजे असें सांगतात– 'म्हणून अध्यासाचे' पण मग लक्षण प्रमाणांच्या

॥ विवरणव्याख्यान ॥

असा अर्थ. 'मी मनुष्य आहे' इत्यादि प्रत्यक्ष प्रत्यक्ष शब्दाचा अर्थ. 'निमित्त मनुष्यत्वादि व्यवहार अध्यास निबंधन आहे. त्याला व्यवहारत्व असल्यामुळें पश्वादिकांच्या व्यवहारा प्रमाणें' असें अनुमान 'अनुमान' शब्दाचा अर्थ. प्रमाणत्वादि व्यवहार 'व्यवहार' शब्दाचा अर्थ. 'अष्टवर्षं ब्राह्मणमुपनयीत' इत्यादि आगम. पण आत्म्यांत अनात्म्याच्या अवभास दाखविणारे प्रमाण बाध पुरस्कारानें प्रवृत्त होत असल्यामुळें मिथ्यात्वाकरितां दुसऱ्या प्रमाणाची अपेक्षा नाही. अशी बाधा घेतो 'पणसर्वथेही:', दुसऱ्याच्या दुसऱ्यारूपानें प्रतिपत्तीस बाधानें विवेकाच्या प्रतिपत्तीची अनुपपत्तीमुळें अपेक्षा नाहीं. अशी आशंका असतां उपयोग सांगतो– 'अन्यथा' पण बाधाच्या अभाव असतां इतरेतरांच्या विवेक कळत नसल्यामुळें इतरेतरांच्या अवभासच सिद्ध होणार नाहीं असें सांगितलें त्याचें समाधान आहे. अशी आशंका असतां सांगतात– 'यौक्तिक ज्ञानादिकानें' पण त्यानेंच मिथ्यात्व सिद्ध होत असल्यामुळें प्रमाणान्तर व्यर्थ आहे. असें शंका घेता येणार नाहीं कारण अपरोक्ष भ्रमाची अपरोक्ष प्रत्ययावांचून निवृत्ति होत नाहीं अशा आशयानें सांगतात– 'परंतु' पण बाधक प्रत्ययावांचून मिथ्यात्वाची असिद्धि आहे तर तो संपादन करणारी लक्षणें कोणती ह्यावर सांगतात– 'म्हणून अविद्यावान्या'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

असतांही त्या लक्षणानें व्याप्त वस्तूच्या सद्भावमात्रयेथें कथनीय आहे. कारण जेथें जिचा सद्भाव प्रमाणावरून प्रतिपन्न होतो. तेथेंच तिच्या असंभावनेची शंका नसते कीं जिने तिच्या निवृत्तीकरितां तिची पृथक् संभावना केली जावी. असें खरें आहे परंतु विषयविशेषानंतर प्रयत्नानें शोध करणाऱ्याकडूनही कारणांत दोष उपलब्ध होत नसणाऱ्या विज्ञानांत अवभास मान असतांही पूर्वप्रवृत्त सकललोकव्यापी निश्चित प्रमाणानें असंभाव्यमानतेनें निराकृत होत असल्याचें दिसतें. जसें सूर्यांत दिसणारे उत्पातसूचक छिद्र, किंवा मोहेन्द्रजालकु-

॥ विवरण ॥

योगानें च निर्णय- वस्तुसिद्धि होत असल्यामुळें प्रमाणानेंच असंभावनेचें निराकरण होतें म्हणून संभावना पृथक् सांगण्यास योग्य नाहीं अशी शंका घेतात- 'पण असें असतांही.' प्रमाणसामर्थ्यानें असतांही प्रत्यक्ष असलेला अवभास ही असंभाव्यमानतेनें निराकृत होत असल्याचा अनुभव येतो. अशा अनुभवाचा अवलंबन करून परिहार करितात. 'असें खरें आहे.' 'उत्पातसूचक'- [पुढें येणारें जें अनिष्ट तो उत्पात त्याला सूचक] अदृष्टव्यतिरिक्त-

॥ विवरणव्याख्यान ॥

प्रमाणमात्रानें पुरेसें होत नाहीं परंतु लक्षणही सांगितलें पाहिजे म्हणून अध्यासाचें लक्षण सांगितलें असतां स्वलक्षणानें व्याप्तत्वामुळें अहंममाभिमानही अध्यास आहे असें सिद्ध होऊन बाधक प्रत्यय सिद्ध होईल. अशा रीतीनें त्याच्या उपयोगितेनें लक्षण सांगितलें जातें असा अर्थ. लक्षणाचा अंगीकार करून संभावनेकरितां आक्षेप घेतात- 'पण मग लक्षणप्रमाणा-च्या योगानें.' संभावनेवाचून निर्णयाच्या असिद्धीमुळें तीही सांगितली पाहिजे अशी आशंका असतां सांगतो- 'प्रमाणानेंच असंभावनेचें.' प्रामाणिकत्व तरी असंभावनेचें निरास करण्याचें सांगितलें असतें कसें? कारण असंभावितत्व असतां प्रामाणिकत्वाची अनुपपत्ति येते? किंवा प्रामाणिकत्व असतां असंभावितत्वाचा अभाव असतो? अशी आशंका असतां दोन्ही नाहीं असें अनुभव येतो असा परिहार करितात- 'प्रमाणसामर्थ्य असतांही.' पण नीरंध्र सूर्यांत निर्दुष्ट करणाऱ्या रश्मीच्या न

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दृष्टयाचा प्रामाणिकत्व असंभावितत्वाचा

॥ व्याख्यान ॥

शक्लाकडून प्रासादादिकांचे निगरण. याप्रमाणें अविषय असंग कोणराही अध्यासाच्या

॥ विवरण ॥

१९।१५
कारण शून्य असा अर्थ. पण प्रमाणानेंच क्वचित् असंभावना तिरस्कृत केली जाते जसें पक्ष्यांच्या आकाशगमनास. क्वचित असंभावनेनें अपरोक्षही प्रतिभास निरसित केला जातो जसें सूर्यातील छिद्रादिकांत. त्यांत आत्म्याविषयीं अ-

१९।२१
ध्यासाविषयीं कोणत्या पक्षाला अवलंबन करितो? अशी आशंका असतां दुसऱ्या असंभावना पक्षाचाच असा विशेष

दाखवितात - 'याप्रमाणें'. अधिष्ठानाला अध्यस्यमानाशीं सह (ज्ञान) एकविषयत्व सांगितलें पाहिजे. त्याच्या अभा-

वामुळें अध्यासाचा संभव नाहीं असें सांगतात - 'अविषय'. द्रव्याहून अतिरिक्त सर्व कार्यकारण संघाताच्या अ-

ध्यासाला कारणत्वानें द्रष्ट्यास्य काचादिकाप्रमाणें दोष सांगितला पाहिजे त्याच्या अभावामुळें अध्यासाचा संभव नाहीं

असें सांगतात - 'असंग'. अधिष्ठानाचा अध्यस्यमानाशीं गुणावयव सादृश्य सांगितलें पाहिजे त्याच्या अभावामुळें

॥ विवरणव्याख्यान ॥

प्रत्यक्षादि प्रतिभासकमात? अशी आशंका असतां अदृष्टवशामुळें असें सांगतात - 'अदृष्टव्यतिरिक्तकारणशून्य'. पण असंभावनेनें प्रामाणि-

कत्वाच्याही निरासाप्रमाणें (प्रमाणानें) असंभावनाही निरसित होते असें पहाण्यास दिसते. त्याप्रमाणें येथें कां होऊं नये? अशी शंका घेतां - 'पण प्र-

माणानें'. असंभावनेच्या हेतुत्वामुळें असंभावनेनें (येथें) प्रामाणिकत्वाचाही निरास युक्त आहे असें सांगतात - 'असंभावनापक्षाचाच'

८१।३
'अविषय' येथें (प्रमाण) विषयशून्यत्व सुचविलें जातें किंवा (सर्वथा) विषयत्वरहितत्व? पहिला पक्ष मानला कारण त्याविषयीं

शब्दादिकांचा अभाव आहे. दुसरा पक्ष नाहीं कारण त्याला अस्मत्प्रत्ययाविषयत्व आहे? अशी आशंका असतां सांगतात - 'आध्या-

सिकाला'. पण अविद्यादिकाशीं संगित्वामुळें असंगित्व असिद्ध आहे? अशी आशंका असतां सांगतात - 'द्रव्याहून'. अ-

ध्यासाला निमित्त अशा आनंदादि स्वरूपाच्या व गुणांचा अंगीकार असल्यामुळें 'कोणताही' इत्यादि अनुपपन्न आहे. अशी आ-

शंका असतां सांगतात - 'अधिष्ठानाला'. पण त्याच्या अधिष्ठानत्वामुळें तन्मात्र ज्ञान इदमाकार ज्ञानाप्रमाणें आरोपाच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

फ्र "पूर्वी सांगितले" — 'कारण ज्ञान अज्ञानाचेच निवर्तक आहे.' येथें असा अर्थ. [पृ: पं.]

॥ व्याख्यान ॥

हेतुभूत गुणादिकांनी रहित निष्कलंक चैतन्य तेंनें अन्यगत ही अध्यासाच्या निरसनाला समर्थ असल्यामुळे अध्यास व त्याचे ज्ञान ज्याच्या कारणांतील दोष कळत नाहीं असा विभ्रम आहे. अशी शंका येईल म्हणून ती येऊ नये याकरितां सद्भाव प्रमाणाहून संभव-ही पृथक् सांगितला पाहिजे. म्हणून ते (तीन्ही) सांगितले जातात —

॥ विवरण ॥

अध्यासाचा संभव नाहीं असें सांगतात 'कोणताही अध्यासाच्या हेतुभूत गुणादिकांनी रहित'. अधिष्ठानाच्या यथार्थत्याचा अवधारण अध्यासाच्या विरोधी आहे त्याच्या भावामुळें अध्यासाचा संभव नाही असें सांगतात 'निष्कलंक चैतन्यैकतानत्वें'. पण अविषयादि रूप आत्मा कळला नसतां असंभावना बुद्धि होत नाहीं क-ळला असतां तर अध्यासच रहात नाहीं. तेव्हां असंभावना बुद्धि कोठून? यांत सार नाहीं कारण अविषयादि-रूप आत्म्यांत परोक्षावभास असंभावना बुद्धीला हेतु आहे व अपरोक्षावभास अध्यासाला निवर्तक आहे असें पूर्वी सांगितलेंच उपसंहार करितात- 'म्हणून ती येऊं नये'. 'ते सांगितले जातात'- ते तीन्ही लक्षण संभावना +

॥ विवरणव्याख्यान ॥

विरोधी नाहीं अशी शंका असतां सांगतात- "अधिष्ठानाच्या". दृष्टान्तांत सामान्य विशेष भावानें भेद असल्यामुळे सामान्य ज्ञान अविरो-धि आहे तर विशेष ज्ञान विरोधि आहे. तसें येथें सामान्यादि भेदाभावामुळें नाहीं असा अर्थ. काय अविषयादि रूप आत्मा कळला नसतां असंभावना बुद्धि होते? किंवा कळला असतां? असा विकल्प करून दोन्ही प्रकारांनी असंभव आहे असें सांगतो- 'पण अविषयादिरूप'. हुस्न्यावक्षाला ग्रहण करून उत्तर सांगतात- 'यांत सार नाहीं'. 'कळला असतां अध्यासच रहात नाहीं' असें जे म्हटले ते विकल्पनीय आहे- काय अविषयादि रूप आत्मा परोक्षत्वानें कळला असतां अध्यासाची निवृत्ति होते? किंवा अपरोक्षतेनें? पहिल्यांत अनिवृत्तीमुळे अनुपपत्ति नाहीं असें सांगतात- 'अविषयादिरूप आत्म्यांत'. परोक्षतेनें अवभा-सा(?) अध्यासाच्या अविरोधित्वामुळे अध्यासाचें निवर्तकत्व नाहीं; यामुळें असंभावना बुद्धि होते असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचा अंगीकार केल्यानंतर असें सांगतात- 'अपरोक्षावभास'. 'ते तीन्ही' लक्षणादिकांत अन्यतमावांत वैयर्थ्य

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आह कोऽयमध्यासो नामेति। उच्यते - स्मृतिरूपः परत्र पूर्वदृष्टावभासः।

॥ व्याख्यान ॥

'आह' = प्रतिवादी विचारतो. 'अयम्' = हा पुढें सांगितलेला. 'अध्यासो नाम' = अध्यास नामक. 'कः' = कोणत्या स्वरूपाचा आहे व कसा संभवतो? 'इति' = असें. 'असें' शब्द प्रश्नादिकाच्या समाप्तीकरितां आहे. 'किम्' शब्दाचा त्याच्यापुढें असलेल्या विषयाच्या प्रश्नांत व आक्षेपांत प्रयोग

६१७८

दिसत असल्यामुळें व दोन्हींचाही येथें संभव असल्यामुळें सिद्धान्ती हें वाक्य उच्चारितो आहे. त्यां-

॥ विवरण ॥

व प्रमाण क्रमानें सांगितले जातात असा अर्थ.

२.प्र. १०१२

अशारीतीनें सूत्रानें सामर्थ्यावरून सूचित केलेल्या विषय व प्रयोजनांचें प्रतिपादन करून त्यांचे हेतु असा अध्यासाचा लक्षण संभावना प्रमाणांच्या योगानें साधण्याकरितां. लक्षणाला विचारतो असें सांगतात - 'प्रति-

त.टी. १०१३

२०१४

वादी विचारतो.' 'आह' इत्यादि भाष्याचें तात्पर्य स्पष्ट करितात - 'किं शब्दाचा' पण 'किं' शब्दाचा आक्षेपांत व प्रश्नांत प्रयोग दिसत असला तरी तो कोणत्या अर्थांत आहे हें कळत नाहीं? त्यावर सांगतात - 'व दोन्हींचाही' =

१०१५

= लक्षणाच्या प्रश्नाचा व संभावनेच्या आक्षेपाचा असा अर्थ. पण दोन्ही अर्थांत प्रयोग असतांही एका वाक्यांत एका शब्दाला उभयार्थत्व नसतें. जसें 'गो' शब्दाचा अनेक अर्थांत प्रयोग होत असतांही एका वाक्यप्रयोगांत एकार्थ-

॥ विवरणव्याख्यान ॥

१०१७

असल्यामुळें लक्षणादि तीन्ही असा अर्थ. पण स्मृतिरूप येथें लक्षणच सांगितलें आहे इतर नाहीं? त्यावर सांगतात 'क्रमानें' पुढील व्याख्यानाला अनुसरून करण्याकरितां मागील निष्कर्ष सांगतात - 'अशारीतीनें', 'प्रतिपादन करून' = आक्षेप समाधान जाणण्यानें असा अर्थ. 'लक्षणाला विचारतो' = प्रतिवादी लक्षणाला विचारतो असा संबंध. प्रतिवाद्याला उत्थापन करवि-तात असा अर्थ. प्रश्न व आक्षेपाच्या विषयाला दाखवितात - 'लक्षणाच्या' अध्यास असें स्मरले असतां सामान्यज्ञानामुळे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

म्हणे प्रथम प्रश्नाचे प्रतिवचन (लक्षणाने) स्वरूप सांगून पुनः त्याच्याच आत्म्यात स-

॥ विवरण ॥

नियम आहे? अशी आशंका असतां सांगतात - 'तत्रानें' - एककाली अर्थद्वयाच्या विवक्षेनें असा अर्थ. पण दोन्ही जर येथें विवक्षित आहेत तर संभावनाच प्रथम कां दाखविली जात नाहीं? त्यावर सांगतात - 'त्यांत ही प्रथम'. 'स्वरूप सांगून' हा प्राथम्यांत हेतु आहे. पण स्वरूपविषयत्वाने प्रश्नोत्तराचा प्राथम्य आहे तर हा आक्षेप दुःस्थ (= दुःखाने स्थित) आहे असें उत्तर कां दिले नाहीं? अशी आशंका असतां असें म्हटलें असतां श्रोत्याला कुंठित-मति होऊन प्रतिवचनाच्या अर्थाची प्रतिपत्ति होणार नाहीं अशा अभिप्रायानें 'प्रश्नाचे प्रतिवचन' असें म्हटलें.

२०।१३

पण आहे असें दुसऱ्याच्या उक्तीचें कथन कशाकरितां? अर्थनिर्णय प्रधानत्वामुळें हें वादकथा शास्त्र आहे, म्हणून. तेथें प्रमाण व तर्कांनी स्वपक्षाचे साधन व परपक्षाचा उपालंभ (दोष) ज्यांत असतो असा सिद्धान्ताशीं अविरुद्ध

॥ विवरण व्याख्यान ॥

लक्षणाचा प्रश्न, व आत्म्यांत असें म्हटलें असतां विशेष ज्ञानामुळें संभावनेचा आक्षेप असा अर्थ. 'एककालें' - आग्नेयादि अनेक यागां-च्या उपकारकत्वानें एकदांच प्रयाजादिकांच्या अनुष्ठानाप्रमाणें प्रश्न व आक्षेप यांचे द्वयांच्या विवक्षेनें एकदाच उच्चारण असा अर्थ.

२०।१३

२०।१४

पण प्रश्नाचे उत्तर सांगितलें असल्यामुळें प्रश्नार्थ 'किम्' शब्द आहे अशी शंका घेता - 'पण दोन्ही जर येथें'. येथें दोन्ही जर

२०।१५

विवक्षित आहेत तर प्रतिवचनें समर्थ संभावना कां दाखविली नाहीं? असा संबंध. पण 'तत्रावयवे भगवान् आत्मनो विषय:' येथें संभावना दाखविली आहे? त्यावर सांगतो - 'प्रथम.' पण प्रथम प्रदर्शनांत हेतु सांगितला नाहीं? त्यावर सांगतात - 'स्वरूप सांगून' दुसऱ्याच्या उक्ती-चें प्रयोजन विचारतो - 'पण आहे'. पण अर्थनिर्णयपरत्वभावानें वादत्व कसें? त्यावर सांगतात - 'तेथें'. कथा तीन प्रकारची आहे, १ वाद

卐

२ जल्प ३ वितंडा. त्यांत येथें वाद दाखविला जातो असा अर्थ. 'पक्ष प्रतिपक्षाच्या परिग्रह ज्यांत आहे' एवढेंच म्हटलें असतां जल्प-

॥ टिप्पणी ॥

卐 जल्प - उभयपक्षांचा स्थापन करणारी विजिगीषु कथा. 'वितण्डा' - स्वपक्षस्थापनहीन विजिगीषु कथा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

-भवाचा आक्षेप घेऊन समाधान केलें आहे. कारण कळण्यास कठिण वस्तुविषयांत श्रोत्यांना मु-
ळांत शेष व्हावा म्हणून व्याख्याते तेथें स्थिरतेस असल्याप्रमाणें प्रतिवाद्यास उत्थापन करून
त्यानें आक्षेप(ही) घेतला असतां यानें प्रश्न(ही) केला आहे असें मानून उत्तर देतात. पुनः हा आ-
पला अभिप्राय आक्षेपरूपानें विवरण केला असतो अशा रीतीनें आक्षेपाला अवतीर्ण करून त्याचें

॥ विवरण ॥

पांच अवयवांनीयुक्त, पक्ष प्रतिपक्षाच्या परिग्रहाचा आहे असा वाद आहे म्हणून वादिप्रतिवाद्यांकडून किंवा गुरु-
शिष्यांकडून पक्ष प्रतिपक्षाच्या परिग्रहानें केली जाणारी अर्थनिर्णयावसान वादकथा येथें प्रवृत्त आहे. असें
दाखविण्याकरितां परोक्ति आहे. असें सांगतात – 'कारण कळण्यास कठिण?' 'त्यानें आक्षेपही घेतला असतां?' –
त्याच्या आक्षेपरूपही अभिप्रायानें जाणल्या सारखें करून यानें प्रश्नच केला आहे असें मानून असा अर्थ. पण प्रश्नालाही
अभिप्रायाच असल्यामुळें 'आपला अभिप्राय विवरण' असें कसें घडलें? अशी आशंका असतां सांगतात –
'पुनः' जरी आक्षेप व प्रश्नही पूर्वी अभिप्रेत आहेत. तरी प्रश्नप्रतिवचनानंतर आक्षेपाचें उत्थापन आहे.

विवरणव्याख्यान

सिद्धांतही अतिप्रसंग येईल म्हणून केवळ प्रमाण व तर्कांनीं असें म्हटलें. जल्पवितंडांत तर छळ जाति निग्रहांनींही स्वपक्ष
येथें तसें नाहीं असा अर्थ.
साधन व परपक्ष दोष दर्शन असतें. 'सिद्धान्ताशीं अविरुद्ध' यानें अपसिद्धान्ताचा निग्रह सांगितला. 'पांच अवयवांनीं'
यानें न्यूनाधिक्य यांनीं असिद्धादि पांच हेत्वाभासांचा निग्रह सूचित केला आहे. किंवा स्वमत साधन परकीय साधन दूषण
स्वसाधन समर्थन, परदूषण समर्थन, अपशब्दादि शब्ददोषरहित अशा पांच अवयवांनीं युक्त असा अर्थ. यानें प्रकृतांत काय आहे?
स्पष्ट सांगतात 'म्हणून वादि' पण आक्षेपही असतां प्रश्नच आहे असें मानणें कसें? अशी आशंका असतां सांगतात – 'त्याचा आक्षेप रूपही?'

॥ टिप्पणी ॥

५ 'छळ' = विपरीत अर्थ कल्पनेच्या उपपत्तीनें वचनाचा विघात. जाति – स्वव्याघातक वचन. निग्रह – वगैरे करून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

समाधान करितात. सर्वत्र अशा प्रकारच्या अर्थनिर्णयपर ग्रंथसन्निवेशांत ह्याच व्याख्यानप्रकार असतो.

सिध्दान्ती- 'उच्यते'- सांगतो- 'स्मृतिरूपः परत्र पूर्वदृष्टावभासः' असें प्रश्नवाक्य-स्थित अध्यासाला उद्देशून लक्षण सांगितलें जातें. तेथें 'परत्र' = दुसऱ्यांत असें म्हटलें असल्या-मुळें सामर्थ्यावरून पराची = दुसऱ्याची अवभासमानता सिध्द आहे. त्या परावभासाचे

॥ विवरण ॥

असा अर्थ. पण शास्त्रांत जल्पवितण्डेच्या अभिप्रायानें हि दुसऱ्याची उक्ति असते त्यावर नाहीं असें सांगतात सर्वत्र'

२०।२१
पण लक्षण वाक्यांत लक्ष्याला सांगणाऱ्या पदाचा अभाव असल्यामुळें साकांक्ष वचन अनर्थक आहे।
अशी आशंका असतां वाक्याला पूर्ण करितात 'प्रश्नवाक्यस्थित' म्हणून लक्षण वाक्याच्या अंती अध्या-स' पदाची योजना करावी. असा अर्थ. पण 'पराचा' = दुसऱ्याचा 'परस्थाने' = दुसऱ्या स्थानें अवभास अध्यास असें सांगणार आहा- तेथें एकाच परशब्दानें लक्षण कसें पूर्ण केलें जातें। अशी आशंका असतां सांगतात- तेथें.

॥ विवरणव्याख्यान ॥

अभिप्राय' न जाणल्यामुळे विवेक करून' असा येथें अध्याहार करावा असा अर्थ. कारण श्रोत्यांत अनवबोधाचें स्थापन केलें असतां त्याला अनुचितकारीत्व बुध्दीनें प्रतिवचनाची अप्रसिध्दि होईल म्हणून स्वतः त अनवबोधाचें आरोपण आहे. असा अर्थ. पण दुसऱ्याच्या उक्तीला बाधकत्व सूचनार्थत्व नियम कसा। कारण अन्य मर्हर्षिसंमतीचा संभव आहे'
अशी शंका घेतो- 'पण शास्त्रांत' अर्थनिर्णयपर ग्रंथांत परोक्तीचें हे लक्षण आहे असें सांगतात 'त्यावर नाहीं'

२।२।५
पण अध्यासाचें स्वरूप विचारलें असतां 'स्मृतिरूपः परत्र पूर्वदृष्टावभासः' हें त्याच्या स्वरूपाचें कथन आहे असें लक्षण शब्द आहे, त्यामुळें प्रश्न-वाक्यस्थित' हें व्याख्यान व्यर्थ आहे। अशी आशंका असतां सांगतात- 'पण लक्षण' आकांक्षादिकाच्या अनुसारानें पदांना अन्वित अर्थाचें प्र-तिपादकत्व असल्यामुळें 'अध्यास' पदाचा अभाव असतां साकांक्षत्वानें वाक्याच्या आनर्थक्यामुळें पूर्ववाक्यस्थ पदाच्या अध्याहारानें अभिधान 'पदाचीं हें'
प्राप्त झालें असा अर्थ. पण अध्यासादि दोषामुळें सामर्थ्यावरून ही विशेषण कां ग्रहण केलें जातें? त्यामुळें तेथें परत्र हें अनुपपन्न आहे। त्यावर सांगतात- 'पण परत्र'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

विशेषण "स्मृतिरूपः" हें आहे. 'स्मर्यते इति स्मृतिः' = स्मरण केला जातो तो स्मृति = स्मर्यमाण पदार्थ. कारण असंज्ञेतही अकर्तरि कारकांत 'घञ्' इत्यादिकांचा प्रयोग दिसतो. तस्य रूपमिव रूपं

॥ विवरण ॥

परत्र? पण 'घञ्' इत्यादिकांचे भावांत (= सिद्धावस्थापन्न धात्वर्थांत) विधान असल्यामुळें स्मृति शब्द कर्मपरत्वें कसा व्युत्पादन केला जातो? त्यावर सांगतात - कारण असंज्ञेतही? "अकर्तरि च कारके संज्ञायाम्" [पा. सू. ३।३।१९] या सूत्रावरून कर्तृव्यतिरिक्त कारकांत संज्ञे प्रमाणे असंज्ञेतही प्रयोग होतो असा अर्थ. तात्पर्य परत्र = दुसऱ्या ठिकाणी अयोग्य अधिकरणावर 'अवभास्यते इति अवभासः' भासविला जातो तो अवभास भासविला जाणारा [दुसरा] रजतादि अर्थ. तो 'परत्र परावभासः' एवढेंच भाष्यांत अध्यासाचें लक्षण सांगितलें आहे. त्यावर - पण या लक्षणा- 5 स्त्र. ४२।८

॥ विवरणव्याख्यान ॥

पण व्याकरणाच्या नियमामुळे स्मृति शब्दाला कर्मपरता नाही? अशी शंका घेतो - 'पण घञ् इत्यादिक' 'भावे' [पा. सू. ३।३।१८] इति सिद्धावस्थापन्न धात्वर्थे धातोर्घञ् स्यात् [या सूत्रानें भावांत घञ् इत्यादिकांच्या विधानाप्रमाणें "अकर्तरि च कारके संज्ञायाम्" "अकर्तरि च कारके संज्ञायाम्" (पा. सू. ३।३।१९) कर्तृव्यतिरिक्त कारकांत घञादि प्रत्ययाला [पा. सू. ३।३।१९] या सूत्रानें कर्मादिकांत घञ् इत्यादिकांचे विधान असतांही संज्ञेंत विहित असल्यामुळे स्मृति शब्दाला योग-वृत्तीनें कर्मपरत्व नाही असा अर्थ. कर्मांत किंवा भावांत विशेषानें घञ् इत्यादिक वृद्धांकडून प्रयोजिले जातात. 'दुसऱ्याकडून कोणता दायदिला गेला, कोणता लाभ लब्ध झाला' तसे 'पाक, त्याग, राग' या व्याकरणांत वृद्ध प्रयोग दृढत्व असल्यामुळे स्मृति शब्दाला कर्मपरत्व युक्त आहे. असें समाधान करितात 'त्यावर सांगतात' मग सूत्राची काय गति? त्यावर सांगतात - अकर्तरि च कारके' 'भावे' 'अकर्तरि च कारके संज्ञायाम्' या सूत्रद्वयाला अधि-कार करून "स्त्रियां क्तिन्" [पा. सू. ३।३।९४] या सूत्रानें भावांत व कर्तृव्यतिरिक्त कारकांत संज्ञे प्रमाणें 'अकर्तरि च' या च शब्दानें असंज्ञेतही घञ् इत्यादिकांचे विधान केलें जातें. म्हणून सूत्रविरोध नाही असा अर्थ. निष्कृष्टार्थ सांगतात - तात्पर्य? हें असें

॥ टिप्पणी ॥

फ. "परत्र परावभास" हें सादिव अनादि अध्यासाचें लक्षण आहे. त्यांत अहंकारादि अध्यास सादि असून जीव भाव्यास अनादि आहे. तसेंच दुसरें एक आहे की - "जीव ईशो विशुद्धा चित्तथा जीवेशयोर्भिदा। अविद्या तच्चितो योगः षडस्माकमनादयः॥"

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

यस्य सः स्मृतिरूपः = त्याच्या = स्मर्यमाणाच्या रूपाप्रमाणें रूप आहे ज्याचें तो स्मृतिरूप भ्रम ८१२ दीमाण सदृश असा अर्थ. स्मर्यमाणच तर नव्हे कारण स्पष्ट पुढें अवस्थित रूपानें भासतो.

॥ विवरण ॥

भ्रम असंभव आहे. कारण शुक्तीस रजताच्या भासाच्या सामग्रीचा अभाव असल्यामुळे त्याच्या संसर्गाचा अभाव आहे. अशी आशंका असतां त्याच्या उपपत्ती करितां 'स्मृतिरूपः' असें म्हटलें. त्याचा अर्थ स्पष्ट करण्याकरितां स्मृति शब्दाचा विग्रह केला असतां विचारतो – पण जर स्मरण केलें जातें तर रूप शब्द कशाकरितां? अस्मर्यमाण वस्तूंत उपमासमासाकरितां असें सांगतात – 'स्मर्यमाणाच्या'. पण उपमासमासानें काय? हें रजत स्मर्यमाणच आहे? यावर नाहीं असें सांगतात – 'स्मर्यमाणच तर नव्हे'. कारण अन्यथाख्याति प्रसंग येतो तो तर इष्ट नाहीं असा भाव. पण चक्षुरादि प्रमाणाच्या अभावामुळें परिशेषावरून स्मर्यमाणच आहे? त्यावर नाहीं असें सांगतात – 'कारण स्पष्ट पुढें अवस्थित'. जसें अन्यत्र

॥ विवरणव्याख्यान ॥

८३१८ 'स्मृतिरूपः असें म्हटलें' = याच्याशीं असा संबंध. 'विग्रह केला' व्याख्यानांत असा अर्थ. 'स्मृतिरूपः' येथें रूप शब्दाच्या वैयर्थ्याची शंका घेतो – 'पण जर'. काय येथें प्रश्न आहे? किंवा आक्षेप? पहिल्या पक्षाचें उत्तर सांगतात – 'अस्मर्यमाण वस्तूंत'. अस्मर्यमाण रजतादिकांत स्मर्यमाणाशीं जी उपमा तिच्या समासाकरितां असा अर्थ. दुसऱ्याचा अनुवाद करितो – "पण उपमासमासानें". कारण त्याचा संस्कारोत्थ बोध विषयत्व आहे असा दोष. काय संस्कारोत्थ बोध विषयत्व मात्र हेतु आहे? किंवा संस्कारमात्रजन्य बोध विषयत्व? पहिल्या पक्षीं प्रत्यभिज्ञा विषयानें व्यभिचार होतो. अशा अभिप्रायानें दूषित करितात – 'यावर नाहीं' असें सांगतात 'स्मर्यमाणच तर'. दुसऱ्या पक्षाचें उत्थापन करितो – 'पण चक्षुरादि' अनुभवाच्या विरोधानें उत्तर सांगतात – 'त्यावर नाहीं' असें सांगतात – कारण स्पष्ट. पण पुढें अवस्थित रूपानें भासतो हें असंबद्ध आहे कारण 'हें' या गृह्यमाणत्व असून रजताला स्मर्यमाणत्व आहे? अशी आशंका असतां सांगतात – 'जसें अन्यत्र'. भ्रमक स्थळीं 'हें रजत' असा संसृष्ट सामान्य विशे-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

'हें रजत, रजत ?' असें उत्तरे त्याशीं संबंधित सामान्यविशेष अपेक्षा धाकतात, तसाच येथेंही प्रतीत्याभास आहे. परमा-
(=ज्ञानाकार) संसर्ग-(=ऐक्य)
र्थ 'हें रजत' संवेदनाकार अवभासाहून न्यून्त्व दाखून संविद्भासाचा अभाव आहे म्हणणे तर शक्य नाहीं. अर्था-
त साक्ष्याशीं (नें) अर्थ मानाहून आरोपाचा भेद आहे म्हणून ही अन्यथाख्याति नव्हे असा भाव.
२१।१०
पण अर्थाचा अभाव असतां अपरोक्ष संवित् कशी ? असें असेल तर नाहीं कारण अर्थसत्तानिश्चय यथासंवि-
दवभासाधीन असतो. अर्थसत्ता निश्चयाधीन तर संवित्सत्तानिश्चय नसतो कारण अर्थसत्तानिश्चय लाही

५ विवरणव्याख्यान १

अपरोक्षतेनें स्फुरणाप्रमाणें भ्रांतीतही दोघांचे अपरोक्षतेनें स्फुरण असल्यामुळें त्याच्या सिद्ध समारोपिताचे अर्थ-
माणत्व वचन आहे. असा अर्थ. पण अपरोक्षसामान्याशीं अविवेकामुळें रजतांत अपरोक्ष व्यवहार आहे ? संसर्ग संवित नाहीं ? अ-
र्थाशीं आरोप असतां काय प्रतिभासकृत वैलक्षण्याचा आश्रय करून संसर्ग संवितीचें निराकरण केलें जातें ? किंवा अर्थाच्या अभा-
वामुळें ? असा विकल्प करून प्रतिभासवैलक्षण्य असिद्ध आहे असें सांगतात- 'परमार्थ हें रजत'.
१३।२१
दुसऱ्याचा अनुवाद करितात- 'पण अर्थाच्या' पण अविद्यादोषज्ञान अर्थाच्या अभावीही असतें ? त्याकरितां 'अपरोक्ष' असें म्हटलें.
(म्ह) (ला)
काय हें विरोधामुळें म्हणणे आहे ? किंवा विनायाचें ? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितात- 'नाहीं'. संवित्ला अतिक्रमण न करितां
कारण तो निश्चय
राहणारा जो व्यवहार तो 'यथासंविदवभास' आधीन असतो. असा निग्रह: अर्थ सत्ता कशावरून ? असें विचारलें असतां
त्याचा अनुभवावरून असें म्हटलें पाहिजे. त्यामुळें अर्थसत्ता संवित् असतां अर्थ नाहीं हें म्हणणें हें अतिसाहस आहे. पण
निरालंबन ज्ञानाचा अयोग असल्यामुळें अर्थसत्ताधीन संवित् निश्चय आहे ? अशी आशंका असतां काय संवित् निश्चयाच्या आधीं अ-
सत्ता (म्ह) (म्ह)
र्थसत्तानिश्चय असला पाहिजे असें म्हणणे आहे ? किंवा अर्थसत्ता असली पाहिजे ? असें म्हणणे आहे ? असा विकल्प करून पहिल्याला दू-
(ल) (ह)
षित करितात- 'अर्थसत्तानिश्चयाधीनत्व'. यांत अर्थसत्ता निश्चय सिद्ध होणार नाहीं असा तर 'आज्ञातार्थ' कां म्हटलें ? असें असल्या-
(कं)
स काय अर्थसत्तानिश्चय स्वतः आहे ? किंवा स्वविषय संवित्तवरून ? पहिला पक्ष नाहीं कारण अर्थसत्तेला जडत्व आहे. अ-
पक्षीं निश्चयाला
साधारण प्रायोजून दुसऱ्याला दूषित करितात- 'कारणं अर्थसत्ता'. स्वविषय संवित् निश्चय तरी स्वतः आहे ? किंवा अर्थनि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

दुसऱ्या निश्चयाधीनत्व प्रसंग येतो. पण 'हे रजत नव्हे' अशा उत्तर संवेदनामुळे अर्थाभाव निश्चित होतो? नाही कारण त्येथेही सद्भावविषयक पूर्वसंवेदनाशी विरोध येतो. तसें 'हें' व रजत(व अ-)भाव संवेदनाच्या अविवेक कल्पनेने उत्तर ज्ञानांतही संसर्ग संवित्च्या अभाव कां असणार नाही? आता व्यवहार संवाद ज्ञानामुळें उत्तर ज्ञानांत संसर्ग संवित सद्भाव असेल तर नाहीं कारण अर्थक्रिया संवाद ज्ञानामुळें अर्थ संवित्सद्भाव-

॥ विवरणव्याख्यान ॥

अथाधीन? ~~...~~ांत अन्या रथाची सिद्धि होते. दुसऱ्यांत अर्थ निश्चयाचीही स्वतः अनुपपत्ति असल्यामुळे तीत द्विपायक (निश्चय =अर्थविषयक) दुसऱ्या संवित्पासून सहरला पाहिजे. व त्यामुळे पूर्व पूर्व अर्थ निश्चयाधीन उत्तरोत्तर संवित्निश्चय सिद्ध होणार नाही. असा अर्थ. अर्थ निश्चयाधीन संवित्निश्चय या पक्षाचे निरसन केले असता अर्थसत्ताधीन संवित्तनिश्चय या पक्षाचे उत्थापन करितात — 'ननु इदं रजतम्?' पुरें रजताच्या निर्विघ्न भानत्वामुळे त्याचे अस्तित्व सिद्ध व त्याचा अभाव असता संवित्ची असिद्धि होते असा अर्थ. पण त्याला विपरीतकां असणार नाही? असें सांगतात — 'नाही कारण तत्येही?' उत्तर संवेदनांतही असा अर्थ. प्रथम प्रश्नाचे अनुसरून विरोधित्वाने प्राबल्य सांगतात — 'पूर्वसंवेदनाशी?' निरपेक्षतेने प्राबल्य सांगतात. 'सद्भावविषयक?' पण 'हें रजत नव्हे' असा संसर्ग जाणल्या जाती अशी आशंका असता जसें 'हें' व रुप्याच्या संसर्ग संवित वाचून अविवेकामुळे (पूर्वीचा 'हें रजत' हा) संसर्ग व्यवहार होतो त्याप्रमाणे येथे ही होईल असें सांगतात. 'तसें 'हें' व रजत(व अ-)भाव?' पण व्यवहाराची विसंवाद (=विरोध...) (पूर्वीचा) हें व रजतांत संसर्ग संवित्ला अभावाचा निश्चय होतो? उत्तर ज्ञानांत तर त्याच्या वैपरीत्यामुळे असें नाही? अशी आशंका घेतो — 'आता व्यवहार संवाद ज्ञानामुळे?' रजताभावज्ञान-प्रयुक्त व्यवहार व्यवहार शब्दाचा अर्थ आहे. संसर्गज्ञान संवादज्ञानाधीन आहे असें बोलणाऱ्याच्या सिद्धान्ताचे खंडन होते असें सांगतात — 'नाही कारण अर्थक्रिया?' स्वसंवेदनज्ञान स्वतःचे स्वतः प्रकाशक असते या पक्षाला अर्थक्रियासंवाद किंवाने संसर्ग संवित्सत्ताची अनुमिति असता विरोध येतो असा अर्थ. संवित्चे अनुमेयत्व अंगीकार करणाऱ्याप्रत सांगतात —

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

निश्चय होतो असें म्हणणाऱ्याच्या संवित् प्रत्यक्षत्ववादाची हानि होते. व अर्थक्रियासंवित् चाही दुसऱ्या संविद्-धीन सद्भावनिश्चय प्रसंग येतो. पण तुम्हालाही अर्थाभाव संमत आहे? नाहीं कारण प्रतिभासप्रामाण्य उत्तरज्ञा-नानें निरसनयोग्य मिथ्यारजत आम्ही मानलेलें आहे; व रजतविषयी त्रैकालिक अभावज्ञानाला लौकिक परमार्थ दृष्ट रजत प्रतियोगिक अभावविषयत्व आहे; अशी अन्यतर संवित्च्या अभावाच्या अयोगामुळे संवित्द्वयाच्या अनुरोधानें व्यवस्था सिद्ध होते. व तसाच 'येथें रजत नाहीं, मिथ्याच रजत भासलें' असा उभय संवित्च्या विषयांचा अनुभव आहे.

॥ विवरणव्याख्यान ॥

'व अर्थक्रिया' संवित्सत्त्व अर्थक्रियासंविदधीन आहे तर अर्थक्रियासंवित्सत्ता तरी कोठून? असे विचारलें असतां दुसऱ्या संवित्वरून असे म्हटलें पाहिजे त्यासंबंधेच त्याची सत्ता ही दुसऱ्या संवित्वरून अशा रीतीनें पूर्व-
पूर्व संवित्ची असिद्धि असतां उत्तरोत्तर संवित्ची असिद्धि होत असल्यामुळें व्यवहारादिकांची सिद्धि होत नाहीं म्हणून स्वतः संवित् निश्चय स्वरूप पाहिजे. व तसें असतां त्याच्या बळावर अर्थ सत्त्व म्हटले पाहिजे. म्हणून अर्थाभावाची सिद्धि होत नाहीं. असा अर्थ; विरोधकाच्या शंकेचा निरास करत असतां विनय (विनम्र) आपल्या शंकेचे उत्थापन करितो- 'पण तुम्हालाही' काय प्रतिभाससमयीं अर्थाभावाला आपली संमति आहे? किंवा दुसऱ्या काळीं? पहिला पक्ष बरोबर नाहीं असें सांगतात- 'नाहीं कारण' पण रजताचें सत्त्व असतां ते उत्तरज्ञानानें कसे निरसित केलें जाते? अशी आशंका असतां सांगतात- 'उत्तरज्ञानानें' निरसनयोग्यत्व सांगतात- 'मिथ्यारजत' परमार्थसत्त्वविलक्षण मिथ्या शब्दाचा अर्थ; दुसऱ्या पक्षाचा अंगीकार केला जातो असें सांगतात- 'प्रतिभासप्रामाण्य' पण जर प्रतिभाससमकालीं अर्थ मानला आहे तर कालत्रयसंबंधी सत्ता निषेधक कसा? अशी आशंका असतां सांगतात- 'लौकिक परमार्थ' पण परमार्थ रजताची येथे अप्रसक्ति असल्यामुळे त्याला निषेध कसा? अशी आशंका असतां सांगतात- 'दृष्ट रजत' रजताच्या आभासाच्या प्रसक्तीनें परमार्थ रजतालाही बुद्धिस्थत्व असल्यामुळें तेथें त्याचा प्रतिषेध होतो. जसा सामान्य उपाधींत प्रसक्त घटाचा निषेध होतो त्याप्रमाणे असा अर्थ; उक्त व्यवस्थेला कल्पक काय? अशी आशंका असतां संवित्द्वय कल्पक आहे असें सांगतात- 'संवित्द्वयाच्या' संवित्द्वयाची अनुपपत्ति व्यवस्थेला कल्पक आहे, असा अर्थ. पण यांतील प्रत्ययांत एका संवित्च्या त्यागकरणावर तसें असतां अलौकिक कल्पना होत नाही? अशी आशंका असतां सांगतात- "अशी अन्यतर संवित्च्या" अभावाच्या अयोगांत हेतु सांगतात- 'व तसाच'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

(शुक्तीतील 'हें' अंशाच्या ज्ञानाशीं)

पण अपरोक्ष शुक्तिज्ञानाशीं अविवेकामुळें रजत अपरोक्ष भासलें? त्यावर नाहीं असें सांगतात- 'स्पष्ट'. पण ही स्पष्टता कोणती? विवेकज्ञानसमर्थीहि 'यावत्कालपर्यंत हें रजत असेल' अशी संसृष्टाच्या अवभासत्वानें त्याला प्रत्यभिज्ञा योग्यता असणे. अन्यथा 'आकालपर्यंत हें रजत याच्याहून अविविक्त भासत होतें' असा प्रत्यय येईल. अथवा त्याच्या ज्ञानामुळें तेथें प्रवृत्ति होते असा पदार्थांशज्ञान वस्त्वाच्याकडील प्रवृत्तीचा नियम असल्यामुळें येथेंही संसर्गज्ञानाला संसर्ग प्रवृत्ति-

॥ विवरणव्याख्यान ॥

ज्याप्रमाणें रीतीनें अन्यतर संवित्च्या अभावाचा अयोग आहे तशा रीतीनें उभयसंवित्चा अनुभव आहे. त्यामुळें अन्यतर संवित्चा भेद नाहीं असा अर्थ. 'येथें रजत नाहीं' असें कालत्रयसंबंधी असत्व प्रतीत होते. 'मिथ्याच भासले' असें भ्रान्तिविषयात सत्व प्रतीत होतें. त्यामुळें उभय संवित्च्या अनुसंधानें कालत्रयनिषेधाला लौकिकविषयत्व असून 'सत्यें हें रजत' या अनुभवाला [illegible] रूपविषयत्व आहे असा अर्थ.

पण पुढें अवस्थित रूपानें अवभास अन्यथा उपपन्न आहे? अशी शंका येते- 'पण अपरोक्ष शुक्तिज्ञानाशीं' 'अविवेकामुळें' = रजतस्मरणाच्या अविवेकामुळे अपरोक्ष शुक्तीशीं समर्थ पण रजताच्या अविवेकामुळें असा अर्थ. निरस्त ही शंका व्याख्यानाकडे करण्याकरितां येथें पुनः उठविली जाते असें जाणावे. अनुभवाच्या विरोधामुळें असें नाही असें सांगतात- 'त्यावर नाहीं'. पण पुरोवस्थितत्वानें अवभासाहून अतिरिक्त स्पष्टशब्दाचा अर्थ आभास करता नाहीं त्यामुळें हे हेतु असिद्ध आहे? अशा अभिप्रायानें शंका घेतो- 'पण ही स्पष्टता'. भ्रान्तिसमयीं पुरोदेशाशी संसृष्टतेने रजताचे स्फुरण पुढे अवस्थितरूपानें अवभास असून बाधकज्ञानानंतर काळीं 'हें' शी संसृष्टतेने त्याचे अनुसंधान होणे स्पष्टशब्दाचा अर्थ आहे अशा अभिप्रायानें सांगतात- 'विवेकज्ञानसमर्थीहि'. पण बाधकज्ञानोत्तरकाळीं संसृष्टतेनें त्याची प्रत्यभिज्ञा होणे एतद्भावकरून पूर्वीं संसृष्टतेनें प्रतिभास कसा? अशी शंका असतां सांगतात- 'अन्यथा'. परामर्शाला (=अनुसंधानाला) अनुभूतविषयत्व असल्यामुळें संसर्गाला अननुभूत विषयत्व असतां तद्विषयक परामर्शाचा संभव नाहीं असा अर्थ. स्पष्टशब्दाचा दुसरा अर्थ सांगतात- 'अथवा'. पण संसर्गज्ञानाला संसर्गप्रवृत्तिनिमित्तता स्पष्टता होय हे कोणत्या कारणावरून? कारण (विवेकाच्या) अग्रहणावरूनही संसर्गप्रवृत्ति संभवते? अशी आशंका असतां सांगतात- 'पदार्थांशज्ञान' नियम सांगतात- 'त्याच्या ज्ञानामुळें'. जो जेथें प्रवृत्त होतो तो त्याच्या ज्ञानामुळेंच प्रसिद्ध आहे, रजतार्थी हें त प्रवृत्त होतो म्हणून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

७८/१६९ ७।२ स्मृतिरूपत्वाविषयी उपपत्ति सांगतात- 'पूर्वदृष्टावभासः' 'पूर्वं च तत् दृष्टं (=दर्शनं) पूर्व-
दृष्टं, पूर्वदृष्टात् संस्कार द्वारा अवभास्यते सो पूर्वदृष्टावभासः'- पूर्वी जे दृष्ट दर्शन ते पूर्वदृष्ट, ७।२८
रजतादि भर्थ.
पूर्वदृष्टामुळे संस्कारद्वारा भासमिळा जातो तो पूर्वदृष्टाचा अवभास. कारण पूर्वी रजत दृष्ट नस- ७।३

॥ विवरण ॥

त.दी.९७।८
सिध्दितता स्पष्टताहोय. पण रजताला पुरोवर्ति तेने भासमानत्व असतां स्मर्यमाण सदृशत्व कैसे? अशी आशंका असतां सां-
त.दी.९।१०
गतात 'स्मृतिरूपत्वाविपर्यय?' स्मर्यमाणाची सादृश्याविषयीं असा त्यर्थ. पण शुक्तीच्या अविवेकाने तेथें त्वरेने उत्पन्न
होणाऱ्याला पूर्वदृष्टामुळे अवभासत्व कसें घटते? अशी आशंका असतां पूर्वदृष्टाच्या सदृश असा अर्थ परते तेनें दाखवि-
र.प्र.४।३।३
ण्याने स्पष्ट करितात- 'कारण पूर्वी रजत दृष्ट?' याने संस्कारजन्य ज्ञानाचा विषय असणे हें स्मर्यमाण व आरोप्यांत साद-
श्य सांगितले. कारण स्मृति व आरोपाला संस्कारजन्यत्व आहे. संस्कारजन्यत्वामुळें आरोपाला स्मृतित्वापत्ति होईल तर नाही;
कारण दोष व संप्रयोगाच्या ही विवक्षितत्वानें संस्कारमात्रजन्यत्वाचा अभाव आहे. येथें संप्रयोग शब्दानें अधिष्ठानाचे
सामान्य ज्ञान सांगितले जाते कारण अहंकाराध्यासांत इंद्रियसंप्रयोगाचा लाभ नसतो. अशा रीतीनें दोष संप्रयोग

॥ विवरणव्याख्यान ॥

पुरोवर्ति द्रव्याला रजत ते जाणून प्रवृत्त होता असें अवश्य आपण मांडले असा अर्थ. सादृश्याविषयीं आक्षेप घेतो- 'पण रजताला' वि-
ग्रहपूर्वक सादृश्याला स्पष्ट केले असतां दुसऱ्या रीतीने आक्षेप घेतो- 'पण शुक्तीच्या' व्यतिरेकाने त्याला दृढ करितात
'पूर्वदृष्टाच्या सदृश' सादृश्याच्या प्रकाराला स्पष्ट करितात- 'याने संस्कारजन्य' पण आरोपाला संस्कारजन्यत्व असतां स्मृतित्व
प्राप्त होते? अशी आशंका असतां काय त्याला संस्कारमात्रजन्यत्व विवक्षित आहे? किंवा संस्कारजन्यत्व? पहिल्या पक्षी त्याला संस्कारमात्र-
जन्यत्व नाही असे सांगतात- 'संस्कारजन्यत्वामुळे' दुसऱ्या पक्षी स्मृतीला संस्कारमात्रजन्यत्व आहे असा अर्थ. पण प्रत्यगात्म्याला
इंद्रियग्राह्यत्व नसता तेथें संप्रयोगाला विवक्षितत्व कसें? त्याचें सांगतात- 'येथें' प्रत्यगात्म्यांत. लक्षणाच्या उपपन्नत्वाचा उपसंहार
९५/१२
करितात- 'अशा रीतीने' पण स्मर्यमाण सदृश दुसऱ्याचा दुसऱ्या रूपाने अवभास अध्यास असा लक्षणाचा स्वीकार केला असतां ज्ञानात्र अ-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ५ ॥ ७३ प.पा.वि. २२|१०

लेल्यास शुक्तिशी इन्द्रियाच्या संप्रयोग झाला तरी रजतभास नाहीं. ज्या अर्थी वाक्य सामर्थ्या-मुळें अध्यस्त विषयाच्या अवभासाचेंही हेंच लक्षण सांगितलें जातें त्या अर्थी या लक्षणांत ज्ञाना-ध्यासाची उपेक्षा केलेली नाहीं. तें कसें सांगितलें जातें तें सांगतात- 'स्मरणं स्मृतिः तस्याः रूप-मिव रूपं यस्य अवभासस्य सः स्मृतिरूपः' = स्मरण स्मृति, तिच्या रूपाप्रमाणें रूप आहे ज्या अव-

॥ विवरण ॥

वसंस्कार सामग्रीनकालें शुक्त्यादिकांत (प्रातिभासिक) रजत उत्पन्न होतें. म्हणून परत्र परावभासलक्षण उपपन्न आहे, असें (वि. २२|३) 'स्मृतिरूप व पूर्वदृष्ट' शब्दांनीं उपपादन केलें असा अर्थ. जेव्हां ज्ञानविशिष्ट अर्थात अध्यास आहे, तेव्हां स्मर्यमाण स-दृश दुसऱ्या रूपानें भासविला जाणारा दुसरा अर्थ अध्यास आहे, अशा लक्षणपरत्वानें वाक्य योजित केलें. जेव्हां पुनः अर्थविशिष्ट ज्ञान अध्यास आहे तेव्हां स्मृतिसमान दुसऱ्याच्या दुसऱ्या रूपानें अवभास. अशा लक्षणपरत्वानेंही तेंच (त. दी. ९७|२४) वाक्य योजित करणें शक्य आहे असें सांगतात- 'ज्या अर्थी' पण अर्थाध्यासाचें लक्षण ज्ञानाध्यासाचें लक्षण कसें होईल? कारण अन्याचें लक्षण अन्याचें लक्षण होत नाहीं? अशी शंका घेतो 'तें कसें' आम्ही अन्य लक्षण अन्याचें लक्षण म्हणत नाहीं. परंतु अन्यलक्षणवाक्य अन्यलक्षणपरत्वानें योजित करणें शक्य आहे असें सांगतात- 'तें सांगतो,' येथूनच सांगतात- 'स्मरणं'

॥ विवरणव्याख्यान ॥

ध्यासत्व उपेक्षित होतें? अशी आशंका असतां ज्ञानाध्यासपरत्वानें लक्षणाचें व्याख्यान केलें तें अनुपपन्न आहे. कारण ज्ञान व अर्थ यांमध्यें अन्यतराला अध्यासत्व असतां अन्यतराचाही अध्यासत्व सिद्ध होतें. पृथक् लक्षणाच्या उपन्यासानें काय? अशी आशंका असतां सांगतात- 'जेव्हां पुनः?' जो अर्थ व ज्ञानाध्यासांत अन्यतराचा निर्देश असतां अन्यतराची सिद्धि होते. तथापि अर्थाध्यासलक्षणाची ज्ञानाध्यासांत असंभवानें अव्याप्ति होते म्हणून ज्ञानाध्यासाचें लक्षण पृथक् निर्देश करण्यास योग्य आहे. असा अर्थ. मग दुसरें लक्षण सांगावें. हेंच तेथें कसें यो-जिलें जातें? अशी आशंका असतां लाघवामुळें असें सांगतात- 'तेंच वाक्य योजित करणें' असत्याति वादी शंका घेतो—

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

भासणें तो स्मृतिरूप, स्मृतिसदृश असा अर्थ. स्मृतीच्यतरन्नव्हे कारण पूर्व प्रमाणाच्या (= पूर्व प्रमाण संस्कारापासून उत्पन्न झालेल्या) या विषयविशेषाला (= अवभासाला) स्मृतिविषया प्रमाणें पूर्वानुभवाशी ऐक्य नसल्यानें (स्वविषयाचें) अवभासकत्व नाहीं. पण मग स्मृतिरूपत्व कसें? 'पूर्वदृष्टावभासः' इति? = पूर्वदर्शनापासून भासतो = पूर्वप्रमाणद्वार संस्कारापासून उत्पन्न होतो म्हणून.

॥ विवरण ॥

पण स्मृतिरूपत्व कशामुळें, संस्कारजन्यत्वामुळें स्मृतित्व येण्याचा प्रसंग नाहीं? अशी आशंका असतां (प्रत्यभिज्ञादिकांत) व्यभिचारामुळें नाही असें सांगतात- 'स्मृतीच्यतरन्नव्हे' पण संस्कारमात्रजन्यत्वानें स्मृतित्व आहे? या शंकेचा निरास करितात- 'कारण पूर्व प्रमाणाच्या' स्मृतिजनक संस्काराचें जें पूर्व तें पूर्व शब्दानें सांगितलें जातें. पूर्व असें जें प्रमाण तें पूर्व प्रमाण त्याचा जो हा विषय विशेष (= अवभास) त्याचा स्वविषयाचें पूर्वानुभवाशी संभिन्नत्व नसल्यानें (ऐक्य नसल्यानें) अवभासकत्व नाहीं असा अर्थ. पण स्वविषयाचा पूर्वानुभवाशी ऐक्य नसल्यानें भासविणाऱ्या अवभासाचा प्रत्यक्षाप्रमाणें स्मृतिसदृशत्व हें अनुपपन्न आहे? अशी शंका घेतो. 'पण मग' प्रत्यक्षाहून वैधर्म्यामुळें तें आहे असें उत्तर सांगतात- 'पूर्वप्रमाणद्वार' = पूर्वी प्रवृत्त जें प्रमाण तें द्वार = मूळ आहे ज्या संस्कारास त्याच्यापासून उत्पन्नत्वामुळें असा अर्थ. पण भ्रान्ति जर स्मृति नाही.

॥ विवरणव्याख्यान ॥

'पण स्मृतिरूपत्व' काय संस्कारजन्यत्वामुळें, संस्कारजन्यत्व मात्र विवक्षित आहे? किंवा संस्कारमात्रजन्यत्व? पहिल्या पक्षी उत्तर सांगतात- 'व्यभिचारामुळें' = प्रत्यभिज्ञादिकांत असा अर्थ. दुसऱ्या पक्षातें उत्थापन करितो- 'संस्कारमात्र' स्मृति प्रमाणें या अवभासाचा स्वविषयाचें पूर्वकाल विशिष्टत्वानें अवभासकत्व नसल्यामुळें संस्कारमात्रजन्यत्व नाही असें सांगतात- 'निरास करितात' यांत च स्पष्टीकरण करितात- 'स्मृतिजनक' 'स्मृतिजनक संस्काराचें पूर्व' = पूर्वभूतकालीन अनुभव असें जें प्रमाण असा अर्थ. 'पूर्वानुभवाशी ऐक्य नसल्याने' स्वविषयाचा वर्तमानकालीन अनुभव विषयत्वानें भासविणाऱ्या अवभासाचा, अस्मृतित्व असतां संस्कारजन्यत्व हें अनुपपन्न आहे? अशी शंका घेतो- 'पण भ्रान्ती जर' विपरीत भ्रान्ति संस्कारजन्य नाही तिला स्मृतित्व असल्यामुळें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥व्याख्यान॥

(निरूपयाम)

कारण इंद्रियांच्या विषयाशीं संबंध नसता, भासांवगाच्या अवभासाच्या पूर्व प्रवृत्त लोकव्यापक प्रमा-
णद्वार संस्कारापासून उत्पत्तिवाचून समुद्भव संभवत नाहीं.

॥ विवरण ॥

स्मृतीला प्रत्यक्षज्ञाना प्रमाणें पूर्वानुभवजन्यत्व होत नाहीं? अशी आशंका असतां संप्रयोगमात्रजन्य ज्ञानाहून अन्य सर्व
ज्ञानांना अन्वयव्यतिरेक सामर्थ्यानं करून समान पूर्व प्रमाणजन्यत्व आहे. असें सांगतात- <u>कारण इंद्रियांच्या</u>? इत्यादि
ग्रंथानं याला स्मृतित्व नाहीं असा अर्थ.

२३।११
पण जर संस्कारजन्यत्व मानलें आहे तर नेत्र अन्याशीं संप्रयुक्त असतां जें अनंतर अन्यविषयक ज्ञान उत्पन्न होतें
तीं स्मृतीच होय. तिच्या व्यवधानानें जें ज्ञान उत्पन्न होतें तें अनुमानादि प्रमाण होय. असें विज्ञानाला प्रमाण स्मृति हे-

॥ विवरणव्याख्यान ॥

प्रत्यक्षाप्रमाणें? असा अर्थ. अनुमानादिकांत व्यभिचार होत असल्यामुळें हा (असमृतित्व असल्यामुळें हा) हेतु साधु नाहीं असें
सांगतात- '<u>संप्रयोग</u>?' प्रत्यभिज्ञेंत संस्कारापासून अजन्यत्वाच्या प्रसंगाचा निरास करितात- '<u>मात्र</u>?' इत्यादि संस्कार असतां
अनुमानादि ज्ञान असतें अन्यथा नसतें अशा लक्षणाचें अन्वयव्यतिरेक येथें जाणावेत. स्मृतीहून हें अख्याति नव्हे असें सांगतात- '<u>स्मृतीहून</u>'

पण नेत्र अन्यविषयाशीं संप्रयुक्त असतां अन्यविषयक ज्ञान उत्पन्न होतें तीं स्मृतीच हें कसें? कारण अनुमानादिकांत व्य-
भिचार होतो? अशी आशंका असतां अभिप्रायाचें विवरण करितात- '<u>पण जर</u>?' अधिष्ठानाच्या ज्ञानाला व्यावृत्त करण्याकरितां
<u>अन्यविषयक असें</u> म्हटलें. अनुमानाला व्यावृत्त करितात- '<u>अनंतर</u>?' संस्कारजन्यत्वाच्या युक्तीनें आश्रय केला असल्यामुळें त्यानेंच
भ्रान्तीची उत्पत्ति होत असल्यामुळें दुसऱ्या कारणाच्या (अज्ञानाच्या) शोधाची आवश्यकता नाहीं अशा अभिप्रायानें सांगतो- '<u>संस्कारज-
न्यत्व</u>?' अनंतर शब्दानें व्यावर्त्य सांगतो- '<u>तिच्या व्यवधानानें</u>?' आदि स्मृतीच्या व्यवधानानें असा अर्थ करावा असें सांगतो. '<u>असें विज्ञा-
नाला</u>?' 'विज्ञानाला' = संस्कारोत्थ ज्ञानाला. (अनुमानादि) <u>प्रमाण व स्मृति म्हणणें हें शक्यच आहे</u>. असा अर्थ. पण संस्कारोत्थ ज्ञान

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

पर यावर दुसरा (=अख्यातिवादी प्राभाकर किंवा सांख्य) बोलतो – (=आक्षेप घेतो –) पण अन्यवि-
षयाशीं नेत्राचा संबंध झाला असतां जें अन्यविषयक ज्ञान उत्पन्न होतें ती स्मृतीच आहे परंतु.

॥ विवरण ॥

शक्यच आहे? तिसरें मिथ्या ज्ञान नामक कोणी नाहीं? असा अख्यातिवादी आक्षेप घेतो– 'यावर' पण डोरस्मृति आहे
सरगाई वगैरेंच्या स्मृतिप्रमाणें ती स्वार्थाला गृह्यमाणाहून पृथक् करून 'स्मरतो'? अशा रीतीनें दाखवावें? त्याव-
र सांगतो– 'परे तु स्मरणाभिमाना'? पण शुक्तिकेशीं संप्रयोग असतां सादृश्यामुळें रजत काय म्हणून स्मरलें जातें? अति-

॥ विवरण व्याख्यान ॥

दोन प्रकारचेच आहे असा नियम कसा? कारण अयथार्थ ज्ञानही संभवतें अशी आशंका असतां सांगतो– 'तिसरें'? ज्ञानत्व यथार्थ
मात्रवृत्ति आहे त्याचा ज्ञानमात्रवृत्तित्व असल्यामुळें प्रमात्वाप्रमाणें? असा अर्थ. अथवा अयथार्थ (=मिथ्या) प्रत्ययाची प्रसिद्धि
असल्यामुळें त्याचा अपलाप (=छपविणे) कसा? अशी आशंका असतां सांगतात– 'प्रमाणस्मृति', त्यांच्या शब्दाला विपर्यय प्रमाणाच्या
अभाव असल्यामुळें व प्रसिद्धीची अन्यथाही उपपत्ति होत असल्यामुळें असे नाहीं असा अर्थ. 'च' कारानें निवर्त्य सांगतात– 'तिसरें'
विवाद भ्रान्तिज्ञान स्मृति आहे त्याचा संस्कारमात्रजन्य असल्यामुळें संमतस्मृतिप्रमाणें असें येथें अनुमान विवक्षित आहे.
तें ये विपक्षांत (=साध्य स्मृतीच्या अभावांत) बाधक तर्कानें दाखवितांनी शंका घेतात– 'पण जर स्मृति' पण हें 'रजत' अशा अ-
पासून भिन्न होणाऱ्या (हेतू म)
पुनरुक्त शब्दाच्या स्मृतीहून भिन्न रजत विशिष्ट प्रतीत होतेच? अशी आशंका असतां सांगतो– 'स्मरतो' पण अप्रमुषित (=अलुप्त)
स्मरणाभिमान अशा स्मरणाला विवेचकत्व आहे. आता तरस्याच्या वैपरीत्यामुळें नाहीं असें सांगतो– 'त्यावर सांगतो' पण संस्काराच्या
(विवेकांतर काळीं)
सदा अभाव असल्यामुळें सदा स्मरण होईल? संप्रयोगाच्या पूर्वोत्तर काळीं अस्मरण कशामुळें? अशी आशंका असतां सादृश्याच्या दर्शनानें
समुद्बुद्ध संस्काराच्या पूर्वोत्तर काळीं अभाव असल्यामुळें अस्मरण आहे असें सांगितलें असतां तथापि रजत मकोणत्या कारणामुळें स्मरलें
जातें: दुसरें काय म्हणून स्मरलें जात नाहीं? अशी शंका घेतात– 'पण शुक्तिकेशीं' रागादिकांचाही संस्काराच्या समु-

॥ व्याख्यान ॥

स्मरणाभिमानाचा लोप होतो· ज्ञानकारण इंद्रियादिकांच्या कोण्यातरीच्या दोषविशेषानें कोण्यातरीच अर्थ विशेषाच्या स्मृतीच्या समुद्बोध केल्या जातो व विषयसंबंधित ही कारणाचे दोषानें विशेष ज्ञान हमुख नाहीसें केले जाते· त्यानें निरंतर उत्पन्न होणाऱ्या

॥ विवरण ॥

सादृश्यामुळे शुक्तिकान्तरत्र स्मरले जाईल? यावर नाहीं असें सांगतो 'ज्ञानकारण इंद्रियादिकांच्या' आदिशब्दानें विषय व प्रमाता त्याचे ग्रहण जाणावे· काच सादृश्य रागादि दोष शब्दाचा अर्थ आहे· 'स्मर्यते अनेन इति स्मृतिः' ज्याच्या योगानें स्मरण केले जाते ती स्मृति = संस्कार त्याचा समुद्बोध असा अर्थ· पण स्मरणाभिमानाच्या प्रमोषा(लोपा)मुळे स्मृतीला स्वतःचे विवेकज्ञान नसो· ग्रहणांतर स्वार्थी व स्मर्यमाणाहून पृथक् दाखवावे यावर नाही असें सांगतो- 'व विषयसंबंधित ही' 'दोषानें' = करणदोषकाचादिकानें· पण स्मृति व ग्रहणाच्या यौगपद्याचा अभाव असल्यामुळे क-

॥ विवरणव्याख्यान ॥

टी
उद्बोधकांचे असंभव असल्यामुळें हा अतिप्रसंग येत नाहीं असें सांगतो- 'यावर नाही' पण स्मरणाला अविवेच्यकत्व असतांही पुरोवर्ति द्रव्याशी संयुक्त इन्द्रियानें विशेषांशाचें स्फुरण संभवत असल्यामुळें अविवेक होणार नाहीं? अशी शंका धरितात- 'पण स्मरणाभिमानाच्या' विशेषांशांत प्रतिबंध संभवत असल्यामुळे नयनाला त्याचे भासकत्व नाही असें सांगतो- 'यावर नाही' पण 'विमत प्रवृत्ति पुरोवर्ति रजताच्या ज्ञानपूर्वक आहे, तिला रजताच्या इच्छाधीन पुरोवर्ति प्रवृत्तित्व असल्यामुळे सम्यक् रजताच्या प्रवृत्तीप्रमाणे' अशा अनुमानावरून अयथार्थ प्रत्ययाची सिद्धि होते? अशी शंका धरितात- 'पण स्मृति व ग्रहणाच्या' विपक्षांत बाधकाच्या अभावामुळे याला अप्रयोजकत्व आहे? अशी आशंका असतां काय ज्ञानद्वय प्रवर्तक आहे? किंवा प्रत्येक? पहिल्या पक्षीं हीं काय मिळून उत्पन्न झालेले प्रवर्तक आहेत? किंवा क्रमानें? असा विकल्प करून पहिल्या पक्षाचा निरास करितात- 'यौगपद्याचा' मनाला क्रम आ-रित्व नियम असल्यामुळें व उत्पन्न होणाऱ्या स्मृति व ग्रहणांच्या क्षणिकत्वामुळे यौगपद्य नाहीं असा अर्थ· क्रमपक्षीं निरास

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

दर्शन व स्मरणाच्या विवेकाचें कारण दोषामुळेंच दूर असलें त्या दोन वनस्पतीप्रमाणें अवधारण न झाल्यामुळें एकत्व ज्ञान झालें नसलें तरी एकत्वावभासि व्यवहार भ्रमोत्पत्ति होय. पण मग

॥ विवरण ॥

क्रमवर्तित्व असतां व्यवधानामुळें पूर्वज्ञान प्रवृत्तीला हेतु नाही. सामान्यमात्र ज्ञानापासून किंवा विशेषमात्रज्ञानापासून नर प्रवृत्ति होत नाही. त्यावर सांगतो- 'त्यानें निरंतर उत्पन्न होणाऱ्या दर्शन व स्मरणाच्या'. निरंतरोत्पत्तीच प्रवृत्तीला हेतु आहे असा अर्थ. पण ' हे रजत असें भासलें असें' संसर्ग प्रत्ययाची (बाधानंतर) प्रत्यभिज्ञा होते. यावर 'नाही' असें सांगतो- 'एकत्व

॥ विवरणव्याख्यान ॥

करितात- 'क्रमवर्तित्व असतां'. इदमाकार ज्ञानाला रजत ज्ञानाशी व्यवहितत्वामुळें प्रवृत्ति हेतुत्व नाही. कारण अव्यवहित पूर्व क्षणी असलेल्याच हेतुत्वाचा नियम आहे असा अर्थ. (परिहाराविकल्पातील) दुसऱ्या प्रत्येक पक्षीं काय 'हें' हें ज्ञान प्रवर्तक आहे? किंवा रजताचें ज्ञान? दोन्ही प्रकार नाहीत असें सांगतात- 'सामान्यमात्र'. इदमाकार ज्ञानापासून रुपाऱ्याची बुद्धी न प्रवृत्ति नसते कारण लोष्टांत ही तसा प्रसंग येतो. रजतमात्र ज्ञानापासूनही नसते कारण देशांतरीं ही प्रवृत्तीचा प्रसंग येतो. म्हणून संसर्ग ज्ञानाचा अभाव असतां प्रवृत्तीच्या असंभवाला बाधकत्व असल्यामुळें तें (=संसर्गज्ञान) आश्रयणीय आहे असा शंकेचा तर्थ. संसर्गज्ञानाच्या अभावानें प्रवृत्तीच्या असंभवाविषयी शंका घेतली असतां प्रवर्तक कोणतें सांगितलें पाहिजे, परंतु तें सांगितलें जात नाही म्हणून असंगति आहे! अशी आशंका असतां 'निरंतर उत्पन्न होणाऱ्या' यानें प्रवर्तक सांगितलें असें सांगतो- 'निरंतरोत्पत्तीच'. अंतर=व्यवधान त्याच्या रहित तें जें त्या बाधाची उत्पत्ति आहे ती निरंतरोत्पत्ति असा अर्थ. इदं ज्ञानापासून अव्यवधानानें उत्पन्न होणारें रजतज्ञान प्रवर्तक आहे असा भाव. संसर्ग प्रत्ययाविषयीं प्रत्यभिज्ञा प्रमाण आहे त्याच्याविरुद्ध हा हेतु आहे? अशी शंका घेतात- 'पण हें रजत'. प्रत्यभिज्ञा अन्यथासिद्ध आहे असा परिहार करितो- 'नाही' असें सांगतो 'एकत्वज्ञान'. एकत्व ज्ञानाचा अभाव असतांही एकत्वज्ञान झालें असा अविवेकामुळें व्यवहार आहे असा अर्थ. पण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

कटु रसाचा आस्वाद न घेतलेल्याहि बालकाला पित्तदोषामुळें मधुरांत कटु अवभास (भ्र- स्मरण म) कसा असावा? सांगतो – जन्मान्तरांत अनुभूत असल्यामुळे. अन्यथा अननुभूत

॥ विवरण ॥

ज्ञान? पण "जन्मान्तरानुभूतं न स्मर्यते" – अशा शबरभाष्यवचनावरून व स्मरण होत नसल्यामुळे ही बा- लाला कटूची स्मृति कशी? अशी शंका घेतात – 'पण मग कटु' जन्मान्तरानुभूत कटूची स्मृति कल्पिली जाते असें सांगतो – 'सांगतो' जन्मान्तरानुभवाची उपकारिता सांगतो – 'अन्यथा' जन्मान्तरीय अनुभ-

॥ विवरणव्याख्यान ॥

संस्कारमात्रजन्यत्व याहेतूच्या असिद्धिची अर्भकाच्या कटुस्मृतींत शंका घेतली ~~जाते~~ ती अनुपपन्न आहे कारण याजन्मी अनुभवाचा अभाव असतांही जन्मान्तरी कटुरसाच्या अनुभवामुळे हेतूचा संभव आहे? अशी आशंका असतां सांगतात – 'पण जन्मान्तरानुभूत' जन्मान्तरांत अनुभवाचा संभव असतांही जन्ममरणाच्या व्यवधानामुळे त्याला स्मृतिजनकत्व नाहीं, अशा शबरस्वामि वचनावरून असा अर्थ. केवळ आप्तवचनावरून जन्मान्तरी अनुभूताच्या स्मृतीचा अभाव नाहीं परंतु अनुपपत्तीवरून ही आहे असें सांगतात – 'व स्मरण' याजन्मांत अनुभवाचा अभाव असतांही जन्मान्तरीं अनुभूतत्वामुळे कटु स्मरण होते असें सांगितले ते संगत नाहीं कारण त्याला आप्तवचनाचा विरोध आहे व कल्पकाचे रा हिल्या आहे? अशी आशंका असतां, यावर आप्तवचनाचा विरोध नाहीं कारण त्याला प्रायिकाभिप्राय आहे असा सिद्धान्त करतात – 'जन्मान्तरानुभूतं' आस्वाद घेऊन युंकून गुडादिकांचे त्याग दर्शन कटुस्मृतीला कल्पक आहे असा अर्थ. पण अननु भवाची शंका उरत नसल्यामुळे (व्याख्यानांतील) "अन्यथा" इत्यादि अयुक्त आहे अशी आशंका असतां जन्मादिकांच्या व्य वधानामुळे जन्मान्तरानुभवाचा (विवरणांत) अनुपकारकत्व सांगितलेले निरसित केले जाते. असा आशय सांगतात – 'जन्मान्तरानुभवाची' अननुभूत स्मरण पक्षांत अतिप्रसंगाप्रमाणें अनुभूत स्मरण पक्षांतही अतिप्रसंग आहेच अशी शंका

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

त्व समान असतां अत्यंत असत्त्व कोणी मानणारस कोणी असणार नाहीं ? म्हणून पित्त्य मधुरत्वाच्या अग्रहणाकरितां, कटु स्मृती करितां व स्मरणाभिमानाच्या लोपाकरितां हेतु आहे. कारण हेतुभाव कार्यगम्य असतो. याने अन्य विषयाशीं इंद्रियाचा संबंध झाला असतां अन्य विषयक ज्ञानाला स्मृतित्व असणें व त्यांतील स्मरणाभिमानाचा लोप होणें सर्वत्र ख्याति आहे असें जाणावें.

॥ विवरण ॥

वाला अनुपकारकत्व असतां असा अर्थ. 'अननुभूतत्वसमान असतां' = अननुभूतत्वामुळें अनुपकारकत्वानें विशेषाभाव साम्य असतां तेथें सर्व संस्कार असतील तर स्मरणाची प्राप्ति येईल असा अतिप्रसंग येईल असा अर्थ. मग जन्मान्तरानुभूत किंचित्त्य कार्य म्हणून स्मरले जातें ? सर्व कां स्मरले जात नाहीं ? दोषबलामुळे असें सांगतो - 'म्हणून पित्त्य'. मग दोषान्य जन्मान्तरानुभूत सर्वाला कां स्मरवीत नाही ? यावर सांगतो - 'कारण हेतुभाव'. जेवढ्यांत हेतु आहे तो भाव असा अर्थ. पण 'असत्ये तत्त्वज्ञानम्' असा सांख्य शास्त्रकारानें संसर्ग भ्रम दाखविला आहे. यावर नाही असें सांगतो - 'याने अन्यविषयाशीं', 'सर्वत्र', 'असत्वतत्त्वज्ञानं भ्रमः' [ ]

॥ विवरणव्याख्यान ॥

येतात - 'मगजन्मान्तरानुभूत', 'सर्व कां स्मरले जात नाहीं' - सर्वांच्या अस्मरणांत नियामकाच्या अभाव आहे असा अर्थ. नियामकाचा अभाव असिद्ध आहे असें सांगतो - 'दोषबलामुळें'. 'दोषामुळें स्मरण' येथेंही अतिप्रसंग समान आहे असें सांगतात - 'मग दोषान्य', कटु स्मरण कार्य लिंगानें दोषाला कटु स्मारकत्व कल्पिलें जाते असें सांगतो - 'यावर सांगतो'. पण अयथार्थ ज्ञानाचा आश्रय न केल्यास सिद्धान्ताची क्षति होते अशी शंका घेतो, 'पण असत्त्व', अयथार्थ ज्ञानाच्या अभाव असला तरी त्याच्या व्यवहाराच्या बाधप्रमाणानें तें वचन आहे असें सांगतो - 'यावर नाहीं'. कल्पनागौरवामुळें ही अयथार्थ ज्ञान ग्रहण करण्यास योग्य नाहीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

यावचनांतरही. तसेंच वेदान्त्याकडूनही अविवेक वक्तव्य असतां संसर्गज्ञानाच्या कल्पनागौरवामुळे अख्यातीच युक्त आहे असा भाव.

२३।८

सिध्दान्ती- सांगतो- ही अख्याति कोणती? ख्याती (=ज्ञान) या अभाव मात्र तर नव्हे कारण तसे मानल्यास नाही. व अतिप्रसंग होईल. अन्यार्थीचे अन्यत्र प्रवृत्तीला हेतु ज्ञान. असे म्हणणे असेल तर मग जेथे प्रवृत्ती नाही. व लौकिक बाध होतो तेथे भ्रान्ति कशी? आतां अविविक्त अनेक पदार्थ ज्ञान. असें असेल तर "हें" असा व "रजत" असा अ-पासून उत्पन्न होणाऱ्या पुनः उक्त शब्द द्वयाच्या स्मृति हेतु तन्निविविक्त अवभासना मुळे त्या अवभासनाला सामान्य विशेषांस अविवेक भ्रम

॥ विवरणव्याख्यान ॥

असें सांगतो – 'तसेंच वेदान्त्याकडूनही'

१०२।१३

प्रत्ययाच्या याथार्थ्यांत (=विपक्षांत) भ्रान्तीची अनुपपत्ति बाधक आहे असें सांगतात – 'सांगतो' अख्याति भ्रम आहे असें म्हणणाऱ्यास त्याबद्दल प्रश्न करितात – 'ही अख्याति' काय ख्यातीच्या अभाव अख्याति आहे? किंवा ख्यातीहून अन्य? किंवा ख्यातीच्या विरुद्ध? असा ञ्‌ शब्दाचा अर्थ. पहिल्याचा निरास करितात – 'ख्यातीच्या अभाव' 'व अतिप्रसंग होईल?' – कांहीं ख्यातीच्या अभावाला भ्रमत्व असतां (सम्यक्स्थळी) अतिप्रसंग येतो कारण तेथे कांहीं ज्ञानाच्या अभाव असतो. सकल ख्यातीच्या अभाव पक्षांत सुषुप्त्यादिकांत ही भ्रमत्व प्रसंग येतो असा अर्थ. दुसऱ्या पक्षीं काय अ-न्यार्थीचे प्रवृत्ति हेतु ज्ञान अख्याति होय? किंवा अविविक्त अनेक पदार्थ ज्ञान अख्याति? असा विकल्प करून असतां पहिल्याचे उत्थापन करितात – 'अन्यार्थीचे' असा दोषानें दूषित करितात – 'मग जेथे?' तेथें वीतरागाच्या किंवा व्यवहा-रल्याच्या अभाव असल्यामुळे ते त्याला हेतु असे ज्ञान नाही असा अर्थ. रागयांनाही प्रवृत्तीपासून पूर्वी बाधकज्ञान दिसत असल्यामुळे त्याला हेतु ही ते ज्ञान नाही असें सांगतात – 'लौकिक?' दुसऱ्या पक्षाचे उत्थापन करितात – 'आतां अविविक्त' ज्ञानमात्राला भ्रमत्वाच्या निरास करण्याकरितां 'अविविक्त' हें विशेषण आहे 'अविविक्त' एवढें स्वरूप असतां वस्तुमात्रज्ञा-नांत अतिप्रसंग येतो त्याकरितां 'अनेक' असें म्हटले. 'अविविक्तत्व काय भेदानें अस्फुरितत्व आहे? किंवा एकत्व? असा विकल्प करून पहिल्यावर अर्थ सांगतात – 'हें असा व रजत असा' – विशेषांस अविवेक म्हणून संभवत नाही?

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

संभवत नाही. तसें भेदाच्या ज्ञानानें एकत्वज्ञान न मानणाऱ्यास विविक्त आकारद्वयाच्या अवभासनामुळे सामान्य-
विशेषांत अविवेक संभवत नाही. पण इतरेतराभावविशिष्ट, भेदविशिष्ट, वह्नित्वादिसंबंधानें विशिष्ट ज्ञान
विवेक आहे.? असें असेल तर 'गाईला दंडानें आण' येथे गाय व दंड यांत व त्यांच्या कारकत्वांत अविवेक असेल हेंही-
पण त्यांच्यांतही आनुषंगिक भेदाचें ज्ञान आहेच? असें असेल तर येथेही 'हें' अशा व 'रजत' अशा अनुक्रम शब्द-
द्वयानें अनुषक्त आकारद्वयाच्या अवभासनांत द्वित्वादि अवभास आहेच. अन्यथा सामान्याकाराहून विशे-
षाकाराच्या विवेकाच्या अनवभासनामुळे हें असेंच होईल किंवा रजत असेंच होईल. 'हें रजत' असें होणार नाहीं. पुनः प्रती-

॥ विवरणव्याख्यान ॥

दुसऱ्या शंकेचा परिहार करितात- 'तसें भेदाच्या'. न मानणाऱ्यांत हेतु सांगतात- 'भेदाच्या ज्ञानानें' काय भेद पदार्थस्वभाव आहे?
किंवा धर्म? पहिल्या पक्षी ~~(अविवेक)~~ नाही असें सांगतात- 'विविक्त' पदार्थांच्या प्रतीतीनें भेदही प्रतीत आहे
म्हणून अविवेक नाही असा अर्थ. दुसऱ्याचें उत्थापन करितो- 'पण इतरेतराभाव' भेद- वैधर्म्यादि असा अर्थ. यांनीं
रहितता अविविक्तता होय असा आरोप. असल्यास ही पुढें हें योग्य नाहीं असें सांगतात 'गाईला दंडानें' पण कर्म करण
भावानें विवेक करीत असल्यामुळे अविवेक कसा? अशी आशंका असतां सांगतात- 'त्यांच्या कारकत्वांत'
गाईतील कर्मकारकत्व व दंडांतील करण कारकत्व यांच्यांत असा अर्थ. पण तेथे लक्षणाची अप्रवृत्ति असल्यामुळे
आणल्या शिवाय? अशी शंका घेतो- 'पण त्यांच्यांतही' कर्म व करण प्रतिपादक विभक्तिद्वयावरून भेद प्रतीत
होतो असा अर्थ. सामानाधिकरण्याचें समाधान करितात- 'येथेंही' हें व्यतिरेकमुखानें सांगतात- 'अन्यथा' पण विवेक करीत
नसताही त्याला भानत्व असल्यामुळे 'हें रजत' असा प्रतिभास संभवतो? अशी आशंका असतां सांगतात- 'हें रजत'. 'हें'
आकाराहून रजताच्या पृथक्त्वाची अप्रतिपत्ति असतां विलक्षण शब्दांच्या अनुविद्धतेनें त्याचें स्फुरण होणार नाहीं असा अर्थ
पुनः काय भासमानांत अविवेक असतो किंवा अभासमानांत? पहिला पक्ष नाहीं असें सांगतात- 'पुनः प्रतीयमान'.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

समान दोन आकारांत अविवेक असत नाही. कारण त्यांचा अपुनरुक्त प्रतिभास असतो. अप्रतीयमान आका-
रांचा अविवेक ही भ्रम नाही. कारण अतिप्रसंग येतो. म्हणून अविवेक भ्रम नाही. पुन: "खण्डगौः" इत्यादि अ-
विक्त अनेक पदार्थ विषयक प्रत्यय ही विभ्रम आहेत असें प्राप्त होईल. ग्रहण व स्मरणांच्या अविवेकाचा भ्रम आहे असेंही
नाही. कारण 'नोपलभ्यमाने' असा ग्रहणस्मरणांच्या अविवेकाचा भ्रमत्व आहे. पण सामान्यविशेषादिकांत संसर्ग
ज्ञान असतें असें असेल तर तथापि अविविक्त अनेक पदार्थ ज्ञानामुळे भ्रमत्व होईल. तेथें संसर्ग प्रत्यय ही

॥ विवरणव्याख्यान ॥

'अपुनरुक्त प्रतिभास असतो' = अपुनरुक्त शब्द द्वारा विवेकाचा प्रतिभास असतो असा अर्थ. दुसऱ्याचा निरास करितात - 'अप्रती-
यमान' 'अतिप्रसंग' = सुषुप्त्यादिकांत अतिप्रसंग येतो असा अर्थ. सामान्यत: प्रतिपन्न असून विशेषत: अप्रतिपन्नांच्या
विवेकाचे अग्रहण भ्रम आहे अशी आशंका असतां (ज्ञानाच्या) अभावाच्या अनंगीकारामुळे अग्रहण संभवत नाही असें
सांगतात - 'म्हणून अविवेक' स्वाति विरुद्ध अख्याति याप्रमाणे उत्तर ज्ञानाचा पूर्वज्ञानाच्या विरोधित्व असल्यामुळे भ्रम-
त्व प्रसंग येतो. तसे ज्ञान प्रागभावाला ही प्राप्त होतो असा अर्थ. पुन: अविविक्त अनेक पदार्थज्ञान मात्र भ्रम आहे
किंवा ग्रहणस्मरणात्मक किंवा संसर्ग ज्ञान असत्कृतत्व विशेष अविविक्त अनेक पदार्थ ज्ञान किंवा बाधक ज्ञान विपर्यीकृत
अत्यंताभाव अनधिकरणत्व विशेषित? असा विकल्प करून पहिल्या पक्षाला अतिव्याप्तीनें निरास करितात - 'पुन:
खंडगौ' दुसऱ्या पक्षाला अव्याप्तीनें दूषित करितात - 'ग्रहण व स्मरणांच्या' तिसऱ्या पक्षाचें उत्थापन करितो - 'पण सामान्य'
सम्यक् स्थळीं संसर्ग ज्ञानाच्या संभवा (सद्भावा) मुळे त्यानें रहित ता विशेषित लक्षण नाही त्यामुळे तेथें अतिव्याप्ति कशी?
असा अर्थ. सामान्य विशेषादिकांत वैधर्म्य त्यानें सांगितले असें धरून लक्षणाची अतिव्याप्ति तशीच येते असें सांगतात -
'तथापि' वैधर्म्य मात्र नाही परंतु संसर्ग ज्ञान रहितत्व विशेषित अविविक्त ज्ञान भ्रम आहे म्हणून अतिव्याप्ति नाहीं? अशी
आशंका असतां विशेष लक्षणही तसें असल्यामुळे अतिव्याप्ति आहे असें सांगतात - 'तेथें संसर्ग प्रत्यय ही तर नसतो'
('तेथें' = 'खण्डगौ' इत्यादि सामान्य विशेषांत)

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

तर नसतो कारण त्याचे आलंबन असा एकद्याच्या अभाव आहे. गुणगुण्यादि संबंधच संसर्ग प्रत्ययाचे आलंबन आहे. असें अभेद तर नाहीं कारण प्रत्यभिज्ञेला एक्यालंबनत्व आहे. येथेंही 'इंरजत' असा सादृश्यसंबंधच संसर्ग प्रत्ययाचे आलंबन होईल. हें वर जसा प्रमाणे सामान्यविशेषादिकांत विवेक प्रत्यय आहेही. कारण 'इदा-न्ये शौक्ल्य' असा विवेक भासलेला आहे. तसेच (ग्रहण व स्मरणांच्या अविवेकाच्या पक्षांत) ग्रहणत्व स्मरणत्वाला स्म-र्यमाणाहून पृथक् कां दाखविणार नाही? विशेषदर्शनाच्या अभावामुळे असें असेल तर जरगृहीतमात्राचा ग्र-

॥ विवरणव्याख्यान ॥

संसर्गप्रत्ययाचें काय मुख्य आलंबन आहे? किंवा गुणगुण्यादि संबंध? किंवा दोन्ही? पहिला पक्ष नाही कारण ([illegible]) ऐक्याला अत्यंत अभेदवादित्वामुळे (वत्यामतेंच अभाव आहे) असें सांगतात- 'कारणत्याचे आलंबन.' दुसऱ्या पक्षाचे उत्थापन करितात- 'गुणगुण्यादि.' जातिव्यक्त्यादि आदिशब्दाचा अर्थ आहे. व्यभिचारा (अव्याप्ति) मुळे गुणगुण्यादि संबंधाला आलंबनत्वाचा नियम नाहीं असें सांगतात- 'नाहीं कारण.' तिसऱ्या पक्षीं गुणगुण्यादि संबंधाप्रमाणे सादृश्य संबंधही आलंबन होईल असें सांगतात- 'येथेंही.' वस्तुमुळे [illegible] असंभव आहे असा आक्षेप. उवच्या बा-धक ज्ञानविषयीकृतत्वादि पक्षाचा निरास करितात- 'हें वर जसा प्रमाणे.' अख्यातिमतांत [illegible] ज्ञान व [illegible] आहे व त्यामुळे बाधक ज्ञान विषयीकृतत्व अत्यन्ताभाव अनधिकरणत्व ही तेथे आहे म्हणून अविरोधादि आहे असा अर्थ. ग्रहणस्मरणांच्या अविवेक पक्ष आहे येथे दोषान्तर सांगतात- 'तसेंच ग्रहणाच.' 'विमत ग्रहण स्वार्थी स्मर्यमाणाहून पृथक् दाखवील त्याला ग्रहणत्व असल्यामुळे संमत ग्रहणाप्रमाणें' असें सांगितले असतां तेथे विशेषविषयत्वामुळे विवेकत्व आहे हें तर वि-शेष विषयक नाहीं असें सांगतात- 'विशेषदर्शनाच्या.' विशेष म्हणजे काय भेद? किंवा शुक्तित्वादि? पहिल्या पक्षीं काय तो 'इदं' व रजतांत आहे? किंवा नाहीं? असा विकल्प करून पहिल्या पक्षाचा अनुवाद करितात- 'जरगृहीतमात्राचा.' त्यांतही काय धर्मि प्रतियोगीचे ज्ञान यद्भेदज्ञान आहे? किंवा अन्य? असा विकल्प करून पहिल्यांत दोष सांगतात-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

ताहून भेद आहे तर भेद हि विशेष धर्मीच्या आकार किंवा प्रतियोगीच्या आकार अन्य नसलेला अवलोकित आहे. म्हणून गृहीतच भेदाकार विविक्तप्रतीत होईल. आतां धर्मी व प्रतियोगींचा आकार ग्रहीत असतांही इतरेतरांच्या अपेक्षेने तिसरेच ज्ञान भेदाला ग्रहण करविते तर सर्व पदार्थ ज्ञानांना भेद ग्रहणाच्यापूर्वी अविविक्तत्व असल्यामुळे भ्रमत्व प्रसंग येतो. आतां गृहीत मात्र हेच्या रजताहून भेद नाहीं तर ऐक्यच आहे म्हणून संसर्गज्ञानाला सालंबनता सिद्ध होते.

२४।१० पुनः स्मृतीच गवयादि स्मृतिप्रमाणे गृह्यमाणाहून स्वार्थाला पृथक् कां दाखविणार नाही? स्मरणादिमानांच्या

॥ विवरणतात्पर्यव्याख्यान ॥

'तत्र भेद हि विशेष' धर्मि प्रतियोगींच्या ज्ञानाला भेदज्ञानत्व असल्यामुळें, व धर्मि प्रतियोगीचें ज्ञान असल्यामुळे भेद ही प्रतीत होईल असा अर्थ. दुसऱ्याचा अनुवाद करितो 'आतां धर्मि प्रतियोगींचा' तिसऱ्या ज्ञानाला भेदज्ञानत्व असतां त्याच्या उदयाच्यापूर्वी सर्वज्ञान भ्रम होईल असें सांगतात - 'तर सर्व पदार्थ' (दुसऱ्या विकल्पांतील दुसऱ्या) भेदाभावपक्षाला उत्थापन करितात - 'आतां गृहीत' या पक्षांत भ्रम सिद्ध होत नाही असें सांगतात - 'तर ऐक्यच' परस्पर प्रतिस्पर्धींमध्यें इतराच्या निषेध झाला असतां अन्यतरविधीचा अनन्यगतिकत्वामुळें अंगीकार असल्यामुळें ऐक्य सिद्ध होतो असा अर्थ.

(पहिल्या विकल्पांतील) दुसरा शुक्तित्व विशेष आहे या पक्षांत शुक्तित्वरूप विशेषणविशिष्ट ज्ञान स्वविषय शुक्तिशकलाचें विवेचक आहे असें सांगितलें असें होईल. शुक्तित्वरूप धर्मज्ञानाला तर आपल्या विषय न मिळाल्या रजतांशाने विवेचकत्व असणार नाही. त्यांत विशेषांशा शुक्तित्वाचा वस्तुतः रजतत्वाहून भेदमात्राने विवेचकत्व असतां हें न रजतांना ही वास्तवाकडून भेदमात्राने त्यांच्या ज्ञानाला ही विवेचकत्व येईल असा अर्थ.

स्मरणाच्या पर्यालोचनेनें अविवेकाच्या निरास करून स्मृतीच्या पर्यालोचनेनें ही त्याचा निरास करितात - 'पुनः स्मृतीच' अथवा स्मरणादिमानाला स्मृतीचें विवेचकत्व असल्यामुळे वर्थेच त्याचाही परीक्षामुळे असें नाही? अशी शंका घेतात - 'स्मरणादि मानांच्या'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

८।३०

[सिध्दान्ती-] सांगतो- हा स्मरणाभिमान नामक कोणता ? पूर्वीच्या ज्ञानाशी संयुक्ततेने

॥ विवरण ॥ (स्मरणाभिमान [तिच्या] लोपाने)

प्रमोषा (=लोपा) मुळे असें असेल तर त्यावर सांगतात- 'हा स्मरणाभिमाननामक'. हा स्मृतितत्त्व नव्हे कारण तिच्या प्रमोष असता ज्ञानत्वाच्या प्रसंग येतो. तिच्याहून अन्य असेल तर अन्याच्या लोप असतां परिपूर्ण उत्पन्न झालेले ज्ञान स्वकार्य अर्थविवेक कसें करणार नाहीं. यांच्याहून अन्य (=अन्यानन्य) तर स्मरणाभिमान दिसत नाहीं असा भाव. पण पूर्वानुभवाशीं, त्या देशकालांत अन्यतमाशी, किंवा तोच्या आकाराशी स्वरूपाच्या संयोग स्मरणाभिमान होय. यावर नाही असें सांगतात- 'पूर्वीच्या ज्ञानाशी'. कारण 'तोहा' या प्रत्यभिज्ञा भ्रमांत तर यासर्वांच्या तो या आकाराच्याच

॥ विवरण व्याख्यान ॥

स्मरणाभिमान काय स्मृतीहून अनन्य आहे ? किंवा अन्य ? किंवा अन्यानन्य ? पहिल्या पक्षीं हि काय स्मरणाभिमानात स्मृतीत अंतर्भाव आहे किंवा स्मृतीचा स्मरणाभिमानांत ? पहिल्या पक्षी स्मृतिस्थित असतां स्मरणाभिमानत्वाचा लोप कसा ? असें सांगतात- 'हा स्मृतितत्त्व नव्हे'. स्मरणाभिमानांत स्मृतीच्या अंतर्भाव असतां तिच्या (त्या) लोप असता स्मृतीच्या होणाऱ्या लोपापुढें रजताच्या प्रतिभासत्व असणार नाहीं असें सांगतात- 'कारण तिच्या'. हुस्स्याच्या अनुवाद करून दुसरा विकल्प दाखवितात- 'तिच्याहून अन्य'. पण स्मरणाभिमानरूप संस्काराच्या लोपापुढें विवेक कसें ? अशी आशंका असतां उत्पत्ति झाली असतां ज्ञान आकार्यवलनांत अन्याची अपेक्षा नसते असें सांगतात- 'परिपूर्ण'. तिसरा पक्ष तर अप्रसिध्द असल्यामुळें दुराग्रहास्त आहे असें सांगतात- 'यांच्याहून अन्यतर'. पुनः काय 'स्मरेन अधिमन्यते इति स्मरणाभिमानः' या व्युत्पत्तीने स्मरणाभिमान शब्दाने काय स्मार्यगत धर्म विशेष सांगितला जातो किंवा स्मरणनिष्ठ धर्म ? किंवा स्मरतो असें ज्ञानी असा विकल्प असतां पहिल्या उत्थापनकरितो- 'पण पूर्वानुभवाशीं'. पण व्याख्यानांत अनुभवाशी संयुक्ततेचे निराकरण केलें जातें देशादिसंयोगाचे नव्हे 'ज्ञानाशीं संयुक्ततेने' मध्ये 'ज्ञाशि ज्ञानें' या व्युत्पत्तीनें अनुभवाचे ग्रहण केले जाते 'ज्ञायते अस्मिन्' या व्युत्पत्तीनें देशकालांचे ग्रहण केले जाते व त्यामुळे सर्वांच्या निरास होतो असें ही सांगता येणार नाही कारण तें हे हुकूम उपन्यास नाही. अशी आशंका असतां तात्पर्य सांगतात- 'कारण तो हा'.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

स्मर्यमाणाचें ग्रहणांतर्भवतें. कारण पूर्वीच्या ज्ञानाला ग्राह्याच्या विशेषणत्वानें विषयभाव नसतो.

॥ विवरण ॥

पूर्वानुभव त्या देशकालांच्या 'स्मरतो' येथपर्यंत त्यांच्या स्मर्यमाणाशी संभेद करत असतांही गृह्यमाणाशीं अविवेक दिसतो असा भाव. स्मर्यमाणांत पूर्वानुभव संयोग संभवत नाहीं असें सांगतात- 'कथंपूर्वीच्या'. अर्थे- स्मृतिसंस्कारांचे जनक जे पूर्वविज्ञान तें स्वतः ग्राह्यविशेषणत्वानें स्वतः करूनच विषयकडे जात नाहीं कारण पूर्वज्ञानाला अर्थधर्मा विषयत्व आहे. पूर्वज्ञानानें अविषयीकृत विषयांतर त्याच्या संस्कारापासून उत्पन्न झालेली स्मृति उत्पन्न होत नाही म्हणून अर्थमात्र विषय ज्ञानजन्य स्मृति अर्थमात्राला विषयकरिते पूर्वज्ञानानें अविषयीकृत

॥ विवरणव्याख्यान ॥

सामर्थ्याच्या आकाराचा, तोयाच्या संयोग करत असतां पूर्वानुभव देशकालांत अन्यतमाशी संयोग करतात असा ही अशी योजना. पण 'पूर्वीच्या ज्ञानाचा' येथें अनुभव संयोग मानल्याविना सर्केल असल्यामुळे पूर्वीहि त्यांचाच विवक्षा आहे? असें असेल तर पूर्वानुभव संयोगाच्या स्मरणादि मानल्या भावाविषयीं येथे अविवेकदोष सांगितला आहे असें सांगतात- 'स्मर्यमाणांत' कारण शब्दानें सूचविले की युक्ति संगतात- 'अर्थे स्मृति संस्कारांचे' अर्थस्मृतीचें कारण अशा संस्कारांचे असा अर्थ. काय अर्थज्ञान स्वतः करून विषयकडे जातें? किंवा दुसऱ्या करून? पहिला पक्ष नाहीं असें सांगतात- 'स्वतः करूनच' कर्म कर्तृ विरोधामुळे त्याला स्वविषयत्व नाही असा अर्थ. दुसरा पक्ष होत नाही कारण स्वसंवेदन स्वप्रकाश ज्ञान या (संवन्यांच्या) अभ्युपगमाशी विरोध येतो असें जाणावें. पूर्वज्ञानाला विषयत्व नसो? त्यावर सांगतात- 'पूर्वज्ञानानें' कारण अनुभव स्मरणांत एकविषयत्वाचा नियम आहे. असा अर्थ. ज्या अर्थी अर्थानुभवमात्र जनित संस्काराला विशिष्ट स्मृतीचें उत्पादन सामर्थ्य नाहीं त्या अर्थी तज्जनित स्मरणही अर्थमात्र विषयक आहे. असा उपसंहार करितात- 'म्हणून'. पण अर्थज्ञानाला विषयत्वाचा अभाव असतांही स्वप्रकाशत्वानें स्फुरितत्वामुळें स्मरणविषयत्व कां असणार नाही? यावर सांगतात- 'पूर्वज्ञानानें अविषयीकृत'. तेंच स्पष्ट करतात

॥ व्याख्यान ॥

मू ७।२१

स्मरणं शुद्धच अर्थाळा स्मृतिंनी भासविले. ज्ञानाने संयुक्त अर्थां ध्यानले. स्वाच्य पदावरून हेतु नाही।

॥ विवरण ॥

ज्ञानाळाहो नाहीं. अन्यथा मी कळज्ञानापासून पोतांतही स्मृति होईल. पण स्मर्यमाणांत पूर्वानुभवसंबंध (संयोग) स्वानुभवाने सिद्ध आहे? खरें आहे. पूर्वानुभवसमयीं जें अर्थावभास लिंगजन्य अर्थज्ञानसम्बन्ध विषयक अनुमानज्ञान उत्पन्न होते त्या अनुमान ज्ञान संस्कार जनित किंवा अनुभव साय संस्कार जनित स्मृति अनुभव संबंधि अर्थाला जाणविते कारण अर्थज्ञान विषयक मूळज्ञानामध्ये विशेषण अर्थाळा विषय केलें आहे. ज्याअर्थी अर्थस्मृति समनंतर अनुभव विशिष्ट अर्थ स्मृत नाच्या जननामुळे अर्थ स्मृतीत अनुभव संबंधि आहे असा विभ्रम होतो. त्याअर्थी 'शुद्धच अर्थाळा' असा उपसंहार करितात- 'स्मरणं शुद्धच' (मू) पूर्वज्ञानाने जेवढ्या मात्राळा वस्तुमात्राळा किंवा ज्ञान संयुक्त वस्तु ला-

॥ विवरणव्याख्यान ॥

सांगतात- 'अन्यथा' पण 'मी घराळा जाणतो' असें अनुभव विशिष्ट स्मरण अनुभवाळा येत असल्यामुळे त्याचा निषेध कसा? अशी शंका घेतात- 'पण स्मर्यमाणांत' उत्तराचा अंगीकार करितात- 'खरें आहे' स्मरणाळा अनुभव संबंधित विषयत्वाचा प्रतिषेध कसा केला जातो? त्यावर सांगतात- 'पूर्वानुभवसमयीं' 'अर्थावभास' ज्ञान अर्थानिष्ठ प्राकट्य सांगितले जाते. त्याळा कार्यत्व असल्यामुळे कारणाची अपेक्षा असतां आत्माश्रय ज्ञान कारणत्वाने अनुमित होते. असा अर्थ. ईश्वर (मीमांसक) मताळा अनुसरून सांगितले. सिद्धान्त मतांत तर हे अनुव्यवसाय- (शेष्य) पूर्वज्ञानाच्या अनुसरून होणारा ज्ञानविषयक (व्याख्या) निश्चय- संस्कारजनित स्मृति आहे असा भावाने 'किंवा अनुव्यवसाय' असें म्हटले, मग अर्थस्मृति अनुभव संयुक्त विषयक आहे असें कसें म्हटलें जाते? त्यावर म्हणतो मुळें असें सांगतात- 'ज्या अर्थी' फळित सांगतात- 'त्या अर्थी' पण मग कोणत्या स्मृतीळा अनुभव संयुक्त विषयत्व असतां 'शुद्धच' असें अवधारण कसें? अशी आशंका असतां सांगतात- 'पूर्वज्ञानाने' मग स्मृतीच्या अनुभव संयुक्त विषयत्वा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

विषयक केलेलें असतें. तद्‌द्वारा तज्जनित स्मृति आसक्ति. स्वच्छ ज्ञानानें संयुक्त नव्हे असा [illegible] पण अर्थविषयक स्मृति अर्थस्मृति असून ज्ञान संयुक्तविषयक स्मृति दुसरी स्मृति आहे यांविषयीं विवक्षेचा [illegible]. त्यावर उदाहरण सांगतात – 'तथाच पदावरून होणाऱ्या पदार्थस्मृतींत ज्ञानाचा संयोग दिसत नाही'. वा-
२५।८
क्यार्थ प्रत्ययाच्या विवक्षेनें जेथपर्यंत अंत्य पदाच्या उच्चारणाची परिसमाप्ति होते, तेथपर्यंत क्रमानें उ-
१८४ १८५
च्चार्यमाण पदांत एकैक पदापासून एकैकार्थविषयक ज्ञानें उत्पन्न होतात. त्यासंबंधी शङ्का दर्शवना-

॥ विवरणव्याख्यान ॥

विषयीं विवाद नाहीं त्यावर सांगतात – 'स्वच्छ ज्ञानानें संयुक्त'. अर्थमात्र ज्ञानाच्या संस्कारानें उत्पन्न झालेल्या स्मरणाला के-वल विषयत्व असून त्याला विशिष्ट विषयत्व आहे. त्यांत अर्थस्मृतीला अर्थमात्र विषयत्वाविषयीं दुसऱ्या पुढील शङ्केचा वि-ज्ञापन आकांक्षा प्रकट करितात – 'पण अर्थविषयक'. अर्थमात्र ज्ञानसंस्कारजन्य प्रत्यय अर्थस्मृति शब्दाचा अर्थ असून, अनुमान किंवा अनुव्यवसाय संस्कारजन्य प्रत्यय हा स्मृतीचा अर्थ आहे. स्मृतिमात्राला ज्ञान-[illegible] विषयत्व असतां पदांपासून पदार्थस्मृतींत त्याचा [illegible] म्हणून स्मरणमात्राचा हा स्वभाव नाहीं
१०८।१५ १०८।१५
असें सांगतात – 'त्यावर उदाहरण सांगतात'. वाक्यार्थाच्या प्रत्ययाकरितां प्रयुक्त पदवृंदापासून पदार्थबोध असा उत्पन्न केला जातो? वाउत्पन्न झालेला तो कोणत्या क्रमानें? अशी आशंका असतां सांगतात – 'वाक्यार्थ'. वाक्यार्थ-
१८४ १८५
१०८।१८
प्रत्ययाच्या विवक्षेनें पदांनंतर प्रयोग केला जातो त्या पदांचाही सकृदुच्चारणा असंभव असल्यामुळें एके-
पासून
कानंतर उच्चारिली जातात. व क्रमानें उच्चारण केल्या जाणाऱ्या गृहीतसंगतिक त्यांच्याकडून पदार्थबोध वाक्यार्थ प्रत्ययाच्या उपायत्वानें उत्पन्न केले जातात. जसें काष्ठांकडून पाक साध्य असतां त्याकरितां ज्वाला उत्पन्न केल्या जातात त्याप्रमाणें असा अर्थ. पदार्थांना तर संगतिग्रहण समयीं प्रमाणान्तरानें सिद्धत्व असल्यामुळें येथें त्यांच्या ज्ञा-नाला स्मरणत्व आहे असें सांगतात – 'त्यानंतर'. पण संस्काराच्या सद्भाव असल्यामुळें सतत 'स्मृत्युदय होईल'?

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

यामुळे दुसऱ्या संबंधी अर्थविषयक स्मृति होते. असे अभिहितान्वयवाद्यांना व अन्विताभिधानवाद्यांनाही संमत आहे.

२५।२२ पण शब्दाचा अर्थाशी हा संबंध कोणता? की ज्यामुळे शब्दाच्या दर्शनावरून अर्थाविषयी स्मृति उत्पन्न

॥ विवरणव्याख्यान ॥

अशी आशंका असतां सांगतात- 'संबंधी शब्द दर्शनापासून दुसऱ्या संबंधीची?' उद्बुद्ध संस्काराला स्मृतिहेतुत्व असल्यामुळे वस्ताला संबंधी शब्ददर्शन तंत्रत्व असल्यामुळे अतिप्रसंग नाही असा अर्थ; पदांनी सांगितलेल्या पदार्थांनाच अन्वयानें बोधकत्व जे सांगतात ते अभिहितान्वयवादी असून. पदेंच योग्य इतरांशी संसृष्ट स्वार्थाला सांगतात असे जे म्हणतात ते अन्विताभिधानवादी होत. 'विमतं जलादिस्मृति स्वबीज ज्ञान संभिन्न अर्थविषयक नाही तिला अर्थस्मृतित्व असल्यामुळे पदार्थ स्मृति प्रमाणें' असें येथें सांगितलें.

१०८।२२ संबंधी शब्ददर्शनापासून दुसऱ्या संबंधी पदार्थाचे स्मरण उत्पन्न होते असें सांगितलें तें अनुपपन्न आहे कारण शब्द व अर्थामध्यें संबंधाचें निरूपण करितां येत नाही? असा बौद्ध शंका घेतो- 'पण शब्दाचा?' काय शब्द व अर्थाचा स्वभाव संबंध आहे? किंवा कार्यकारणतालक्षण? किंवा अनुपलब्धी? किंवा देशनियम? किंवा काळनियम? किंवा संयोगादि? वृक्षत्व शिंशपात्वाप्रमाणे स्वभावसंबंध तर नाहीं कारण एका (स्वतंत्र) असलेल्या व्यक्तींत समवायाचा तेथें अभाव आहे. दुसरा पक्ष नाही कारण शब्दाच्या अर्थ कार्यत्वा विषयी प्रमाणाचा अभाव आहे. तिसरा ही नाहीं कारण अनुपलब्धीने अभाव अनुमित होतो. व अर्थाला तर भावरूपत्व आहे. म्हणून शब्द व अर्थांत अनुपलब्धी संबंधाची अनुपपत्ति आहे. चवथा ही नाही कारण जेथे स्निग्धच्छाया असते तेथें शैत्य असते असा यांच्यांत एकदेशत्वाचा अभाव आहे. कृत्तिकेचा उदय झाला असता रोहिणीचा आगाऊन अवश्य प्राप्ती प्रमाणे यांना काळनियम नाही. संयोग ही नाही. कारण शब्दाला गुणत्व आहे. द्रव्यत्व असतां ही अर्थाशी संयोग नाही कारण गुणादिकांना (=संयोगाची) न शब्दाला त्याची अनुपपत्ति आहे. याप्रमाणे दुसऱ्या संबंधाचे अभाव जाणावा. म्हणून शब्द व अर्थांत संबंधाचा अभाव असल्यामुळे दुसऱ्या संबंधीच्या ज्ञानाचें स्मरणत्व उचित नाही. असा अर्थ. पण दुसऱ्या संबंधाच्या अभाव असतां ही शक्ति संबंध आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ टिप्पणी ॥

होईल? अर्थज्ञानजननसामर्थ्यलक्षण? असें असेल तर काय स्मृतिजननसामर्थ्य लक्षण आहे? किंवा अन्य? अन्यतर नाहीं कारण पदांना पदार्थांशीं स्मृति व्यतिरिक्त दुसऱ्या (अनुभव) कार्याचा अभाव आहे. स्मृतिजननसामर्थ्य संबंध पुढेच तर स्मृतीच्याजन्म संभवत नाही. कारण अन्यत्र साहश्यादि दुसरा संबंध असतां

॥ विवरणव्याख्यान ॥

आहे? अशी शंका घेतात- 'अर्थज्ञानजनन'? शब्द व ज्ञानांत जन्यजनकत्व संबंध असून अर्थ व ज्ञानांत विषयविषयिला असा शक्तिसंबंध आहे असा अर्थ. ज्ञान शब्दाच्या स्मृति व अनुभव साधारणत्वामुळे विकल्पाच्या असरल्यामुळे असें नाही असें सांगतो- 'काय स्मृतिजनन?' 'किंवा अन्य?'= अनुभवजनन सामर्थ्यलक्षण असा अर्थ. बुद्धिस्थत्वामुळे सिद्धान्त्यांनी अनंगीकृतत्वामुळे प्रथम दुसऱ्या पक्षाला दूषित करितो- 'अन्यतर नाहीं कारण? पदार्थांना प्रमाणान्तराने सिद्धत्व असल्यामुळे पदांना त्याचे स्मारकत्वच येईल असा अर्थ. पदामात्राचे स्मारकत्व दुसऱ्यास संमत ही आहे असें. तर? इत्याद्यर्थ.

(पदार्थ)

संसृष्ट पदार्थ विशेषाला प्रमाणान्तराने अगोचरत्व असल्यामुळे पदांना त्याचे भासकत्व कसें? अशी आशंका असतां (सिद्धान्तोपपत्ति) सांगतो- (पदांना) पदार्थांशीं' संसृष्ट पदार्थांत (प्रमाणान्तराला) अनुभव अजनकत्व असतां ही (अनुभवजनकत्व असल्यामुळे) केवलांत स्मारकत्व आहे असा अर्थ. पहिल्या पक्षाला निरसन करितो- 'स्मृतिजनन'? काय ज्ञात संबंधाला स्मृतिजनकत्व आहे? किंवा अज्ञाताला? पहिल्या पक्षात दोष- कारण कार्यलिङ्गगम्य सामर्थ्य असते. त्यामुळे स्मृति झाली असतां तिने सामर्थ्य जाणले जाते वर्तमान करून (=स्मृति झाल्यानंतर) ते (सामर्थ्य) ज्ञात झाले असतां स्मृतीचा जन्म असा इतरेतराश्रय येतो. दुसऱ्या स्मृतिकरून कळलेल्या सामर्थ्य करून स्मृतीच्या जन्माचा अंगीकार असतां अनवस्था प्राप्त होते. दुसरा पक्षही नाही कारण अनुत्पन्नाला ही शब्दापेक्षा- वण असतां अर्थान्तर प्रतिपत्तीचा प्रसंग येतो. म्हणून स्मृतिजनन सामर्थ्य लक्षण संबंध योग्य नाही असा अर्थ. त्याविषयींच दुसरें दूषण सांगतो- 'कारण अन्यत्र'? साहश्यादि संबंध असतां चैत्र मैत्रांत अन्यतराच्या दर्शनाने अन्यतराचें स्मरण दृष्ट आहे. येथें तर साहश्यादिकांच्या अभावामुळे स्मरण उपपन्न होत नाही असा अर्थ. विरोध कार्यकारणभावादि 'आदि'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥ सांगतो- २५।१८

एकाचे दर्शन झाले असतां दुसऱ्यांत स्मृति दिसते. म्हणून शब्दापासून अर्थविषयी स्मृति नाही? संबंधज्ञान संस्कार व शब्ददर्शन येथे स्मृतीला हेतु आहेत. अर्थाशी संबंध विशिष्ट शब्दज्ञान नाही. कोंज्याने विशिष्टांत स्मृतिसाम-र्थ्याचा उपस्थापनामुळे विशेषणीभूत दुसऱ्या संबंधाची इच्छा केली जाई. व संबंधविशिष्ट अर्थाच्या (शब्दाच्या) दर्शनावरून अन्यस्त्वा (= पदार्थाच्या) स्मृतीत संबंधाविशेषणत्वाने स्मृति विषय दुसऱ्या (पदार्थ) योग्य पूर्वीच

॥ विवरण व्याख्यान ॥

शब्दाचा अर्थ आहे. पूर्वपक्षाचा उपसंहार करितो- 'म्हणून शब्दापासून', संबंधाच्या अभावामुळे शब्दांना अर्थबोधकता मी अनु-पपत्ति आहे म्हणून विवक्षेला बोधकत्व विवक्षित आहे किंवा अर्थबोधकत्वाभावमात्र? पहिला पक्ष उपपन्न होत नाही (अर्थ दुर्निश्चय) असें सांगतो- 'सांगतो' विवक्षामात्र शब्दार्थ आहे किंवा अर्थाची आकृति विवक्षा आहे पहिला पक्ष नाही कारण शब्द श्रवणानंतर (विवक्षा कळली नसतां) अर्थनिश्चयाचा व्यवहाराची अनुपपत्ति ये. तें. दुसऱ्या पक्षी (विवक्षेला प्रमाणत्व नसल्यामुळे तो दुसऱ्या प्रमाणावरून अर्थाची असिद्धि असल्यामुळे शब्दार्थ तेथें प्रामाण्य मानले पाहिजे असा अभिप्राय. (संबंधाभावामुळे) अर्थबोधकत्वाभावमात्र पक्षाचा निरास करितात- 'संबंधज्ञानसंस्कार', शब्दाचा अर्थाशी स्मृति-जनन सामर्थ्य (शक्ति) संबंध आहे व तो ज्ञात असता अर्थबोधक आहे. इतरेतराश्रयत्वादि दोष हि येत नाही कारण संबंध- ज्ञानापासून उत्पन्न झालेला अनवगतत्व संस्काराचा बोधकता मानलेली आहे. असा अर्थ. संस्काराच्या सद्भाव असल्यामुळे सदा स्मरण प्रसंग ही येत नाही कारण शब्ददर्शनानें उद्बुद्ध संस्काराला स्मृति हेतुत्व मानलेले आहे असें सांगतात- 'व शब्ददर्शन' पण अर्थाशी संबंधविशिष्ट शब्दज्ञानाला स्मृति हेतुत्व कां असणार नाही? त्याबद्दल सांगतात- 'अर्थाशी' विपक्षांत दोष सांगतात- 'कोंज्याने' अर्थाशी संबंधविशिष्ट शब्दज्ञानाला स्मृतिजननसामर्थ्य असतां त्याच्या हून अतिरिक्त संबंधज्ञान पाहिजे. तो तर निरूपण करणे शक्य नाही. असा अर्थ. केवळ दुसऱ्या संबंधाची प्रसक्ति नाही (शक्ति संबंध व स्मृति का उत्पन्न करित असल्यास तो ज्ञात असता) किंतु शब्दाला वैयर्थ्य ही येईल असें सांगतात- 'व संबंधविशिष्ट' पूर्वी स्वशब्दजन्य स्मरणाच्या द्वारा. अर्थाशी संबंधविशिष्ट शब्दज्ञानाला स्मारकत्व असतां विशेषणीभूत अर्थाला आधिगतत्व असल्यामुळे शब्दाला वैयर्थ्य आहे. असा

॥ विवरण ॥ (कारण व्यतिरेकाचाही अनुभव येतो. म्हणून)

ज्ञातता होईल. सादृश्यादि पूर्वसंबंधांना ज्ञान सामर्थ्य लक्षण त्याच्या अभाव असल्यामुळे सामर्थ्य संबंधाहून

(त्यांना) अर्थान्तरत्व विरुद्ध नाही. ज्ञानसामर्थ्य संबंधापासून ज्ञान उत्पन्न होत नाही. त्यांतर स्ववचनाचा

~~विरोध आहे~~

॥ विवरण व्याख्यान ॥

अर्थ, जेंव्हा स्मरणें की — संबंधी दर्शनाला दुसऱ्या संबंधीच्या स्मारकत्वांत दुसरा सादृश्यादि संबंध दृष्ट आहे. असें — तेथें

ठिकाणी ११११५

मानीतले पाहिजे की — ~~एकठिकाणी~~ सामर्थ्य संबंधाला संबंधान्तर निरपेक्ष स्मारकत्व असतां स्वतन्त्र हेतु त्याच येईल. परंतु

निवारीत आहे. किंवा दुसऱ्या ठिकाणी सामर्थ्याला सादृश्यादि संबंध आपेक्षत्वाप्रमाणें येथें ही सादृश्यादि सापेक्षत्व

साधले जाते. किंवा पूर्व संबंधाच्या अभावामुळें सामर्थ्यापासून ज्ञानाची अनुत्पत्ति साधली जाते. त्यांत प्रथम वादीती

यनाडूषित करीतात — 'सादृश्यादि'. येथें ही अक्षरयोजना — सादृश्यादिलक्षण पूर्व संबंधांना स्मृतिजनन सामर्थ्य-

दृष्ट आहे.

संबंधाहूनचें अर्थान्तरत्व तें विरुद्ध येत नाहीं. असा संबंध. सादृश्यादि पूर्व संबंधांना स्मारकत्व जरी अन्वय व्यतिरेकसिद्ध

आहे तरी त्यांना सामर्थ्यरूपत्व नाहीं कारण व्यतिरेकाचाही अनुभव येतो. म्हणून पहिल्या पक्षाची अनुपपत्ति आहे असा अर्थ.

दुसऱ्या कल्पाच्या असंभवाला उपपादन करीतात — 'ज्ञानसामर्थ्य लक्षणत्वाच्या'. ज्ञानसामर्थ्य लक्षणत्वाच्या अभावामुळें

सादृश्यादि पूर्व संबंधांना सामर्थ्य संबंधाहून अर्थान्तरत्व आहे. असा संबंध. 'अर्थान्तरत्व' — अन्योन्यत्व = शुद्ध

सामर्थ्य शीघ्र अनवस्थित त्व. ज्ञानसामर्थ्य, लक्षण = जाणविणारें ज्यांचें आहे तें ज्ञानसामर्थ्य लक्षण. त्यांचा भाव

तत्व त्याच्या अभावामुळें असा अर्थ. जरी सादृश्यादि संबंधांत अन्यतराचें स्मरण दृष्ट आहे तथापि प्रकृतांत (अ-

दूव अर्थात) संबंधान्तराची उपपत्ति होत नाहीं कारण त्याचा असंभव आहे व कल्पना गौरव प्रसंगही येतो. अ-

सा अर्थ. तिसऱ्या पक्षाचा निरास करीतात — 'ज्ञानसामर्थ्य संबंधापासून'. काय हा प्रश्न. ज्ञानसामर्थ्याचा

अविनाश करून सामर्थ्यापासून ज्ञान उत्पन्न होत नाही असें म्हणतात की. किंवा सामर्थ्यच नाहीं? असें. पहि-

ल्या पक्षीं जननी वंध्या याप्रमाणें स्ववचनाच्या व्याघात येतो. दुसरा पक्षही बरोबर नाही कारण अशाच्या अन्वयव्यतिरेक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

१४८/१९८४ ८/२३

पदार्थस्मृतींत ज्ञानाच्या संयोग दिसत नाही. कारण तसें मानल्यास ज्ञानाला ही शब्दार्थत्व प्रसंग येतो. तशी 'तोऽसौ अयमाह' अशी इष्टभ्रमगविषयक स्मृति ग्राह्य मात्र विषयक असून तींत ज्ञानाचा परामर्श नसतो. पुनः पुष्कळच ज्ञानपरामर्शशून्यच स्मृति असतात. (स्मृति) ज्ञानाच्या स्वगतही कोणी स्मरणाभिमान नामक रूपभेद भासत नाही. नित्यानुमेय-

॥ विवरण ॥

विरोध आहे. म्हणून पदांवरून पदार्थ मात्रांत ज्ञानसामर्थ्यसंबंधामुळें स्मृति उत्पन्न होते हें सिद्ध झालें.

२६/२
पण तेथें ज्ञानाच्या संयोगाचा अभाव कशावरून? त्यावर सांगतात 'कारण तसें' कारण मग ज्ञानालाही शब्दसामर्थ्य विषयत्वानें संवेद्यत्वामुळें स्मृतिविषयत्व असतां शब्दार्थत्व प्रसंग येतो. असा अर्थ. पण स्मृतिज्ञानाला त्रिकोणत्वादिकाप्रमाणे स्वगत कोणी विशेष दिसतो तो स्मरणाभिमान होय? यावर नाही असें सांगतात- 'स्मृतिज्ञानाच्या' ज्ञान नित्यानुमेय असून स्वगत रूपरहित आहे या विषयीं शबरस्वामीचें वचन
न्या. री. ११२/१२

॥ विवरणव्याख्यान ॥

वरून शब्दाच्या ज्ञानजननसामर्थ्याच्या उपलब्धीचा विरोध येतो असा अर्थ. शब्द व अर्थ यांतील संबंधाची सिद्धी होत असल्यामुळें संबंधीच्या दर्शनावरून दुसऱ्या संबंधीचें स्मरण जें सांगितलें त्याचा उपसंहार करीतात 'म्हणून पदापासून' (पदार्थ स्मृतिप्रमाणेच)
११२/८
पदार्थ स्मृतीप्रमाणे इतर स्मृतीलाही ज्ञानसंयुक्त विषयत्व नाही असें सांगितलें. तेथें दृष्टान्ताच्या असामान्यत्वाची शंका येते 'पण तेथें' शब्दाच्या शक्तिभेद कल्पना प्रसंगामुळे त्याला अर्थमात्र विषयत्व युक्त आहे असें सांगतात- 'त्यावर सांगतात' पण शब्दापासून प्रतिपन्नत्व मात्रानें ज्ञानाला शब्दार्थत्व कसें? कारण आनुषंगिक कार्यांत व्यभिचार होतो? तशी आशंका असतां सांगतात- 'कारण मग ज्ञानालाही'. स्वायगत धर्म स्मरणाभिमान आहे या पक्षाच्या निरास करण्याकरितां स्मरणगत धर्म
(पृ. १४३ वरील) पं. १३
स्मरणाभिमान आहे या पक्षापुढें ठेवतो 'पण स्मृतिज्ञानाला' कायतो विशेष प्रत्यक्ष आहे किंवा अनुमेय असा विकल्प करून पहिल्याच्या निरासाकरितात- 'यावर नाही' 'ज्ञान नित्यानुमेय असून' इत्यादि ग्रंथ स्पष्ट आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ भाष्यदान ॥

ज्ञानपक्षांतही दुसऱ्या वस्तुप्रमाणे ते स्वतःच काण्यारूपाने ग्रहण केलें जात नाही. "स्मृतुनस्य अनाकारामेव बुद्धिमनुमिमीमहे" [पू.मी.सू. १।१।५ वरील भाष्य] असें शबरभाष्यांत लिहिले आहे. 'अनाकाराम्'-म्हणजे आकारविशेषण निरूपित नाही जिचें स्वलक्षण निर्दिष्ट नाही अशा बुद्धीचें =ज्ञानाचें आम्ही अनुमान करितो असा अर्थ. म्हणून स्मृतीला स्वतः स्मरणाभिमानरूपता नाही. तिच्यांत ग्राह्यविशेषण दिसत नाही स्मरणाभिमान नाही कारण त्यांच्या स्वरूपांत काही वैकल्य नाहीं.

॥ विवरण ॥

उदाहरण देतात- 'स्मृतुनस्य अनाकाराम्' 'अनाकारां' असें म्हटलें असतां बुद्धीला =ज्ञानाला निःस्वरूपता येईल त्याकरितां 'जिच्या आकारविशेष' असें म्हटलें. पण 'घरज्ञान परज्ञान' असा तिचा आकारविशेष निरूपित आहे. त्यावर सांगतात- 'जिचें स्वलक्षण' =स्वाभाविकलक्षण असा अर्थ. पण नित्यानुमेयांतही लिङ्ग विशेषावरून हेतु (=लिङ्ग) विशेषाचें अनुमान युक्त आहे. मग हा लिङ्गविशेष कोणता! ग्राह्यविशेषण तर नव्हे असें सांगतात- 'सिद्धांतग्राह्यविशेषनिरूपितही' पण प्रमाणग्राह्यत्व स्मृतीने ग्रहण केलें जातें असा नियम कसा! कारण अधिकेंत 'हे' असें प्रतिभान होतें व स्मृतींत 'ते' असें होतें. अशी शंका असतां सांगतात- 'कारण त्यांच्या?' देशकालांच्या कथित्वरोसोतेन

॥ विवरण व्याख्यान ॥

(अनुमेयम्) ११२।१८

दुसऱ्या पक्षाचें उत्थापन करितो- 'पण नित्यानुमेयांतही?' सुगंधि धूमविशेषावरून चंदनाग्नीच्या अनुमापकत्वाप्रमाणें ज्ञाप्य (=कार्य) विशेषाला ज्ञापक (=कारण) विशेषानुमापकत्व आहे असा अर्थ. मग लिङ्ग विशेषाचेंच निरूपण करावें असें सांगतात- 'मग हा?' काय ग्राह्यविशेष लिङ्ग आहे? किंवा फलविशेषण? असा कोणता शब्दाचा अर्थ? पहिल्या पक्षाला दूषित करितात- 'ग्राह्यविशेष तर नव्हे' ग्राह्यविशेषाला दाखवितो- 'पण प्रमाण ग्राह्यत्व' हे देशकालांच्या विशेषासहित ग्राह्यविशेषण नव्हे असें सांगतात- देशकालांच्या?

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

अशा प्रमाणग्राह्यांचेच स्मृतींत ग्रहण होते. फलविशेषनिमित्त कांहीं नाहीं कारण स्मृतीचे फल प्रमाणफलाच्या विषयमात्रावच्छिन्न असते. आतां जो कोठें कदाचित् पूर्वानुभूत विषयांस स्मरतो असा अभिमान दिसतो तो जसा सास्नादिमान् आकृतींत गाय असा अभिमा-

॥ विवरण ॥

कदाचित् अपरोक्षतेनें प्रतिभास असतो प्रमेयभेद असतो असा अर्थ. मग फलविशेषाविषयीं विशेष असो याबर ११३।६ नाहीं असें सांगतात 'फलविशेषनिमित्तकही' प्रमाणफल=विषयप्राकट्य. पण 'स्मरतो' असा अनुभव स्मरणाभिमान होय? यावर सांगतात-'आतां जो कोठें' 'कोठें'=विषयविशेषांत 'कदाचित्'=कालविशेषांत जो स्मरतो (म्हणून त्याला विवेचकत्व नाहीं) असा अभिमान दिसतो तो सर्वत्र नसतो असा अर्थ. त्याविषयींच दुसरा हेतु सांगतात-'तो--वाचकशब्दाच्या'

(त्याला) जर 'मी स्मरतो' असा हा स्मृतिस्वभावसमर्थ विषयक शब्दजन्यानुपपत्ति अनुभवविशेष आहे किंवा जर हे निश्चय विषयक अनुमानज्ञानान्तर आहे. तर दोन्ही प्रकारांत 'स्मरतो' या अनुभवाच्या पूर्वींच ग्रहणादि भिन्नता होऊन स्मरणादि भिन्नतांच्या भेदज्ञानावाचून ग्रहणादि भिन्नयशब्द व्यतिरिक्त स्मरणादि शब्दानुस्मरण व अहीं दुष्यानुपपत्तिमुळे स्मरणानुमान संभवत नाहीं. कारण निर्दिष्ट शब्दानुस्मरणाला व विशिष्ट ज्ञानानुमानाला

॥ विवरणव्याख्यान ॥

दुसऱ्या पक्षाचें उत्थापन करितो 'मग फलविशेष' फलविशेषत्व असिद्ध आहे असें सांगतात-'यावर नाहीं' विषयभेदनिमित्तक फलविशेष असतो. प्रमाण व स्मृतींत तर विषयभेद नसतो. त्यामुळें फलविशेष नाहीं असा अर्थ. 'स्मरतो' असें ज्ञान स्मरणाभिमान? या (पृ. १५३ पंक्ति १६ वरील शंका) विकल्पाचे उत्थापन करितो-'पण स्मरतो' व्यभिचारा (=अपवादा) मुळे याकोदखील विवेचकत्व नाहीं असें सांगतात-'यावर सांगतात' पण स्मरतो या अनुभवाला वाचकशब्दसंयोगनिमित्तत्वमात्र येथें सांगितलें असें दिसतें त्याच्या अविवेचकत्वाविषयीं हेतु सांगितला नाहीं यावर सांगतात-'जर (त्याला) मी स्मरतो', असंभवाविषयीं हेतु सांगतात-'कारण निर्दिष्ट' (स्मरणादिकाहून) ग्रहणादिकांचा भेद कळल्यावाचून ग्रहणादिवाचक शब्दाला सोडून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व्याख्यान

न तसा वाचक शब्दाच्या संयोजनाच्या निमित्ताने असतो. म्हणून पूर्व प्रमाण संस्कारापासून उत्पन्न होत असल्यामुळे त्याच्या विषयाला भासविणे एवढेच स्मृतीचे स्वरूप आहे. पुनः

॥ विवरण ॥

विशेषाभिधेय ज्ञान निश्चित त्याचे आहे. म्हणून 'असतो' या अनुभवाच्या पूर्वीचे ग्रहण स्मरणाचा भेद सांगितला पाहिजे असा भाव. पण स्मृति व अनुभवांत त्यांना अर्थमात्रविषयत्व असल्याने भेद कोणता? त्यावर सांगतात- 'म्हणून' कारणविशेषामुळे त्यांच्यांत भेद आहे असा अर्थ. किंवा तुझे म्हणणे तरी स्मृति व ज्ञानाच्या अनुभवाला अर्थविशिष्ट ज्ञानविषयत्व समान असतां विभागज्ञान कसे? कारणाच्या भेदामुळे असे असेल तर

॥ विवरणव्याख्यान ॥

स्मरणादि वाचक शब्दप्रयोगाचा असंभव असल्यामुळे पूर्वीचा भेद सांगितला पाहिजे व तसे असतां स्मरणाभिमानाला (ग्रहणापासून स्मरणाचे) विवेचन करावे लागेल असा अर्थ. स्मृति व अनुभवांत भेदाच्या प्रसिद्धीने ग्राह्यविशेषण मानला पाहिजे? अशी शंका घेतो- 'पण स्मृति' प्रसिद्धी अन्यथा उपपन्न आहे असे सांगतात- 'त्यावर सांगतात' पण संस्कारापासून उत्पन्न होणे भेदक कसे? कारण त्याला स्मृति व (अनुमानादि) प्रमाणांत साधारणत्व आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'कारणविशेषामुळे' स्मृतीला संस्कार मात्र कारण असून ग्रहणा (दिला) ला संप्रयोगादि आहे असा अर्थ. स्मृति व अनुभवांत विषयाचे ऐक्य असतांही हेतूच्या भेदामुळे भेद आहे असे सांगितले. ते प्रतिबंदीच्या योगाने (प्रश्नाच्या परिहार साधनाने) दूर करितात- 'किंवा तुझे' स्मृति व ज्ञानानुमानांत कार्यविषयाच्या भेदामुळे भेद आहे? किंवा कारणभेदामुळे? किंवा तो मी आकाराच्या अभावामुळे? असा विकल्प करून पहिले दोषाला दूषित करितात- 'अर्थविशिष्ट ज्ञानविषयत्व समान असतां' दुसऱ्याचे उत्थापन करितात- 'कारणाच्या भेदामुळे' साम्याने समाधान करितात- 'असे असेल तर आमच्या मतांतही'

॥ टिप्पणी ॥

फ 'प्रमाणांत' संस्कारापासून उत्पन्न होणे हे भेदक लक्षणयोग्य नाही कारण ते अनुमानादि प्रमाणांत अतिव्याप्ति आहे असा अर्थ

❀ 'संस्कार [illegible] अतिव्याप्ति नाही असा अर्थ

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥ ८।१२०

प्रतीतिवरून किंवा अर्थावरून तीस अधिक कोणी अंश नसतो कीं ज्याच्या दोषानिमित्ताने लोप होईल. येथें तर पुढे अवाक्यस्त अर्थाचा प्रतिभासै होत असल्यामुळे पूर्वप्रमाणाच्या विषयाचे

॥ विवरण ॥

आमचे मतांतही तें प्रमाण आहे. तो याप्रकाराने स्मृति, ज्ञानाच्या अनुमानाहून भिन्न आहे असें असेल तर, हा तो असा आकार कोणता? परोक्ष देशकाल विशिष्टता. असें असेल तर अनुमानादिकांतही तिचा (= स्मृतीचा) प्रसंग येतो. पूर्वानुभवसंयुक्तता असें असेल तर ज्ञानानुमानांत व पौरुषेय वाक्यजन्य ज्ञानांत तिचा प्रसंग देतो. म्हणून संस्कारजन्यत्व तो असा आकार आहे. मग येथेंही त्याप्रकारचीच स्मृति असो. यावर नाही असें सांगतात- 'येथें तर पुढें'—

॥ विवरणव्याख्यान ॥

तिसऱ्याचे उत्थापन करितात- 'तो या आकाराने'. तो हा आकार दुर्निरूप आहे असें सांगतात- 'हा तो असा'. काय परोक्ष देशकाल विशिष्टत्व तो असा आकार आहे? किंवा पूर्वानुभव विषयत्व? किंवा संस्कारजन्य विषयत्व? असा कोणता शब्दाचा अर्थ. पहिल्याचे उत्थापन करितो- 'परोक्षदेशकाल'. परोक्षदेशकाल विशिष्ट विषयत्वाच्या अनुमानादिकांत ही संभव असल्यामुळे तेथेंही स्मृतित्वाच्या प्रसंग येतो असें सांगतात 'अनुमानादिकांतही'. दुसऱ्याचे उत्थापन करितो- 'पूर्वानुभव' काय पूर्वानुभवमात्राशी संयुक्तविषयत्व स्मरणाचे भेदक आहे? किंवा स्वजनक पूर्वानुभवाशी संयुक्तविषयत्व? पहिल्याचा निरास करितात- 'ज्ञानानुमानांत'. दुसऱ्याचा निरास करितात- 'पौरुषेयवाक्यजन्य'. "नदीच्या तीरावर पुष्पें आहेत" या वाक्यावरून नदीतीरावरील पुष्पविषयक ज्ञानाचा जाणला जातो. व त्यामुळे स्वजनक ज्ञानसंयुक्त विषयत्व तेथेंही (वाक्यांतही) असल्यामुळे स्मृतीचा ज्ञानानुमानाहून भेद होत नाही. म्हणून तृतीयपक्षच परिशेष राहतो असें सांगतात- 'म्हणून'. तर संस्कारमात्रजन्यत्वच स्मृतीचे भेदक येथेंही असो. असें विकल्पितो- 'मग येथेंही'. संस्कारमात्रजन्यत्व असिद्ध आहे असें सांगतात- 'यावर नाही'. (कारण येथें शेषवसंप्रयोगाचीही सामुग्री आहे असा भाव)

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

८।१२

अवभासित्व नाही असें पूर्वी सांगितलेच. म्हणून अन्यविषयाशी इन्द्रियाचा संबंध झाला असतां

अन्यविषयक जे (साक्षात् प्रत्यक्षानें) ज्ञान उत्पन्न होतें तें स्मृति नव्हे.

८।१२ प.वि. २७।५

(अख्यातिवादी-) तर अध्यास (भ्रान्ति) काय आहे? (तार्किक-) पण ही अन्यथाख्याति आहे.

॥ विवरण ॥

२७।१

स्वप्नांतही ~~गृह्यमाणांच्या~~ 'मी नीळ आहे' असा गृह्यमाण व स्मर्यमाणांचा अविवेक नाहीं व स्मर्यमाणांचा अन्योन्य अविवेक असतां परोक्षत्व सर्व प्रसिद्ध. म्हणून ज्ञानाला ग्रहण स्मृतिद्वैरा शक्य नाही. परंतु ति सर्व भ्रान्तिज्ञानही आहे. अशा भावानें उपसंहार करितात- 'म्हणून अन्यविषयाशी.'

२७।३

जर स्मृति नव्हे तर 'हे रजत' असें ज्ञान काय आहे? अशी अख्याति-

२७।५

वादी शंका घेतो- 'तर अध्यास' यावर तार्किक उत्तर देतो- 'पण ही अन्यथाख्याति आहे.'

॥ विवरणव्याख्यान ॥

११४।१५

पुन्हा स्वप्नांत काय गृह्यमाणांचा अविवेक आहे किंवा गृह्यमाण व स्मर्यमाणांचा किंवा स्मर्यमाणांचा? पहिल्या पक्षाचा निरास करितात- 'स्वप्नांतही' आत्मव्यतिरिक्त नीलादिकाला अगृह्यमाणत्व असल्यामुळे गृह्यमाणांचा अविवेक नाही, असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचा निरास करितात- 'मी नील आहे' कारण आत्मव्यतिरिक्त नीलादिकाला अगृह्यमाणत्व असल्यामुळे 'मी नील' असा प्रतिभास प्रसंगाने होईल असा अर्थ. तसेंच गृह्यमाणाशी अविवेकामुळे आपरोक्ष्य असतां स्मर्यमाणाशी अविवेकामुळे गृह्यमाणाला पारोक्ष्य कां असणार नाही? असा अर्थ. तिसऱ्याला दूषित करितात- 'स्मर्यमाणांचा' एकमताच्या निराकरणाचा उपसंहार करितात 'म्हणून ज्ञानाला'

११४।२३

परिमाण असा अर्थ. तें तर परमार्थतः युक्त होत नाही असें सांगतात – 'निरंशमध्यम' म्हणून अन्याने अन्यप्रयुक्त मध्यम परिमाणत्व आहे असें ((चैतन्याचे भेदप्रसिद्धि)) सांगतात – 'म्हणून' म्हणून भेदशून्य चैतन्य आहे असा अर्थ. भगवान् येथे दृश्याकरितां प्रपंचोपाधि भेदामुळे असें सांगतात – 'परोपाधि'. स्वप्नप्रपंचाचा चिदधिष्ठितत्वाच्या असंभवाची शंका घेतली असतां तें येथेंच उपपादनीय आहे. जागरणांत त्याचें उपपादन काय म्हणून ? अशी आशंका असतां कैमुतिकन्यायाने स्वप्नांत तें उपपन्न होतें असें सांगतात – 'जागरणांतही'. सर्व प्रपंचाला चिदधिष्ठानत्व सांगून 'अथवा' येथें दुसरे अधिष्ठान सांगितलें तें उपपन्न होत नाही. कारण त्याला (दिशा व आकाशाला) बाह्येन्द्रियाशी संप्रयुक्तत्व नाही. मनाचेही संप्रयुक्तत्व नाही कारण केवळ त्याला बाहेर प्रसक्तीचा अभाव आहे ? अशी आशंका असतां सांगतात – 'केवळ मनाला'. केवळालाही बाह्य स्मृतिजनकत्व आहे त्याकरितां 'प्रत्यक्ष' हें विशेषण आहे. मनाला सुखादि अन्य प्रत्यक्ष साधनत्वाची व्यावृत्ति करितात – 'बाहेर' 'अंगीकारवाद आहे' – मुख्य सिद्धान्त पक्ष नसल्या तरी असा अर्थ. 'पञ्चम नामादिकांत' याग्रंथाने काय अन्याही ची शंका घेतली जाते किंवा अलिंगाही ची ? पहिला पक्ष नाही कारण अन्याही ची शंका असतां सिद्धसाधन समर्थी लक्षणाची व्याप्ति सांगितली पाहिजे. परंतु तशी तेथें सांगितली जात नाही. दुसरा पक्षही नाही कारण अवस्थांत लक्षण जाणें अति-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

अध्यासाला आधार आहेत. म्हणून 'परत्र' म्हणणें विरुद्ध येत नाही. पण भंग नामादिकांत ब्रह्माचा अ-ध्यास कसा? येथें कसा? असें काय म्हणून विचारले जातें? तेथें कारणदोष नाही व मिथ्यार्थाचा अव-

॥ विवरण ॥

भासगोचरत्व आहे. असा अर्थ: 'सर्वत्र अध्यासाला' 'सर्वत्र' स्वप्न शोकादिकांत जेथें बाह्येंद्रियें नसतात तेथें अव्याप्तीचा परिहार केला. आतां मिथ्या, अध्यास, भ्रान्ति, अविद्या प्रसिद्धांचा अभाव असतांही दुसऱ्याचा दुसऱ्याच्या ठिकाणी भास असतांना म्हणून तेथें लक्षणाची अतिव्याप्ति होते? असा आक्षेप घेतो- 'पण भंग नामादिकांत' पण जर तेथें लक्षण आहे तर ते लक्ष्य ही आहे ची अशी शंका घेतात- 'येथें कसा?' दुष्ट कारणजन्य ज्ञानविषयत्वाचा अभाव असल्यामुळे अध्यासत्व नाही असें सांगतो- 'तेथें' अध्यासत्वाच्या अभावाविषयीं दुसरा हेतु सांगतो- 'मिथ्यार्थाचा अवभास होत नाही' मिथ्यार्थ ज्ञानाला अध्यासत्व प्रसिद्ध आहे. नामांत तर ब्रह्मदृष्टीला मिथ्यार्थविषयत्व नाही. कारण नामांत ब्रह्माला सत्यत्व आहे. असा अर्थ- दुसऱ्याचे दुसऱ्या-

॥ विवरणव्याख्यान ॥

अभिप्राय- येथें तर (साधनसमर्थ) लक्षणाचा अभावच सांगितला जातो. तेव्हां अतिव्याप्तीची शंका कशी? म्हणून 'पण भंग' इत्यादि ग्रंथ असंगत आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'अव्याप्तीचा' पण नामांत ब्रह्मदृष्टीला अध्यासत्व असल्यामुळे अतिव्याप्ति कशी? अशी आशंका असतां सांगतो- 'मिथ्या' पण अध्यासत्वामुळे सदसद्विलक्षणत्वरूप मिथ्यात्व त्याला आरोपणीय आहे? त्यावर तेंच अ-सिद्ध आहे असें सांगतो- 'अध्यास' ब्रह्मदृष्टीच्या नामांत प्रक्षेप असल्यामुळे त्याला अध्यासत्व आहे? अशी आशंका असतां सांगतो- 'भ्रान्ति' अध्यासाला भ्रान्तित्व असल्यामुळे त्याला त्याच्याहून वैषम्य असल्यामुळे असेंही असा अर्थ. ज्ञानानें अनिरस्यत्वामुळे भ्रान्तित्व नाही असें सांगतो- 'अविद्या' यांचा तेथें अभाव असल्यामुळे तिला अलक्ष्यत्व असून तेथें लक्षणाची अव्याप्ति दाखविण्याकरितां स्वरूप लक्षण सांगतो- 'दुसऱ्याला दुसऱ्याचा' 'पण जर' येथून 'कारण नामांत ब्रह्माला सत्यत्व आहे' येथपर्यंतचा ग्रंथ स्पष्टार्थ आहे. लक्षणाच्या ठिकाणीं लक्ष्यत्वामुळे अतिव्याप्ति नाही असें दाखविण्याकरितां लक्षण सांगतात- 'दुसऱ्याचें दुसऱ्या रूपानें' अथवा असिद्धत्वामुळें हें लक्षण नाही?

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

भासहीं नाहीं म्हणून. खरें आहे म्हणून त्य विधिवशानेमुळे व इच्छेस्तव मनुष्यत्व असल्यामुळे ही मानसी क्रिया आहे; ज्ञान नव्हे. दुष्ट कारणजन्य ज्ञानाचा तर विषय मिथ्या अर्थ असतो; व ज्ञान तर इच्छेप्रमाणे उत्पन्न करणे किंवा निवृत्त करणे शक्य नसते. कारण ज्ञान कारणाधीन असल्यामुळे

॥ विवरण ॥

म्हणजे ज्ञान अध्यास लक्षण आहे; हे तर अन्याची अन्यत्र मानसी क्रिया आहे अशा रीतीने अध्याहीत्या परिहार करितात - 'खरें आहे' इत्यादि. अध्यासत्वाच्या अभावाचा अंगीकार करितात - 'खरें आहे' म्हणजे त्याला अपि आहे? नाहीं असें सांगतात - 'म्हणून त्य' म्हणून याद्वाच्या अर्थ सांगतात - 'विधिवशामुळे' ज्ञान नसे मुळे काय? त्यावर सांगतात - 'दुष्टकारणजन्य' मिथ्यार्थ विषयक ज्ञानाला अध्यासत्व असते. नामांत ब्रह्म दृष्टीला तर ज्ञानत्वाचा अभाव आहे म्हणून तेथें लक्षण जात नाही. असा अर्थ. पण ज्ञानाच्या येथें निषेध केला जातो? यावर नाहीं असें सांगतात - 'व ज्ञान तर' विधिजन्य पुरुषेच्छा प्रयत्न निरपेक्ष च सर्वत्र ज्ञानाचे पुष्कल कारण असते. कारण इच्छा नसतांनाही अनिष्ट ज्ञान दिसते. म्हणून विधाना मुळे ही मानसी क्रिया आहे असा भाव. ज्ञानाला इच्छेने असाध्यत्व सांगि.

॥ विवरणव्याख्यान ॥

मग अशी आशंका असतां 'खरें आहे' असें त्याचे अंगीकरण अनुपपन्न आहे? अशी आशंका असतां त्या स्वरूपें सांगतात - 'दुसऱ्याचें दुसऱ्या स्थानें ज्ञान' या अध्याहाराचा उपसंहार करितात - 'अध्यासत्वाच्या अभावाचा' येथें लक्षण जात नाहीं. येथपर्यंतचा ग्रंथ स्पष्टार्थ आहे; पण विहित असतांही ज्ञानत्व कां असणार नाहीं? अशी शंका घेतो - 'पण ज्ञानाचाच' प्रसिद्ध ज्ञानाशीं वैलक्षण्यामुळे हें ज्ञान नव्हे असें सांगतात - 'यावर नाहीं' पण स्वकारणाधीनत्वाने इच्छेच्या अनुवर्तनाच्या नियमास कसा केला जातो? कारण इच्छेच्या पूर्वी ज्ञानकारणास असंभव आहे? अशी आशंका असतां सांगतात - 'विधिजन्य' 'पुष्कल कारण' - विषयेन्द्रियसंयोगादि'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥ इच्छेने

त्यांत इच्छेचा अनुप्रवेश उपपन्न होत नाही. पण स्मृतिज्ञान उत्पन्न होत असल्याने व मनोनिरोधाने निरुद्ध होत असल्याचे दिसते? खरें आहे, परंतु स्मृतीच्या उत्पत्ति व निरोधांत इच्छेचा व मनोनिरोधाचा व्यापार नाही. तर स्मृतिकारण मनाच्या व्यापारांत व त्याच्या प्रतिबंधांत आहे. तसा नेत्रा-च्या उघडण्यांत व झांकण्यांत इच्छेचा व्यापार आहे. ज्ञानोत्पत्तींत नाही. म्हणून सिद्ध—

॥ विवरण ॥

तेथे त्यावर आक्षेप घेतो— 'पण स्मृतिज्ञान' देवदत्तादि तीरांचे स्मरण इच्छेने उत्पन्न होते असल्यानेच दुष्ट देशाचे स्मरण निरुद्ध होत असल्याचे दिसते असा अर्थ. स्मृत्युत्पत्ति व निरोध समयीं इच्छा व मनोनिरोधाच्या सद्भाव मताच्या अंगीकार करितात— 'खरें आहे' मग ज्ञान कोठून उत्पन्न आहे? त्यावर नाही असें सांगतात— 'परंतु स्मृतीच्या' 'मनोनिरोधाचा'— इच्छापूर्वक मनोनिरोधाचा. उपनय व निगमनांत सांगितलेल्या हेतूच्या अ-भावाची आशंका घेतली असतां सांगतात— 'ज्ञानोत्पत्तींत नाही' कारण इच्छा न असतां नाही दुर्गंधादि बोध

॥ विवरणव्याख्यान ॥

पण इच्छा असतांना स्मरण दिसते? त्यावर सांगतो— 'देवदत्तादि' ज्ञानाच्या कारणांत इच्छेचा साधनत्व संभवत असले तरी ज्ञा-नांत नाही असें स्पष्ट सांगण्याकरिता ज्ञानकारणांतहि साधनत्वाचा अंगीकार करितात— 'स्मृत्युत्पत्ति' 'समयीं' -त्ति व तिच्या निरोधाच्या वेळीं त्याच्या

स्मृत्युत्पत्ति ~~समयीं तिच्या~~ कारणांत असा अर्थ. भाव न जाणल्यामुळे शंका घेतो 'मग ज्ञानाला' परंतु ज्ञानांतहि साधनत्व नाही हें अभीष्ट सांगतात— 'त्यावर नाही' 'उपनय व निगमनांत'— येथें प्रयोग असा— 'आक्षिज्ञान इच्छाधीन नाही' (ही प्रतिज्ञा) त्याला ज्ञानत्व असल्यामुळे (हा हेतु) संमत सम्यक् रजतादि ज्ञानाप्रमाणे (हें उदाहरण) हें देखील ज्ञान आहे (हा उपनय) म्हणून तें इच्छा अनधीन आहे (हें निगमन) 'उपनयनिगमनांत'— हें देखील ज्ञान असल्यामुळे इच्छा अ-नधीन आहे. या उपनय व साध्यांत जो हेतु 'ज्ञानत्व असल्यामुळे' हा सांगितला तोच ज्ञानाला पुरुषाधीनत्व असल्यामुळे

॥ व्याख्यान ॥

नष्टते मुळे फळाकरितांच केवळ ब्रह्मदृष्टि नामादिकांत अध्यासित केली जाते जशी शगमिळूनी करितां परस्त्रींत मातृबुद्धि. म्हणून अशारीतीनें 'स्मृतिरूपः परत्र पूर्वदृष्टावभासः' हें अध्यासाचें लक्षण निर्दोष आहे.

॥ विवरण ॥

दिसतो असा अर्थ. पण अध्यासांत ब्रह्मदृष्टि करणे अनर्थक आहे ? अशी आशंका असतां सांगतात– 'म्हणून विद्विनष्टते मुळे?' 'केवळ'– ज्ञानस्वरूप नसलेली. परम प्रकृताच्या उपसंहार करितात– 'म्हणून अशा रीतीनें'

पण अध्यासाविषयीं वाद्यांची विप्रतिपत्ति दिसत असल्यामुळे एकरूपानें लक्षणाची व्यवस्थापना करणे शक्य नाही ? अशी आशंका असतां, अधिष्ठान व अध्यस्यमानांच्या स्वरूप, तत्त्व, देशकाळ, विशेषांतच वाद्यांची

॥ विवरण व्याख्यान ॥

कारण इत्यर्थः

अविरुद्ध आहे ? अशी आशंका असतां, ज्ञानाच्या इच्छा अनर्थी असल्यामुळे तो विरुद्ध आहे असें उत्तर सांगतात ~~असा अर्थ~~ 'परम प्रकृताचा'– अव्याप्ति अतिव्याप्तींच्या निरास केल्यामुळे असा भाव.

पण लक्षणाच्या कथना नंतर संभावनेच्या उपन्यास उचित आहे. मतांतराच्यानंतर उपन्यास उचित नाही ? अशी आशंका असतां 'लक्षणाच्या परिशुद्धीकरितां' असें व्याख्यानांत सांगितलें तें अनुपपन्न आहे, कारण अध्यासिद्धिकाच्या अभावानें लक्षण शुद्ध आहे ? अशी आशंका असतां लक्षणांतच असंभावनेच्या निराकरणाच्या अभिप्रायानें मतांतराचा उपन्यास आहे असें तात्पर्य सांगतात– 'पण अध्यासविषयीं' काय अध्यासमात्रांत विप्रतिपत्ति आहे ? किंवा त्याच्या अधिष्ठानादिकांत ? ~~असा विकल्प करून~~ दुसऱ्याचा अंगीकार करितात– 'अधिष्ठान' हा अर्थ– अधिष्ठान व अध्यस्यमानाचें सत्त्व आहे असे सद्वादी म्हणतात. असत्त्व आहे असे असत्वादी म्हणतात. अशी स्वरूपांत विप्रतिपत्ति. अधिष्ठानाचें सत्त्व असले तरी त्याचें जडत्व किंवा अजडत्व अशी तत्त्वाची विप्रतिपत्ति. अध्यस्यमानाचेंही काय शून्यत्व आहे ? किंवा मायत्व ? किंवा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥० भाष्यभाग ॥

'तं केचित्' इत्यादिकाने स्वमताच्या परिशुद्धीकरितां अध्यासाच्या स्वरूपांत मतान्तराचा।

विवरण

विप्रतिपत्ति आहे. 'दुसऱ्याचा दुसऱ्या रूपाने अवभास' मात्र लक्षणांत विप्रतिपत्ति नाही व ते लक्षण लौकिक सामान्य विशेषादि संसर्ग प्रत्ययांच्या भ्रमत्वाच्या परिहाराकरिता 'सत्याचा मिथ्यावस्तुशी ऐक्यावभास' असें लोकरूढ प्राप्त होते. असा अंगीकार करून दुसऱ्या मतांच्या उपन्यास करितात असें सांगतात- तं केचित् इत्यादिकाने 'स्वमताच्या' पहिल्यांतर आत्मख्याति

॥ विवरणव्याख्यान ॥

बुद्धि? किंवा दुसरे? अशीही तत्त्वविप्रतिपत्ति आहे. अध्यस्यमानाचा काय अन्यदेशकाळ नाही किंवा ही अशी देशकालांत विप्रतिपत्ति आहे. याहि त्या पक्षाला दूषित करितात- 'दुसऱ्याचा' पण दुसऱ्याच्या दुसऱ्या रूपाने अवभासमात्रांत विप्रतिपत्तीच्या अभाव असतांही सत्यानृतमिथुनीकरणरूपत्व हें तुमच्या इष्ट कसें सिद्ध होते? अशी आशंका असतां सामर्थ्यावरून (अर्थापत्तिवरून) सिद्ध होते असें सांगतात- 'वैलक्षण्य' पण ज्ञानाकार किंवा बाहेर देशान्तरी असलेल्या रजतादिकांच्या शुक्तिकादिकांत अवभास' असें मानल्यावर स्पष्टच ते अर्थापत्ति आहे कारण ज्ञानाकारत्व व बाहिरत्व एकानेमानलेले नाही? अशी आशंका असतां मतभेदाने अविरोध सांगतात- 'पहिल्यांतर' 'आत्मख्याति' बौद्धांत चार प्रकार असून ते भिन्न भिन्न भावनेने परम पुरुषार्थ मानतात. त्यांत १ माध्यमिक शून्यवादी- बाह्य व आंतर सर्व शून्य मानतात. हे असत्ख्यातिवादी होत. २ योगाचार विज्ञानवादी- बाह्य अर्थ शून्य असून आंतर क्षणिक विज्ञान मानतात. ३ सौत्रान्तिक- बाहेर पदार्थ सत् असून ते क्षणिक विज्ञानाने = ज्ञानगत अर्थ साकाराने अनुमेय असल्याने म्हणतात. व ४ वैभाषिक- बाहेर पदार्थ सत् असून ते प्रत्यक्ष आहेत असें मानतात. त्यांत पहिल्या माध्यमिक सर्व शून्यवाद्याखेरीज इतर तीन बौद्ध आंतर क्षणिक विज्ञान सत्य मानतात. ते आत्मख्यातिवादी बौद्ध होत. हें रजत आंतर क्षणिक विज्ञान ज्याचा धर्म आहे (-स्वरूप आहे) असें असून ते दोषबळाने बाहेर शुक्तीवर इदंतेने प्रतीत होते. तें बाहेर उत्पन्न होत नाही. कारण भ्रान्तीत ज्ञानाकार सदृश बाहेर पदार्थ नसतो. तर तो आंतरच असतो असें मानतात. वैभाषिक- बाहेर पदार्थ सत् असून ते प्रत्यक्ष मानीत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरणव्याख्यान ॥

असल्यामुळे त्यांच्या मतांत जसे बाह्य अधिष्ठान प्रत्यक्षसिद्ध होते त्यांचें सौत्रान्तिक मतांत सिद्ध होत नसले तरी विज्ञानाने प्रत्ययवैचित्र्यामुळे ते बाह्य अधिष्ठान अनुमेयसिद्ध होते. विज्ञानवादियोगाचार मतांत – बाह्यवस्तु सत् नसली तरी अनादि वासनेने प्रेरित असत बाह्यवस्तु असत् नतिच्यावर ज्ञानाकाराचा आरोप होतो. अर्थात् ज्ञानाकाराचा बाहेर अवभास हि भ्रम आहे असें हे म्हणतात. अशी असत्ख्यातिसंबंधी ही उपपत्ति — 'बौद्ध' – अत्यंत असत् नरशृङ्गादिकांचा प्रतिभास होत नसल्यामुळे व जें जसें भासते तें तसें च असते असा सामान्य नियम आहे. परंतु या रजताचे अन्यथात्व तर बळवान् बाधक प्रत्ययबळावर प्राप्त होते म्हणून व 'हें रजत नव्हे' या बाधानुभवाची हे त्वमात्र बाधाने उपपत्ति होत असतां त्याला रजतविषयक मानणे उचित नाही. कारण तसें मानल्यास रजत धर्मीच्या न 'हे' त्व धर्मीच्याही बाधांत गौरव दोष येतो. म्हणून प्रतिषिद्ध हे त्वमात्र असतें अर्थात् आंतर ज्ञानाकार सिद्ध होते. पण 'हे' त्याचा प्रतिषेध आला असतां त्याची 'अहं' तेने बाह्य देशान्तरीं व्यवस्था उपपन्न होत असतां त्याला विज्ञानाकारता कशी? हें बरोबर नाहीं कारण आलंबन असतां अपरोक्षानुभवाची अनुपपत्ति. म्हणून अपरोक्ष संविदेच्या अवश्य आश्रय केला पाहिजे. 'रजत ज्ञानाकार आहे' संप्रदायाचा नुसता अपरोक्ष होत असल्यामुळे संवेदना प्रमाणे – असें. सिद्धान्ती – हें अध्याहृत योग्य नाहीं. कारण जें म्हटले कीं – अत्यंत असताच्या प्रतिभास होणे शक्य नाहीत – रजताच्या अंतराकार असताही अवश्य आश्रय करणे प्राप्त होते. कारण असत् अशाच्या बाह्यतेच्या प्रतिभासाचा अंगीकार केला आहे. म्हणून तें अयुक्त आहे. आतां जें म्हटलें कीं – जें जसें भासते ते तसें च असते तो अंश आम्हास मान्य च आहे. आतां जें हे त्वमात्राच्या बाधाने बाधाची उपपत्ति होत असतां स्वल्प गौरव दोषामुळे रजतविषयक मानणे उचित नाहि असें म्हटले तरी उत्तर आहे. कारण कल्पनेंत गौरव दोष असतो. येथें तर रजताच्या अपबाध कल्पनाही. कारण 'हें रजत' अशा प्राप्त रजताच्या अनुवादाने 'हें रजत नव्हे' असा त्याच्या अपलाप बाधानुभवाचा स्वतः अनुभव येतो. पुनः हे त्वमात्राच्या अपवाद झाल्यास रजत आंतर तेनें अवशेष असल्यामुळे 'भी रजत' असा प्रत्ययाचा प्रसंग येतो. आतां जो ही – अति अपरोक्षाच्या अपेक्षेतच्या अनुपपत्तीमुळे अहंतेने बाह्यदेशान्तरी अवस्थानाचा निषेध केला तो हि आम्हास अनुकूलच आहे. जरी – 'रजताच्या अपरोक्षतेकरितां अपरोक्ष संविदेच्या अवश्य आश्रय केला पाहिजे' असें.

॥ टिप्पणी ॥

म्हणजे – हजार ... आहे

तं केचिदन्यत्रान्यधर्माध्यास इति वदन्ति । केचित्तु यत्र यदध्यास-

उपन्यास करितात- कसा? 'तं'= त्या अध्यासाला 'केचित्'= कोणी 'अन्यत्र'= शुक्तिकादिकांत 'अन्यधर्माध्यासः'= अन्य ज्ञानाकाराहि धर्म (=स्वरूप) आहे ज्याचा अशा अर्थान्तराचा = ज्ञानाकार किंवा बाहेर देशान्तरी असलेल्या रजताचा 'अध्यासः'= बाहेर प्रमाणे किंवा समोर प्रमाणे शुक्तीशी अभेदाने अवभास' इति= असे (आत्मख्यातिवादी बौद्ध किंवा अन्यथाख्यातिवादी तार्किक (पुरःपृष्ठ रूप))

॥ विवरण ॥

व अन्यथाख्याति विशेषाचा उपन्यास आहे असे सांगतात- 'त्या अध्यासाला' किंवा 'अन्यधर्माध्यासः' म्हणजे ...
'अन्यत्र' बाह्य शुक्त्यादिकांत 'अन्यधर्माध्यासः'=
विशेष 'अन्यस्य धर्मः'= अन्य=बुद्धिरूप आत्मा त्याचा धर्म आंतर रजत बुद्ध्याकार 'तस्य'= त्याचा 'अध्यासः'= अध्यास
अन्यत्र शुक्तिकादिकांत
= बाहेर प्रमाणे शुक्तीशी अभेदाने अवभास. असे आत्मख्यातिवादी बौद्ध म्हणतात. व 'अन्यधर्मस्य'= अन्य=स्थाव-
यव आहे धर्म ज्याचे अशा देशान्तरी असलेल्या रजताचा 'अध्यासः'= शुक्तीशी तादात्म्याने अवभास अन्यथाख्याति-

विवरणव्याख्यान अयुक्त तेन

म्हणजे तशी संविदैक्य नसताही बहिष्ठत्वाप्रमाणे अपरोक्षता संभवत असल्यामुळे परास्त होते. पण अपरोक्ष संविदैक्यावाचून अ-
न्यथा अपरोक्षत्वाची अनुपपत्ति आहे. नाही व पस्तेत प्रमाणे (किंवा रजताच्या अनिर्वचनीयतेने) तिची उपपत्ति होते. पुनः जर आरोपित
वस्तु आंतर असेल तर गुंजापुंजादिकांच्या ठिकाणी अग्नीचा समारोप असतां देहदाह प्रसंग येतो. किंवा म्हणून गल्यंतर नसल्यामुळे
अनिर्वचनीय प्राप्त होते. अग्नीतीने 'रजतज्ञानाकार आहे संप्रयोगावाचून अपरोक्ष असल्यामुळे संवेदना प्रमाणे' हे वरील अनुमान
अनिर्वचनीय रजतांत व्यभिचाराला प्राप्त होते. म्हणून आत्मख्यातिमताला अंगीकार अज्ञानमूलक आहे असे सिद्ध आहे.

'अन्यथाख्यातिवादी तार्किक'— रजताच्या अधिष्ठानामुळे पुढील वस्तु विषयांत असलेल्या प्रवृत्तीचा प्रतिपाद्य असतां व रजताच्या आ-
पृ. १
रोप अवश्य आश्रयणीय असतां असत्य असत अयोग्य प्रतिभासांना संभवत नसल्यामुळे व बाधाच्या विरोधामुळे प्रतिभासा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

१. विवरणव्याख्यान ॥

प्र. २
प्रमाणे सत्याची अनुपपत्ति असतां अवश्य हें आश्रयणीय आहे कीं — शुक्तिशकलकाच्यादि द्रव्यानें दूषित नेत्राने अवलोकिते अर्थान्तर

प्र. ३
रजतरूपानें भासते. अशी म्हणतां येणार नाही की — 'हें रजत नव्हे' या बाधज्ञानामुळे रजताचें अत्यंत असत्त्वच आहे. कारण

तो बाध सन्निहित 'हें' त्याकाराशी तादात्म्याच्या निषेधामुळे असंनिहितताच रजताचें सामर्थ्यावरून प्राप्त होईल. आत्यन्तिक

प्र. ४
असत्ता तर नव्हे. कारण जें असें भासतें तें तसेंच असतें असा स्वाभाविक न्याय आहे. परंतु त्याच्या अन्यथाभावाचा सर बळवान् बा-

प्र. ५
धक प्रत्ययाच्या प्रतिबंधामुळे आश्रय करावा लागतो. तो तर 'हें' त्याकाराच्या तादात्म्य निषेधरूपानें उपपन्न झाला, प्रसक्त

प्रतिषेध आला असता परिशेषाने प्राप्त झालेली पुनः त्या रजताची प्रदेशान्तरी सत्ता कशी नाहीशी होईल, सर्वत्र असत्त्व

प्र. ६
बाधामुळे असंप्रयुक्त रजताकाराच्या अपरोक्ष विषयभावाची अनुपपत्ति आहे हें सांगणे व्यर्थ आहे. कारण स्मरणामुळेच

त्याचा आकार ग्रहण झाला नाही. अशा शुक्तिशकलावर रजताकारानें अपरोक्ष प्रतिभासाच्या विषयभाव आहे असें मानला आहे.

प्र. ७
त्याच्या रजतरूपाने प्रतिभासाच्या विषयत्वाविषयीं प्रमाण अनुमान आहे — 'विवादस्थान शुक्तिशकल रजताकारानें भासते. र-

होत
जतार्थीच्या नियमानें प्रवृत्तीचा विषय होत असल्यामुळे जसें उभय वादींच्या विवादाचा विषय नसलेलें रजत ? व 'हें रजत नव्हे' या

प्र. ८
बाधापूर्वी उत्पन्न झालेलें 'आतां पर्यंत हें रजत भासलें' हें प्रत्यभिज्ञान ही याच अर्थाला अनायासे जाणवितें. सिद्धान्ती

उत्तर
जें म्हटलं 'अशक्य' म्हणून त्याचा प्रतिषेध संभवत नसल्यामुळे व बाधबुद्धीच्या विरोधामुळे भासणारा प्रमाणभूत अनुपपत्ति असतां शुक्तीच

अर्थान्तर रजतरूपानें भासतें असें म्हटलें ते देखील चातुर्याचा परिणाम करीत नाही. कारण त्यांचे जर असत्ताचा प्रतिभास नाही तर 'हें' त्या

काराच्या बाळा रजतरूपता कशी भासावी? कारण रजताचे स्वरूपाने सत्त्व असलें तरी त्याची 'हें' अंशाशी तादात्म्यानें सत्ता तात्त्विक

नाही. कीं ज्यानें 'हें रजत' अशा अनुभवाच्या विषयत्वाला ते प्राप्त होईल. ती तात्त्विक मानल्यास बाधबुद्धीला निरालंबनता प्राप्त होते.

होते
व पाहिल्या भ्रान्त प्रत्ययाला प्रतिभासाच्या अनुसार अर्थसद्भावामुळे प्रामाण्य, परंतु मागील बाधक प्रत्ययाला त्याच्या (अर्थाच्या)

अभावा प्राप्त होते
अभावामुळे अप्रामाण्य, असा भ्रान्ति बाधकाविषयीं विपर्यय प्राप्त होतो. पण 'हें' काराच्या बाळा रजतरूपता चीही अन्यत्र सत्ता

असल्यामुळे तिला अनुभवविषयत्वाचे संभवत नाही. परंतु रजतादिकांची आकाशकमलाप्रमाणे अत्यंत असत्ता

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥ व्याख्यान ॥

असत्या अवभासं संभवत नाहीं. म्हणून आमच्या वर असत्ख्यातीचा अंगीकार नाहीं. मग काय 'हे' काशाचा स्पष्टी-
रजताकार अन्यथा सत् आहे. म्हणून काय तो येथें ही आहे! पहिल्या पक्षीं असंत असताच्या प्रतिभासाच्या रुसा नाहीं कारण
रूपान्तराची सत्ता रूपान्तराच्या आत्यन्तिक असत्तेला नाहीशी करीत नाहीं. कारण सत्तामात्रानें तर आकाशकमळ ही अ-
सत् विलक्षण नव्हेल. दुसऱ्या पक्षीं ही बरोबर [= बाधबुद्धीचा निरालंबनता, भ्रान्तिबाधांना विपर्यय यामुळे त्यांच्या संबंध
करायचे नाहीं? असे म्हणणे असेल कीं — अभाव नावाचे कोणी भावाहून अन्य नाहीं. तर अवश्य दुसऱ्या भावरूपाने
अभाव स्वरूपाने भास होते. असे म्हटले आहे कीं — 'भावान्तरमभावो हि कयाचित्तु व्यपेक्षया [ ] असें व 'भावान्तर
मभावोऽन्यो न कश्चिदनिरूपणात्' असें. म्हणून असत् वाही सद्रूपाने निरूपण करिता येतें असल्यामुळे त्याला अनुभव-
विषयत्व युक्त आहे. परंतु निरूपण करिता येत नसलेल्या 'असंत असद्वादा नाहीं. म्हणून आमच्या वर असत्ख्याति
ढुकता येत नाहीं. पण जर निरूपण करिता येत नसेल व अनुभवाचा विषय नसते तर काय आतां शुक्तिकेचे रजतरूपाने निरूपण करिता
येतें कीं ज्यामुळे ती अशा अनुभवाचा विषय होते? होय. मग तिच्या रजतरूपाने अवभासही निरूपण करिता येत असल्यामुळे स-
मीचीन विषय करणारा समीचीन आहे. म्हणून विभ्रम नाहीं व बाधित ही होणार नाहीं. खरें आहे 'हे' त्वाकाराने व रजत
पाणी अन्योन्य अभावात्मक असती राजरुप्यांना तादात्म्याने विषय करील. परंतु अन्योन्य रूपाने विषय करीत असता हा (=अवभास)
समीचीनतेने निरूपण करण्याचा विषय होत असताही विभ्रम कसा नाहीं व बाधित कसा होणार नाहीं? मग काय ती अन्योन्यात्मकता
सत्वाने अनुभवाचा विषय आहे किंवा असत्वाने? पहिला पक्ष नाही कारण अन्योन्य अभावात्मक असलेल्यांच्या [illegible] वि-
षय आहे न बाधाच्या अनुपपत्तीचा प्रसंग येतो. असत्वाने हि नाही कारण दुसरी म्हणून च दुसऱ्या वस्तूच्या असत्वाचा [illegible] असा
पित असे ही अन्योन्यात्मकता तत्त्वतः नाही. म्हणून सर्व वस्त्वन्तर एकास्पद म्हणावे लागेल. किंवा रजत म्हणणे लागेल.
किं वा दोन्ही दूर निराळे कुणाला म्हणावे लागेल. पहिल्या पक्षीं 'हे' असा प्रत्यय येईल 'रजत' असा येणार नाही. दुसऱ्या पक्षीं
'देशान्तरीय रजत' असे येईल 'हे' असा येणार नाही. भेदाग्रहाचे स्मरण नसताही 'रजत' असा येई व 'हे' असा येणार.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरणव्याख्यान ॥

नाही. तिसऱ्या पक्षीं तर 'हें रजत' अशा अवभासाला (अनुभवाला) कारण संभवणार नाही. कारण त्या प्रकारानें तरी त्याला (अवभासाला) निरूपण करणें संभवत नाही. किंवा संभवलें तर त्याचा अनिर्वाच्यत्व (= सदसद्विलक्षणत्व) दुर्वार आहे. कारण हा अनिर्वाच्यत्वाचें लक्षण आहे. आतां अत्यंत असत्ता समान असतां हा तर तादात्म्य धर्मांच्याच अवभासाची अनुपपत्ति नाही धर्मी रजताच्या अवभासाची आहे याविषयीं अदृष्टच (= दैवीउपायच) शरण = प्रमाण आहे. पुनः जर अत्यंत असत्ताच्या प्रतिभासाची अनुपपत्ति आहे तर प्रतिभास प्रमाणें श्रुतींत त्याचें सत्त्व कां मानीत नाही? पण त्याच्या विरोधाकरितां हें वर सांगितलें! तो तर हे कारास्पदांत रजताच्या अभावजाणवितो. मग 'हें रजत' असें होतें येथें भावाची जाणीव होत असल्यामुळें त्याची भ्रांति तरी कां आश्रयित केली आहे? विरोधामुळें असें म्हणणें असल्यास ज्ञान जर रूपरसाप्रमाणें दोन्ही जाणविते तरी मग विरोध कोठला? पण एकाच एकाच ठिकाणीं भावाभाव अन्यत्र अनुभवास येत नसल्यामुळें विरुद्ध होते. मग काय अन्यत्र अनुभवास येत नसल्यामुळें सांप्रत नपुंसकांत शुक्रादि द्रव्य आश्रयलेले जातच नाहीत? तेथें अननुभवामुळें आश्रयलें जातात तर प्रकृतस्थळींही समान आहे. पण असें असतां नपुंसकाप्रमाणें तसें अनुभवास येण्याचा प्रसंग येतो! तसें नाही कारण विचित्र सामग्रीमुळें त्यांच्या सह अनुभवास न येण्याची उपपत्ति होते. उदाहरणार्थ कें पाजेण्हा उन्हाच्या तापानें किंवा कावीळ वगैरेंनीं दूषित नेत्र होतात त्यांना कें वगैरेंच रजताची अवभास होतो. शुद्ध नेत्र असलेल्यास तर त्याच्या (रजताच्या) अभावानें अवधान असतें. अशी व्यवस्था उपपन्न होते. रजताच्या उचित अर्थ क्रियेच्या अनुभवानंतर त्या भासणाऱ्याच्या अभावाला जाणतील. अपरोक्षावभासानें सिद्ध होरजताच्या अभावाला नाही. आतां त्यांच्या विरोध मान तरी भावाच्या आश्रयकां करूं नये. अभावज्ञानाच्या विरोधामुळें व भाग हून वेगळा अस्पदाला भाव व्यअसल्यामुळें! असें म्हणणें असल्यास तें बरोबर नाही अभावज्ञान अ

सलेल्या? बाधित बाध न होतांही दूरदेशी गमन असतां भावज्ञान तसेंच राहात असल्याचें दिसतें. (पण अभाव ज्ञानें भावज्ञानाचा बाध करीत उपपन्न होतें? मग भावज्ञानही निराळेपण असूं शकत नाही. म्हणून दोन्हींच्या उपपत्तीकरितां त्याचा अनिर्वचनीयत्वाचा विकल्प मानले

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरणव्याख्यान ॥

उ. २

पाहिजे) आतां जें म्हटलें की — शुक्तिकाशकल काचकामलादि दूषित नेत्राने अवलोकिलें के अर्थान्तर रजत रूपाने भासते. त्यावर तें जर अर्थान्तरतासत् असेल तर तो असत्य आहे. व तीतें येथ तुझ्या मतें अपेक्षित नाही. दुसरे ठिकाणी ही तीं युक्त नाही. कारण काय ती अनुभवानें अन्यत्र व्यवस्थापित केली जाते? किंवा अनुपपत्तीने? अनुभव ही काय रजताच्या भासाचा आहे? किंवा बाधाच्या अवभासाचा? किंवा अन्य? पहिला पक्ष बरोबर नाही. कारण तो रजताला 'हें' कालस्पदेतच जाणवितो. त्याची असन्निहित सत्ता जाणवीत नाही. दुसरा पक्षही बरोबर नाही. कारण तो येथें रजताचा अभावाच भासवीत अनुभवास येतो. त्याची अन्यत्र सत्ता ही जाणवीत नाही. तिसऱ्या पक्षी दुसरा अनुभव तर त्याची अन्यत्र सत्ता जाणवीत असलेला अनुभवास येत नाही. आतां जो देशकालान्तरी पाहिलेल्या रजताचा भासविणारा येथें कालान्तरी (भ्रांत) रजत प्रत्यभिज्ञानुभव होतो. तो देखील पुनः पाहिलेल्या केसादिकांप्रमाणे अत्यंत सादृश्यामुळे असिद्ध आहे. कारण भ्रांत जाणलेल्या नभोलक्षणाप्रमाणे निश्चित विषयाची अन्यत्र अनुपपत्ती आहे. आतां अनुपपत्तीने अन्यत्र व्यवस्थापित आहे? या दुसऱ्या पक्षीं काय ती अनुपपत्ती रजताच्या भासाची आहे? किंवा असत्ख्यातीची? किंवा बाधाची? पहिल्या पक्षीं ती रजताच्या भासण्याच्या अन्यत्र असत्वावाचून अनुपपन्न आहे. नभासणाऱ्याहि अन्यत्र सत्तेवाचून नाही. दुसऱ्या पक्षी असत् ख्यातीची अनुपपत्ती ही अन्यत्र सत्तेला साधक नाही. कारण निरुपाख्य रजत सान्निध्याप्रमाणे नभस्थळेंच रजत पुढें भासलेलें आहे. म्हणून त्याची अन्यत्र सत्वसिद्धि होणार नाही. तिसऱ्या पक्षी बाधज्ञानाची ही अन्यत्र सत्तेवाचून अनुपपत्ति होत नाही. कारण तत्र प्राप्त झालेल्याच्या प्रतिषेधरूपाने रजताची प्राप्ति तेथें आक्षेपित करित नाही. असताचीही प्राप्ति अनुपपन्न असतां सत्ता ही येथेंच आक्षेपित करील. अन्य देशादिकांत नव्हे. कारण येथें त्याचा उपयोग नाही. पण अन्यत्र ही अभाव असतां हे अन्यत्र बाधित असें होणार नाही. परंतु येथें त्याच्या अपबाधे दिसतो. अर्थात अन्यत्र सत्वाची उपपत्ति होते? हें बरोबर नाही. कारण अप्राप्त तेथें अन्यत्र अबाधाची उपपत्ति होत असतां. येथील अपबाधाने येथील सत्तानिश्चय होईल असें नाही. पण 'हें रजत नव्हे' असा 'हे' कालास्पद व रजताच्या तादात्म्य मात्राचा निषेधरूप बाधानुभव अर्थात रजत कोठें तरी परिशेषाने स्थापित करितो? हें देखील बाधवृत्तांत न जाणणाऱ्याचें म्हणणें आहे. कारण बाधज्ञान 'हें रजत नव्हे' अशा रीतीने 'हें' प्राप्त झालेल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विवरणव्याख्यान

रजताच्या अनुवादानें रजताज्ञान नाहीसें करीत उत्पन्न होते. तादात्म्य मात्र नव्हे. कारण जेथें तादात्म्य मात्र निषेध असतो तेथें
उत्तर क्षणीही दोन वस्तु असतो प्रमाणे दोघांचाही अवकाश असतो. परंतु येथें तसा नाहीं. म्हणून स्वरूपाच्या अपवाधरूप निषेधच
होतो. पुन: 'हें रजत नव्हे' असा हा बाध्य त्याच बाध नव्हें (परंतु हें शुक्ति आहे असे अधिष्ठानाचे यथार्थज्ञानच बाधक आहे)
हें आम्ही पुढें अनिर्वचनीय ख्यातींत सांगूं. आतां जें म्हटलें की — 'हें रजत नव्हें' या बाधज्ञानामुळें ही रजताचें अत्यंत असत्
नाहीं तें ही बरोबर युक्त नाहीं. कारण त्याविषयींही बाधज्ञानाला तादात्म्यमात्र निषेधरूपता म्हणून जो हेतु सांगितला तो लागू नाहीं.
कारण बाधज्ञानाला रजतनिषेधरूपता असल्याचें आतां नंतर सांगितलें आहे. त्याच रीतीनें 'हें रजत नव्हे' या वाक्य बाधक असा
मानलें असतांही (बाध्यसाध्य असतांही) रजताला आत्यन्तिक असत्व (अनिर्वचनीयता मानली असल्यामुळें) येत नाहीं
तसें आम्ही पुढें सांगू. आतां 'जें जसें भासतें तें तसेंच असतें' असें म्हटलें. तें तर आम्हांस ओघ शब्दच आहे. जो तर (अ-
न्यथाभाव) 'हें' कारास्पदाशी तादात्म्याच्या निषेधस्वरूपानें उत्पन्न झालेला' इत्यादि म्हटलें तें तर अयुक्तच आहे. कारण ता-
दात्म्यमात्र निषेध व परिशेष प्रसिद्धीच्या पूर्वीच प्रतिषेध केला. आतां पुन: जें 'रजताशीं संप्रयोग नसला तरी शुक्ति श-
कलाच्या आकार आकलित इत्यादि नाहीं असें नेत्र दोषामुळेंच रजताकारानें अपरोक्ष प्रतिभासाच्या विषयतेला प्राप्त होते'
(समर)
असें म्हटलें तें अवभासाच्या अनुसार रजताकाराच्या आश्रय न केल्यास परोक्ष भासाच्या रूपानें शुक्तीच्याही परोक्षताप्रा-
प्तीमुळें त्याला अपरोक्ष प्रतिभासाचा विषयभाव अनुपपन्न असल्यामुळें अयुक्त आहे. स्वरूपानें सन् असलेल्या संप्रयुक्त ही शु-
क्ति शकलाच्या असंप्रयुक्त असद्‌आकारानें (रजताकारानें) अवभासन्तर असत् ख्यातीच्या कक्षेच्या बाहेर जात नाहीं. कारण संप्रयुक्तेतर
सताला ही प्रतिभास नसतां त्याचा उपयोग नाहीं. पण 'हा असा ही प्रतिभास असेल? मग तेव्हा अन्य प्रतीति होईल 'रजत' असी होई
होणार नाहीं. कारण त्याच्याशीं संप्रयोग नसून त्याला येथें असत्व आहे. जर येथें रजत नसून त्याच्याशीं संप्रयोग नसला तरी दुष्ट इन्द्रि-
यांच्या संप्रयोगामुळे हें कारास्पदाचें ज्ञान रजताकार होते (रजतस्वरूप होतें)? पण आश्चर्य आहे कीं उत्तर ओळखणाऱ्याच्या अधीरतेमुळें वादी
आपला बौद्धमतांत प्रवेश झालेला जाणत नाहीं. पुन: जें 'विवादास्पद शुक्तिशकल रजताकारानें भासते, रजतार्थीच्या नियमानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

'वदन्ति' = म्हणतात. ११।२० 'केचित्तु' = कोणी (अख्यातिवादी मीमांसक व सांख्य) तर. 'यत्र' = ज्या 'शुक्तिकादिषु' 'यदध्यासः' = ज्या स्वरूपाकार रजतादिकांचा अध्यास होतो तो. 'तद्विवेका-ग्रहनिबंधनः' = त्यांचे ग्रहण (= दर्शन) व गृह्यमाण शुक्तीच्या व स्मरणांत स्मर्यमाण रजताच्या विवेकाचे ग्रहण न झाल्यामुळे त्या निमित्ताने 'हे रजत' असा एकत्व (व्यवहार रूढ) 'भ्रमः' = भ्रम (पृष्ठ २६२

॥ विवरण ॥

३५।१२ कित्येक तार्किक म्हणतात. 'केचित्तु' = कोणी तर इत्यादि ~~ग्रंथ~~ ह्या अनुसरातत प्राभाकर मीमांसक व सांख्यांनी ग्र केले (अख्याति) अख्यातिवादि

॥ विवरणव्याख्यान ॥

प्रवृत्तीचा विषय होत असल्यामुळे जें असें असतें तें तसे असते जसें उभयवाद्यांच्या विवादास्पद स्थानांतील रजत' असे अनुमान प्रदान दाखविलें ते स्पष्ट 'हे' असाच्या आनिर्वाच्यरजतानुभासाचा विषयभाव आहेसे मानला असल्यामुळे सिद्धसाधन आहे नसेलेल्या रजतस्वरूपाने तर अवभासाची विषयता ('हे' कराल्यपदाला) साधावयाची असतां दृष्टान्ताला साध्यविकलता येते. बाध उत्पन्न झाल्यानंतर 'आतांपर्यंत हें रजत भासलें' असे उत्पन्न होणारे प्रत्यभिज्ञान ही आपदतांत ती अनुपपन्न आहे. ७५।२८

आतां अति विस्तार पुरे.

१८८।१ पण विवेकाग्रहाच्या निबंधनाने ~~एकत्व~~ अख्यातिवाद्याकडून ग्रहण केलें जात नाही. अन्यथाख्यातिवादी पक्षांत पूर्वी म्हटले-ल्याप्रमाणे? अशी आशंका असतां सांगतात- 'ह्या अनुसरातत?' एकत्वभ्रमशब्दाने एकत्वभ्रम व्यवहार विवक्षित असल्यामुळे अन्यथा- निराशाचा उपन्यास युक्त आहे असा अर्थ. 'अख्यातिवादाच्या?' - अख्यातिवादी प्र.१ विज्ञानांच्या व त्यांच्या विषयांच्या अग्रहण विवेकाच्या अग्रहणामुळे विभ्रम म्हणतात. तो असा- 'हें' असें नेत्रसंबंधाने शुक्तिका शकलाच्या साधारणाकाराचे ग्र-हण झाले असतां व नेत्रदोष विशेषामुळे शुक्तित्वादिकाच्या भेदकारणाच्या शुक्तित्वादि विशेषाचे अग्रहण असतां शुक्लभास्व- रादि सादृश्य दर्शनाने संस्कारोद्बोध होऊन रजतविषयक स्मरण उत्पन्न होते. येथे ग्रहीतग्रहण स्वभाव असले तरी मानस ३५८।३५३

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरणव्याख्यान ॥

दोषविशेषामुळे 'ते' पण अंशाचा लोप झाला असतां ग्रहणस्वरूप शक्ते व तसें असतां रजतविषयक स्मरणाच्या व पुरोवर्ति
साधारणाकार ग्रहणाच्या – परस्पर स्वरूपानें व विषयसंबंधानें भेदाचा अवभास झाला नसतां सत्यरजतज्ञानसारूप्यानें 'हें' असें
व रजत असें ग्रहण व स्मरण किंवा असतां हें अभेद व्यवहाराला व एकाधिकरण व्यपदेशाला (= उल्लेखाला) प्रवृत्त करितात. (= भ्रमात्मक)
प्र. २ रजतज्ञानाचें स्मरणरूपता तर परिशेषानें प्रसिद्ध आहे. कीं अशी – रजताशीं नेत्राचा संप्रयोग होऊन हें रजतज्ञान उत्प-
न्न होतें असें तर म्हणतां येत नाहीं. कारण नेत्राचा अतिदूरावस्थित सन्निकर्षाचा अभाव आहे. असेंही म्हणतां
येत नाहीं कीं – दोषदूषित नेत्र सन्निकृष्ट शुक्तिशकलाला रजतरूपानें बोधित करितो. कारण प्रतीतीचा विरोध येत असल्या-
मुळे रजताचा निर्देश शुक्तिकावलंबन असणें युक्त नाहीं. जें ज्या विज्ञानांत भासतें तेंच त्याचें आलंबन असतें. रजतविज्ञा-
नांत तर शुक्ति भासत नाहीं. तर ती त्याचें आलंबन कशी? किंवा असें म्हटल्यास अनुभवाला विरोध कसा नाहीं? पुनः
सम्यक् ज्ञानाचें साधन इंद्रियसन्निकर्षापासून अन्यथा अवभास युक्त नाहीं. कारण तसें मानल्यास शालिबीजादिकांतही कदाचित्
कारण प्र. ३
अंकुरादिकाच्या उत्पादनाचा प्रसंग येतो. पण दोषसंस्काराच्या सान्निध्यामुळे त्यांत दोष नाहीं. नाहीं दोषांना कार्यजनन
सामर्थ्याच्या विघातमात्रांत हेतुत्व आहे. शालिबीज कांहीं कलुषित झालें तरी यवांकुराला उत्पन्न करीत नाहीं. तर शा-
प्र. ४
ल्यंकुराला उत्पन्न करीत नाहीं. पुनः विज्ञानांच्या विषयांचा व्यभिचार मानल्यास सर्वत्र अनाश्वासप्रसंग येतो. व प्रतिभासमान आ-
काराच्या बाहेर अभाव असतां हें विज्ञानाकारस्य आश्रित केल्यामारखा होऊन आत्मख्यातिजे बौद्ध पक्षांत अनुप्रवेश दुर्वार
होतो. म्हणून शुक्तिशकल रजतरूपानें भासत नाहीं. परंतु असंप्रयुक्त (= स्मर्यमाण) रजतविषयक हें ज्ञान मानलें पाहिजे.
हेतु इत्यादिकांची उपलब्धि नसतां उत्पन्न होणाऱ्या ज्ञानाला अनुमानादि भासतर शंकित करणें ही शक्य नाहीं. व तसें असतां स-
प्र. ५
दृश दर्शनानें उद्बुद्ध संस्कारजन्य ज्ञाना उत्पन्न होत असल्यामुळे परिशेषानें याला स्मरणत्व आश्रय करणें योग्य आहे. पुनः 'हें
ज्ञान स्मरण आहे पूर्वी रजत आकलन झालें त्यास उत्पन्न होत नसल्यामुळे उभयवादींना मान्य करजताच्या ग्रहणा प्रमाणें'
प्र. ६
पुनः असेंही म्हणतां येणार नाहीं कीं – 'हें स्मरण नव्हे' 'ते' पणा अंशानें रहित असल्यामुळे मान्य ग्रहणाप्रमाणें' कारण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विवरणव्याख्यान

‘येथें भूतलावर कुंभ नाही’ असें तें अंशाचा उल्लेख न मिळेले हीं स्मरण अनुभवास येतें. तसें पहावकरन अनुल्लिखित
तें अंश असाव पुष्कळच पदार्थस्मरणांची उपलब्धि होते. म्हणून इच्छा नसते त्यानें हीं मान्य केले पाहिजे कीं – विशेषु
ग्रहण न झाल्यामुळे प्राप्त संनिहित सत्य रजत ग्रहण सादृश्य (प्राप्त झाला आहे संनिहित सत्य रजताच्या ग्रह-
णाचे सादृश्य ज्यांना) अशा ग्रहण व स्मरणामुळें हीं रजतार्थीचा सम्यक्‌ व्यवहार होतो. (सत्य स्थळीं हें व रजत या
दोन अंशांत भेद नसल्यामुळे भेदाचे अग्रहण असतें. विभ्रमांतही असलें स्याही भेदाचें दोषामुळें अग्रहण असतें असें
यांच्यांत सादृश्य जाणावें) कोठें त्या दोन ग्रहणांच्या परस्पर विवेकाचें ग्रहण न झाल्यामुळे भ्रान्ति व्यवहार होतो. जसें
‘शंख पीत आहे’ असा. तेथें बाहेर जाणाऱ्या नेत्ररश्मीतील पित्त धातूच्या पिवळेपणा द्रव्यरहित ग्रहण होतें. व शंखही
नेत्रदोषामुळे शुक्ल गुणाचें आकलन न होतां स्वरूपानेंच असतो. त्यामुळे संसर्गाला योग्य अशा गुणगुणींच्या सम्यक्‌ स्थ
ळीय असंसर्गाच्या (भेदाच्या) अग्रहण सारूप्यामुळे सुवर्ण शंख प्रत्यय साम्यानें अभेद व्यवहार होतो. भेदाच्या अग्रहणानें
प्राप्त झालेल्या अभेद व्यवहाराच्या बाधामुळे ‘हें रजत नव्हे’ या विभेदक प्रत्ययाला बाधकता ही उपपन्न होते. वरील उपपत्ति
सांगितली असतां पूर्वीच्या व्यवहाराला प्राप्त करणाऱ्या भेदाच्या अग्रहणाला भ्रान्तित्व हीं सिद्ध होते. त्यामुळे ‘विवादविषय असे
सर्व भ्रान्ति प्रत्यय यथार्थ आहेत त्यांना प्रत्ययत्व असल्यामुळे दोघांना मान्य सम्यग्‌ ज्ञान प्रत्ययाप्रमाणे’ हें अनुमान निर्वि
घ्न आहे. सिद्धान्ती – हेंहि स्वसिद्धान्त श्रद्धा मात्रानें विस्तारित आहे. तें असें कीं – विज्ञानांच्या वस्तूंच्या अंशांच्या विवेका
ग्रहमात्र विभ्रम आहे असें जे म्हटलें तें अद्भुतपणाचें आहे. कारण सर्व अर्थांच्या भेद स्वभाव मानला असतां स्वयंप्रकाशत्वानें स्फुर-
णारे भासणाऱ्या ज्ञानांच्या वस्तूंच्या अधीन प्रकाशित होणाऱ्या अर्थांचाही विवेकाग्रह सांगणारी उक्ति युक्तिमती कशी आहे?
भासणाऱ्या अर्थाचा स्वभाव अशाही भेदाचा अनवभास आहे. असें तर नाही. कारण अवभास व अनवभास या विरुद्ध धर्मांच्या संस
र्गी एका वस्तूंत संभवत नाही. आतां जर ह – संसर्गाला योग्य अशा हे व रजत या सामान्य विशेषांच्या विवेकाग्रहाला असंसर्गा-
चे (केवलाभावाचे) अग्रहण म्हणत असल्यास तेही व्यर्थ आहे. कारण असंसर्ग = संसर्गाभाव तो तर (अशा पदार्थांच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण व्याख्यान ॥

अंगीकार न करण्याच्या बाधास) हें रजत असा रीतीनें भासणाऱ्या अर्थ मात्राहून निराळा शुक्ति भाग मात्राहून निराळ्या न केलेल्या शुक्ति भावाप्रमाणें तुला सांगणें कठिण आहे. यामुळें भासमान अर्थाहून अभिन्न असा त्याचा असंसर्ग करावा लागणार नाहीं. त्यामुळेंच साधारणाकारानें आकलन झालेल्या पुढील वस्तूत रजताहून विभेदक आकाराचें ज्ञान न झाल्यामुळें व स्मरणातील रजताहूनहि तिपणा- शाच्या लोपामुळें स्वरूपानें विवेचकाकार रहित असतां त्यांच्या विशेषाचा भास होत नाहीं असें म्हणणें स्वसिद्धान्त अनभिज्ञाचें प्रलाप मात्र आहे हें सिद्ध झालें. अथवा वस्तूंच्या किंवा त्यांच्या ज्ञानांच्या विवेकाच्या ज्ञानभास असो. तथापि केवळ त्यानेच रज- तार्थीची हे करा [illegible] दाकडे प्रवृत्ति कशी उपपन्न होते? कारण ग्रहणनिबंधन असलेला चेतनाचा व्यापार अग्रहण मात्रानें होणें युक्त नाहीं. कारण तसें मानल्यास अतिप्रसंग येतो. पण अग्रहण मात्रामुळें चेतनाचा व्यापार होत नाहीं. परंतु ग्रहणच जवळील साधारणकार विषयक, रजतस्मरणाहून विवेकानें आकलन न झालेलें, जवळील सत्यरजतावभाससादृश्यानें, रजतस्मरणाहून अविविक्त असें त्याला उचित व्यवहाराला प्रवृत्त करितें? हें देखील विकल्पाला सहन करूं शकत नसल्यानें पुढें दिल्याप्रमाणें आहे. तें असें- काय यांची संनिहित सत्यरजतावभाससदृशता भासणारी प्रवृत्तीच्या उपयोगी आहे किंवा सत्ता मात्रानें? पहिल्या पक्षींही त्याच्या स- दृशाहें आहे असें भासतें? किंवा सत्य रजतावभासाहून स्वरूपानें व विषयतेनें हे अनाकलित भेद आहे असें भासतें? पहिल्या पक्षीं संनि- हित सत्य रजतावभास सदृश असा अवभास सत्यरजतोचित व्यवहाराला कारण होऊं शकत नाहीं कारण 'गोसदृश गवय' असा अवभास गवार्थीच्या गवयांत व्यवहाराच्या कारणभावाला प्राप्त होत नाहीं. दुसऱ्या पक्षीं सत्य रजताहून हें अनाकलित भेद आहे असा तर अवभास होऊं शकत नाहीं. कारण अनाकलित भेद पुरुष, रजतावभासाहून असा, किंवा अनाकलित भेद असा, निश्चयक- रण्यास समर्थ होत नाहीं. म्हणून पहिल्या विकल्पांतील दुसऱ्या पक्षाप्रमाणें ही विवेकाग्रहरूपी सदृशता सत्तामात्रानें व्यवहाराला हेतु आहे असें म्हटलें पाहिजे. तसें झालें असतां अभेदाग्रह (एकत्वाग्रह) रूपीही भेदग्रहसदृशता तिच्या उचित निवृत्तिरूपी व्य- वहाराला प्राप्त करणें दुर्वार आहे. असा तर नियम नाहींच कीं- अभेदग्रह सदृशतेला उचित व्यवहार हेतुता आहे. भेदग्रह सदृशतेला नाहीं. त्यामुळेंच हा दुसऱ्या सदृशतेनें [illegible] कडे आकृष्यमाण ज्ञाता प्रवृत्त होणार नाहीं किंवा निवृत्त होणार नाहीं असा काहीं दोष प्राप्त होईल. पुनः

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरणावधारणम् ॥

रजतार्थीची 'हे' कारास्पदाकडे प्रवृत्ति तेथीलच रजताच्या इच्छेमुळे असणे युक्त आहे. अन्यथा अन्याची इच्छा करितो व अन्यत्र प्रवृत्त होतो असा व्याघात होतो. असें असल्यामुळेच 'हे' कारास्पद जर रजतज्ञानाचा विषय नसेल तर रजतार्थी त्याची इच्छा कशी करील? पण अरजताच्या अग्रहणामुळे करील? असें म्हणणे असल्यास मग रजताच्या अग्रहणामुळे त्याची उपेक्षा कां करणार नाही? अशारीतीनें तोहा ग्रहण व उपेक्षेनें पुढें मागें आकृष्यमाण पुरुष रजताच्या समारोपावाचून ग्रहणाकडे व्यवस्थापित होणार नाही. म्हणून इच्छा व्यवस्थानें ही या समारोपाचा आश्रय केला पाहिजे. वनशारीतीनें अग्रहामुळे हे कारास्पदांत रजताला आरोपित करून त्याच्या सा-रखाच्या उपकारभाव अनुस्मरण करून त्याच्याजातीय भावानें याच्या ही उपकारभाव अनुमापन करून रजतार्थी तेथे प्रवृत्त होतो असें मानणे युक्त आहे. तसेच रजताचे अनुस्मरण तर हे कारास्पदाच्या उपकारकत्वाचा हेतुभाव कसें अनुमापन करील? कारण रजता-च्या समारोपावाचून रजतत्व हेतु 'हे' कारास्पद पक्षावर रहात नाही. म्हणून 'हे' कारास्पदांत रजतार्थीच्या प्रवृत्तीच्या अन्यथानुपपत्तीमुळेच रजता[illegible]च्या आश्रय केला पाहिजे. त्यामुळे हें सिद्ध होते कीं— 'विवादविषय रजतविज्ञान पुढील रजतविषयक आहे, रजता-र्थीला तेथें नियमानें प्रवर्तक असल्यामुळे उभयवादीस मान्य समीचीन रजतविज्ञानाप्रमाणे'. आतां पुनः जे परिशेषानें अन्यथास्मरणरूपतेचे प्रसाधन केलें ते दूर केलें (याच्या) अनादि अविद्याकार्य रजताभासविषयक विज्ञान नासते व आम्ही पुढें त्याचें निरूपण करणार असल्यामुळे परिशेषाच्या असंभवानें अयोग्य आहे. व असें असल्यामुळेच आमच्या मतांत अवस्था-समान रजतरूपी अध्यासाचा आलंबनत्व मानले असल्यामुळे, अनालंबनत्व, अनुभवविरोध, विज्ञानाकार प्रसंग इत्यादि दोष संभवत नाहीत. सदसत्त्वानें आम्ही रजताला अनिर्वाच्यता मानली असतां तर येणाऱ्या अनुभवविरोधाला अनिर्वाच्यता निरूपण प्रस्तावांतच आम्ही (त्रिविध सत्ता मानून) निराकरण करणार आहोंत. अन्यथाख्यातिवादी मानतो असतां ही शुक्तिआकाराला 'हे रजत' या ज्ञानाप्रत जी आलंबनता सांगितली वतो आलंबनता मानली असतां जो अनुभवविरोध ओंगळतो त्याची आपत्ती तसे मानले नसणे हाच परिहार आहे. त्या प्रकरणाआधारे शुक्तिका रजतरूपानें ज्ञानाची आलंबनता न म्हणतांच अरचारिक वाच्यास्तव अनुभवाच्या विरोधी होते कारण अनुभविता 'रजत' असा अनुभव घेऊनच पुढील वस्तूला अंगुलीने दाखवितो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ ख्यातिवादव्याख्यान ॥

उत्तर ३
पुन:जें 'दोषांना कार्यजनन सामर्थ्याच्या विघात मात्रांत हेतुत्व आहे विपरीत कार्यजननांत नाही' असें म्हटलें तें अयुक्त आहे. कारण
मधक दोषाने दूषित जठराग्नीचा पुष्कळ आहार पचविण्याचे सामर्थ्य उपलब्ध होते. दवाग्नीनें दग्ध वेत्र बीजापासूनही कद-
लीच्या अंकुराची उत्पत्ति दिसते. पण दावाग्नीचा वेत्रांकुरांतच दोषता आहे कदल्यंकुरांतल्या गुणता आहे? मग येथेंही का-
मलादिकांना सम्यक् ज्ञानांत दोषता असून मिथ्याज्ञानांत साधुता आहे असें संयुक्त व्हावें. उत्तर ४ पुन: जें विज्ञानांच्या विषयांशीं व्य-
भिचार मानल्यास सर्वत्र अनाश्वास प्रसंग दाखविला तो बाधक नाही म्हणून विज्ञानांना स्वत:प्रामाण्य आहे. अन्यथा प्रमाण नाही असे
मानणाऱ्या वृद्धांकडून (न्यायसिद्धिकारादिकांकडून) अपरिहृत आहे. पुन: हा अनाश्वास प्रसंग आमच्या मतांतही तुल्य आहे कारण
'रजतम् आहे' या ज्ञानोदयांतही काय हे स्मृतीशीं अविवेकरूप आहे? किंवा एकानुभवरूप आहे? हें संशयावस्थेत (येऊन) पुनर्वार आहे.
मग दोषाच्या भाव व अभावामुळे अन्यतराचा निश्चय होतो. मग आमच्या मतांतहीसुद्धा खंडन करण्याचे कारण कोणतें येत नाही असें परिहार
व्हावे. उत्तर ७ पुन: जरी 'हें स्मरण आहे' असे ज्ञान नसलेल्यामुळे उत्पन्न होत नसल्यामुळे असें म्हटलें तरी 'प्रमोषाच्या आमामुळे स्फुटतर स्मरणाहून
भेदानें उपलब्ध होत असल्यामुळे प्रत्यक्षानें बाधित होते. वस्तुत: ज्ञानानें ठेवलेल्या संस्कारानें संपादनीय आहे. पण 'ज्ञानत्व असतां'
या विशेषणामुळे हा दोष येत नाही? तथापि पूर्वीच्या ज्ञानानें ठेवलेल्या साधनतेपासून उत्पन्न होणाऱ्या अनुमानानें किंवा प्रत्यक्षा-
हूनही याचा सव्यभिचारता लक्षित होते. आणि जें 'हें स्मरण नव्हे' ते पणा अंशानें रहित असल्यामुळे मान्य 'गृहीतग्राहक' या आचार्यैक
(तिला विवेचकत्व असल्यामुळे)
देशीयानें केलेल्या अनुमानाला पूर्वी तेपणा अंशानें रहित स्मृति दाखवून दूषित केले. त्यांतही (तेपणा अंशानें रहित स्मृति असतांही)
उत्तर ८
अनन्यथा पक्षाची सिद्धि होत नाही. यानें शंख पीतादि विभ्रम ही समारोपरूप असल्यानें त्या कारणांत आले. कारण जेव्हां नेत्र रश्मी
(अतिनिकटवर्ती) (अतिनिकटवर्ती)
आविरोधी असलेल्या काजळाच्या कांहीं हेतूनें वैलक्षण्यानें अविनष्टत्वामुळे नेत्ररश्मीचा निरोध न करणाऱ्या पित्तपीतिम्याचें
ग्रहण होते असें म्हणतोस तर स्वद्वारानें प्राप्त होणाऱ्या संसर्गी द्रव्याच्या स्वरूपमात्राहून अतिरिक्त नसलेल्या, दोघांच्या असंसर्ग
ग्रहणाहीं ग्रहणकांहीं प्रमाद होई. पुन: पित्तपीतिम्याच्या ग्रहणांत जर नेत्राचा निरोध न करणारी स्वच्छता निमित्त असेल तर नेत्रावर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरणव्याख्या ॥

प्रसरणाच्या अविंदूचे ठिकाणी ग्राह्य होईल. कारण प्रसरण पावणाऱ्या नयनरश्मींचा संबंध ज्यांच्याशी ते रश्मी प्रसरण होतात त्या पित्त, जळ वगैरेशी समान आहे. म्हणून अतिदूरा प्रमाणे अतिसामीप्याही अदर्शनांत हेतुत्व असल्यामुळे जळ वगैरेतील अग्रहणत्व असते असें आम्ही म्हणतो. तत्रान्तरांत ही म्हटले आहे की – "अतिदूरात्सामीप्यादिन्द्रियघातान्मनोऽनवस्थानात्। सौक्ष्म्याद्व्यवधानादभिभवात्समानाभिहाराच्च" [सांख्यका. ७] असें. पुनः जें म्हटले की – "भेदाच्या अग्रहणाने प्राप्त झालेल्या अभेदव्यवहाराच्या निवारामुळेच विवेकज्ञानाला बाधकता उपपन्न होते" ते सर्व ही अनुचित आहे कारण असें असतां रजतज्ञानानंतर त्याचे इच्छा न करणाऱ्याच्या व्यवहाराचा उदय न झाल्यामुळे 'हे रजत नव्हे' या विवेकज्ञानाला अबाधकता प्रसंग येईल. व्यवहारयोग्यतेचा विच्छेद बाध म्हणणे ही व्यर्थ आहे. कारण दुसऱ्या समयींही रजताच्या अविवेकाने तसेंच व्यवहार दिसतो. योग्यता यावज्जन्य रहात असल्यामुळे तिचा उच्छेद होत नाही. (कां की पुनः दुसऱ्या योग्यतेची उत्पत्ति मानसांय ईल) (=भेदाच्या अग्रहणाच्या) ति (=योग्यतेचा) मग साधु तिचा बाध आहे हेंही अयुक्त आहे कारण विवेकज्ञानसमयीं हेतूच्या अभावामुळेच फल (अभेदव्यवहाराच्या) अभावाची सिद्धि होत असतां प्रतिबंधक म्हणून त्याचे रक्षण शक्य नाही. मग अविवेकाची (विवेकाग्रहाची) निवृत्तीच बाध आहे? नाहीं कारण मग विवेकज्ञानप्रमाणाला ही बाध्यकता प्रसंग येतो. (कारण सर्वही ज्ञाने स्वप्रागभावरूप अग्रहण निवर्तक आहेत. असतां व तसें कोणीच भ्रान्त ठरणार नाही असा अर्थ) असें असल्यामुळेच 'विवेकज्ञानाला बाधकतेची उपपत्ति उत्तरकालीं असतां पूर्वीच्या व्यवहाराला प्राप्त करणाऱ्या विवेकाग्रहाला लोकप्रसिद्ध भ्रान्तित्व सिद्ध होते' असें जें म्हटले त्याचाही निरास झाला. पुनः जें "विवाद विषय सर्व प्रत्यय यथार्थ आहेत त्यांना प्रत्ययत्व असल्यामुळे सम्यक् संमोचीन प्रत्यया प्रमाणे" असा अनुमान प्रयोग केला तोही असाधु आहे कारण 'विवाद प्रत्यय विभ्रम' मानल्यास स्वबोधवाक्याशी विरोध येतो न मानल्यास हेतूला आश्रयाची (पक्षाची) असिद्धि होते. पुनः यथार्थत्व म्हणजे प्रतिभासमान अर्थत्व असतां प्रतिभासमान अर्थाच्या निषेधाच्या अभावास आम्हांस संमत असल्यामुळे आमचे मतांत त्याला सिद्ध साधनत्व आहे. अबाध्य तेला साध्यत्व असतां (=यथार्थत्व यथार्थत्व = अबाध्यत्व असल्यास) बाधक प्रत्ययाशी विरोध येतो. आतां अतिविस्तार पुरे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्तद्विवेकाग्रह निबंधनो भ्रम इति । अन्येतु यत्र यदध्यासस्तस्यैव विपरीत

॥ व्याख्यान ॥

होतो. असें ६ मागे आलेल्या 'वदन्ति' शब्दाच्या अनुसार) 'वदन्ति' = म्हणतात. 'अन्येतु' = दुसरे (माध्य-

मिक शून्यवादी व कोणी अन्यथाख्यातिवादी) तर ' यत्र' = ज्या शुक्तिकादिकांत ' यदध्यासः' = ज्या र-

जतादिकांचा अध्यास = अवभास होतो त्याचा (अध्यासा) ' तस्यैव' = त्या शुक्तिशकलादिकाचाच ' विपरीतधर्म

त्वस्य' = विरुद्ध धर्म अशा रजतादिरूपत्वाची ' कल्पनाम्' = कल्पना अविद्यमानाचीच अवभा- पुढे २३

॥ विवरण ॥

३६।१३

याचा उपन्यास सांगितला. तिसरा तर शुक्तिचा आपला अभाव जें रजत त्याच्या रूपानें ख्याति असा शून्यख्याति व

अन्यथाख्यातिविशेषाचा उपन्यास आहे असें सांगतात- 'दुसरे तर' 'विरुद्ध धर्म' - विरुद्ध आहे धर्म ज्याचा भा

वान्तरत्वानें किंवा शून्यत्वानें विरुद्ध धर्म आहे ज्याचा अशा रजतादिकांची ' कल्पना' = ख्यातीच त्याच्या अविद्यमानाचीच अवभासमानता.

॥ विवरण व्याख्यान ॥

१८।८

पण ' विपरीत धर्मत्व कल्पना' येथें शुक्त्यादिकांची रजतादिरूपाने ख्याति सांगितली जाते. ती त्वं पूर्वी सांगितली आहे? अ-

शी आशंका असतां सांगतात- 'तिसरा तर' 'शून्यख्याति' = शुक्तिरूपाने स्थित असलेले तुच्छ (शून्य) (आपला अभाव अशा =

नसलेल्या) रजत रूपाने भासते असे शून्य वादी सिद्ध म्हणतात. व आपला अभाव अशा भावान्तर रजतरूपाने शुक्ति भासते असे अन्य

थाख्याति एकदेशी म्हणतात. पण ' विपरीत धर्मत्व कल्पना' = रूप्यादि रूपाने निष्पत्ति (= परिणाम) अन्यथाख्याति एकदेशी

मानीत आहे. तेव्हां ' कल्पना = अविद्यमानाचीच अवभासमानता' असें व्याख्यान तर त्या भाष्याधिकरण कसें सांगितले? अशी आशंका

असतां दुसऱ्याच्या दुसऱ्या रूपाने निष्पतीच्या असंभव असल्यामुळे नवी प्रतिभास कल्पना. अशा अभिप्रायाने सांगितले असें सां
"अविद्यमानाचीच अवभासमानता" —

गतात- ' कल्पनामात्रीच' शून्यवादाने असे म्हणणे आहे की — अत्यंत असत् अर्थाचा आकार देणारे विज्ञान भ्रम आहे. ते

असे- ' हे रजत नव्हे' या बाधित ज्ञानामुळे आत्यन्तिकी असत्ता या रजताची कळते. असताचा नरविषाण प्रमाणे प्रकाश होऊ नाही

विवरणप्रस्थान

प्र. २ ही
हे म्हणणेही बरोबर नाहीं. कारण येथें आम्ही ज्ञप्त्यात्मा सामर्थ्याचा आदर करीत नाहीं. कोणत्याही सामर्थ्य विरहित
असताचा प्रकाश होणें शक्य नाहीं. परंतु पूर्वपूर्व विभ्रमप्रत्ययाने प्राप्त झालेले असाधारण स्वभाववेद असे विज्ञानच असताला
म्ह प्र. ३
प्रकाशित करितें व तीच त्याची असत् प्रकाशन शक्ति अविद्या म्हटली जाते. 'नरविषाणाप्रमाणें' हा दृष्टांत माध्यमिकांना-
प्र. ४
धरूनच दृष्टान्त आहे. कारण त्यांचेमतें केवळ नरविषाण शब्दाने प्रकाश होतो. पुनः जर असताचा प्रकाश होत नाही तर बा-
प्र. ५
धानुभव कसा युक्त होतो? तेथें तर 'हें रजत नव्हे' असें असत्स्वरूप कळतें. असें असल्यामुळेच असताचाही स्वरूपानें प्र-
तिभास संभवतोच. सद्रूपानें नव्हे. हें ही युक्त आहे. कारण सदाकारानें अकालिक असलेल्या रजताची बाधबुद्धीनें तत्त्वतः
प्र. ६
असद्रूपता निश्चित केली जाते. प्रतिभासाप्रमाणे अर्थाचा सद्भाव असतां तर भ्रान्तीच्या बाधाची अनुपपत्ति येईल अस-
त्यामुळे अत्यंत असताच अंशविशेषाच्या आरोपणीयत्वाच अवश्य आश्रय करणें प्राप्त असतां हा असत् ख्यातीचा अं-
गीकार न करणें प्रद्वेषमात्र निबंधन आहे? सिद्धान्ती — यथा बुद्धिमान केवळ बाध भाषित मानतात. ते असे — जे
उ. १
म्हटले की — बाधज्ञानामुळे भासलेल्या रजताची अत्यंत असत्ता जाणली जाते. त्याला 'हें रजत नव्हे' या अभावज्ञानास
ही
लौकिक परमार्थ रजताच्या अभाव विषयतेने बाधकत्व उपपादन करण्याने आम्ही पुढें निराकरण करणार आहोत.
अर्थ. ले (=अभिधान) (सांगता येणाऱ्या) विभ्रम
म्ह त्या
पुनः जें हें म्हटले की — ज्ञेयासामर्थ्यावाचूनही अविद्या उपादान निरहित असा असताला विज्ञानच पूर्वपूर्व प्रत्यय कारणाने प्रा-
अरख्याता २ सिद्ध
असाधारण स्वभावभेद असे उत्पन्न होते. व त्याची असत् प्रकाशन शक्ति अविद्या या नावे म्हटली जाते. ते येथे सांगावे की —
जी ही विज्ञानातील असत्प्रकाशन शक्ति. याशक्तीचे शक्य काय आहे? असताचे असे मत असेल तर ते काय आहे? किंवा
म्ह
ज्ञाप्य आहे? कार्य म्हणतां येत नाही कारण असताला कार्यत्वाची अनुपपत्ति आहे. पुनः तसे मानल्यास विज्ञानाची त्याला
म्ह म्ह
उत्पन्न करणे ही शक्ति होऊन त्याच्या प्रकाशन शक्तीचा व्याघात होईल. ज्ञाप्यही म्हणतां येत नाही कारण ज्ञाप्य म्हणजे
ज्याच्यापासून उत्पन्न होणाऱ्या ज्ञानाचा विषय होणें. परंतु तें ज्ञान या ज्ञानाहून निराळे आहे? किंवा आश्रय कुलच आहे? पहिल्या पक्षी
म्ह म्ह
त्याच्यापासून उत्पन्न होणारे (असत् विषयक) दुसरें ज्ञान दिसत नाही. आहे म्हणाल तर त्यावर त्यांतही ज्ञापन शक्ति आहे म्हणाल तर त्यास

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

५. [illegible]

पुनः त्याच विषयाचे त्याच्यापासून उत्पन्न होणारे दुसरे ज्ञान मानावे लागेल अशी अनवस्था प्राप्त होते. (आश्रयभूत त्या दुसऱ्या पक्षी) विज्ञान स्वरूपच असताच्या प्रकाशात आहे म्हणत असल्यास मग हे स्वाश्रयशक्तीच्या शक्यभावाला प्राप्त होऊ शकत नाही. व शक्यत्वावाचून तर शक्ति युक्तिमती ठरत नाही. पण शक्ति नसो तरी पूर्वीच्या स्वप्रत्ययाने (भ्रांत) प्राप्त झालेले विज्ञान नावाचे असताच्या प्रकाशात आहे व त्याचे ही पूर्वीच्या स्वप्रत्ययाधीन उत्पन्न होणे हेच त्याचे सत्त्व आहे म्हणून कोठे ही स्वरूप सत्व नाही. मग ह्या सत् विज्ञानाचा व असत् विषयाचा कोणता संबंध आहे? असताच्या आधीन निरूपण होणे हा असत् शी सत् ज्ञानाचा संबंध आहे. कारक संबंधाचे आश्रय नाही की त्याच्या आधीन त्याचे निरूपण होते. हे मिळाच व्यामोह आहे. संबंधावाचूनसुद्धा निरूपणीय असलेल्या वस्तूंचा संभव नाही. गोत्वादिक तर स्वहाधिकाराने संबंधित असेच निरूपण केले जाते. असताच्या [illegible] दुसरा तर संबंध संभवत नाही तेव्हां हे विज्ञान त्याच्या आधीन निरूपित कसे होते की पुनः असताला आधारत्वाची अनुपपत्ति असल्यामुळे हे असतांत काही प्रत्यय (ज्ञानसाधु) ठेवीत नाही. कोणाचे हा (प्रत्यय) त्याच्या संबंधी म्हटला जाईल. पण तरी असतावाचून (हा विज्ञान) प्रत्यय प्रसिद्ध होत नाही. ह्याविषयी हा महान प्रमाद आहे की - हा प्रत्यय असतापासून उत्पन्न होत नाही व असताशी तादात्म्य पावत नाही, तरी असतावाचून हा राहात नाही असे म्हटले जाते. म्हणून अत्यंत असताच्या प्रकाशात आहे ही निरर्थक वाणीची युक्ति आहे. पुनः नराविषाण दृष्टान्त ही साध्यसम (असा सहाय्य)च आहे. कारण त्याचा ही न निषाण शब्दाने अवभास होतो असे जे म्हटले ते ही अनिरीक्षणाने म्हणणे आहे. कारण अनादि आविद्येमुळे विनिर्मित असा जो मिथ्याकार विकल्प त्याच्या विज्ञानाच्या उदयावाचून अखिल सामर्थ्य विरहित असताला [illegible] (त्याच्या प्रसंगी) विज्ञानाचा विषयभाव नसल्याने निरूपण केले आहे. तसेच "शब्दज्ञानानुपाती वस्तुशून्यो विकल्पः" [यो.सू. १।९] = शब्दज्ञानावरून होणारा वस्तुशून्य प्रत्यय (= भ्रम व प्रमेहून विलक्षण [illegible]) विकल्प होय. असे असत् प्रत्ययाचे विषयसामर्थ्यरहित निरूपण योगसूत्रांत केले आहे. (आतां असताला ज्ञानविषयभाव न मानल्यास असताच्या [illegible] नाही हा निग्रह निरर्थक होतो? असे म्हणत असल्यास) जरी असताला ज्ञानविषयभाव मानला तरी अपरोक्षज्ञानाचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरणव्याख्यान ॥

विषय मानतां येत नाही. जसें म्हटलें जातें कीं- 'मनुष्यांत गाईप्रमाणें शिंग भासत नाहीं' अतां [उ.४] 'असत्याचा जर प्रतिभास होत

नाहीं तर बाधानुभवक सायुक्त होतो?' असे जे म्हटलें ते देखील शोभन नाही. कारण 'हे रजत नव्हे' हाही निरूपाख्य (=असत्)

विषयक बाध प्रत्यय आम्ही म्हणत नाही कीं ज्यामुळे त्याचे सिद्ध असत्याप्रमाणे उदाहरण दिलें असे. तर अनादि अविद्याकार्य

रूपानें निरूपण करितां येत असल्यामुळेच ज्ञानाभिधानास योग्य अशा त्य रजताचा अभाव प्रत्ययाचा विषयभाव आ-

म्ही मानतो. पुनः जें म्हटलें कीं [उ.५] असे असल्यामुळेच असताचाही स्वरूपानें अवभास संभवतो च म्हणूनच ते रूपानें नव्हे तेंही असंगत

आहे. कारण अभावविज्ञान भासलेल्या रजताच्या अभावविषयक, नसून पारमार्थिक रजताच्या अभावविषयक आहे. पुनः जें म्हटलें

कीं- [उ.६] 'शुक्तिकासाप्रमाणे अर्थांच्या सद्भाव मानल्यास भ्रान्तिविनाशाची अनुपपत्ति येते' तेंही म्हणणे सुंदर नाही. कारण प्रतिभासाप्रमाणें

अर्थांच्या (पारमार्थिक) सद्भावाचा नुसती अनिर्वाच्य मानल्यानें असत् ख्यातीचा अंगीकार न करताही भ्रान्तिबाधाची उप-

पत्ति होते. असें आम्ही आतांच पुढें सांगणार आहोंत. म्हणून असत्ख्यातिपक्षही परीक्षकांकडून उपेक्षणीयच आहे असें सिद्ध आहे.

३ (हे २८२ पृष्ठावरील प्रतीक आहे)

'अन्यथाख्यातिविशेषणस्य'- शुक्ति आपला भावरूप (भावांतर असत्) रजतरूपाने परिणत झाल्या असरखी राहून भासते या अ-

न्यथाख्यातिविशेषणानें खंडन होणाऱ्या असत् ख्यातीचे खंडन असल्यामुळे त्याच्याचे पृथक्‌पणे खंडनाची आवश्यकता नाही.

पण तरी अवभास्यमान रजताला मिथ्यात्व कसें? सिद्धान्ती- सांगतो- सिद्धान्ती आक्षेपक तर- अनिर्वचनीय अर्था-

च्या अवभासाला विभ्रम म्हणतात. पण ही अनिर्वचनीयता म्हणजे कोणती? [प्र.१] वाकून दाखविण्यास योग्य नसलेली- असे तर नव्हे.

कारण मग मूकीभाव प्रसंग येतो. [प्र.२] सदसत्प्रकार विलक्षणताही नव्हे. कारण ती विकल्पाला सहन करीत नाही. ती अशी- काय एकै-

कप्रकार विलक्षण अनिर्वाच्यत्व आहे? किंवा दोन्ही प्रकार विलक्षणत्व? त्यांत पहिला पक्ष असल्यास तोही अनुचित आहे. कारण सत्

प्रकार वैलक्षण्य असतां असताला, व असत् प्रकार वैलक्षण्य असतां सताला अनिर्वाच्यता प्राप्त होते. दुसरा पक्षही मानण्याला

ख्याल नाही. कारण एकेकालाही उभय वैलक्षण्याची उपपत्ति होत असल्यामुळे अनिर्वाच्यता प्राप्त होते. पण उभय नेत्र रहित हे अंध

लक्षण असतां जसें काणालाही अंधता प्राप्त होत नाही. तशीच येथेंही उभय प्रकार वैलक्षण्यही अनिर्वाच्यलक्षण असतां एकेकाला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरणनिरसन ॥

अनिर्वाच्यता प्रसिद्ध होत नाही? असे म्हणणे असल्यास मग येथेंही जर उभयभिन्नत्वासिद्ध अंधलक्षण आहे तर कोणाही अंधकाला होणार नाही - पण आपणांत लौकिकांत अंध प्रयोग नाही? मग काय लौकिक प्रयोगाला प्रमाण करितां तर नानामुनिजन आचरणही कुंडाला (=सरोवराला) लोकांत अगस्त्यकुंड बोलले जात असल्याने, व इंदीवरादि साधारण कमळही पाण्यापासून उत्पन्न होत असतां ताम-रसालाच 'नीरज' नाव असल्याचे जाणत नाहीत? आतां लोकप्रयोगावरून श्रद्धा असेल तर एकैकनेत्र असणाऱ्याहून वि-लक्षण असून उभय नेत्र असणाऱ्याहून विलक्षण असे दुसरे अंधांतही लक्षण प्राप्त झाले. मग येथेंही एकैक (=सत् व असत्) प्रकार वैलक्षण्यावच्छिन्न उभयप्रकारवैलक्षण्याचा (=सदसत्प्रकारवैलक्षण्याचा) आश्रय केल्या जाता त्यामुळे अतिप्रसंग व अप्रसंग येत नाही? असे म्हणत असल्यास. होय येथेंही असें लक्षण संभवेल जर अशी वस्तु प्रमाणपद्धतीच्या अधिकारांत असेल? होय येथें अर्थापत्तिप्रमाण आहेच. तें असे - अत्यंत असत् नरशृंगादिकांच्या अवभास नसतो व अत्यंत सत् चिदात्म्याला बाध विषय होत नाही. त्यामुळे येथे दोघांची (अवभासबाधांची) अन्यथा उपपत्ति होत नाही. म्हणून उभयविलक्षणता रजतादिकां-ची जाणली जाते? मग उभयवैलक्षण्यांत हे असद्विलक्षण (सत्)च्या बाधन होणे व सद्विलक्षण (असत्)च्या प्रतिभासन होणे अशी अनुपपत्ति को येणार नाही? पण सत्व असत्व बाध न होण्याकरिता व प्रतिभास न होण्याकरिता प्रयोजक आहेत, सद्-सत्वैलक्षण्य नाहीत! हे देखील लक्षात घ्यावे. कारण त्याला नियामक उपलब्ध होत नाही. पुनः अनुभव नाही विरोध येतो अ-सल्यामुळे अनिर्वाच्याचा स्वीकार अमूलक आहे तो असा - 'हे रजत सत् आहे' असा पूर्वीचा अनुभव व 'हे रजत नव्हे' असा असताचे बोधानुभव सदसत् विलक्षणास विरुद्ध येतो. यामुळे ख्यातिवाद्यांची अन्यथाच उपपत्ति (उपपत्तीची कल्पना) आम्हीही सांगितली. पुनः सदसत्विलक्षण रजताला (भासामुळे भावत्व असून) अनादित्व असतां अनंतत्व येऊन सर्वदा उपल-ब्धीमुळे अबाधापत्ति येते. आतां त्याला सादि मानून जाग्रद्दानीत असल्यास तर त्याचे कारण सांगितले पाहिजे. आतां अवि-द्या कारण आहे म्हणत असल्यास तेही अनुपपन्न आहे कारण अविद्या म्हणजे विद्याभाव किंवा मिथ्याज्ञान? दोन्ही पक्षी कोणाचाही उपादानकारणता प्राप्त होत नाही. कारण निरुक्तिकाणी द्रव्याचाच उपादानत्व उपलब्ध होते. अभाव व मिथ्याज्ञानाला तर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

१ विवरणव्याख्यान ॥

अद्रूपत्व आहे. आतां अन्यथावादिकांहून निराळी अनादि अनिर्वाच्य अविद्या रजतादिकांचे उपादान म्हणून असल्यास तेही निराश्रय मात्र आहे. कारण अशा प्रकारच्या अविद्येलाच सर्व प्रमाणांच्या विरुद्ध असल्याने गगनकमलकल्पत्व आहे. म्हणून अनिर्वाच्य अर्थाचा अवकाश विभ्रम आहे हेही अयुक्त आहे असें सिद्ध झालें. यावर प्रतिविधान (समाधान) करितात —

उत्तर १ बोलून दाखविण्यास योग्य नसणें अनिर्वाच्यता आहे असें जे पूर्वी विचारलें त्यावर आम्ही तसें मानीत नाही हेंच उत्तर आहे. आतां जें "ती (अनिर्वाच्यता) सदसत्प्रकारविलक्षणता होईल" इत्यादि म्हटलें तेथें जरी एकेक प्रकारकेवल सल्लक्षणांत व उभय प्रकार केवल लक्षणांत न दाखविता येत असला तरी एकेक प्रकार वेगळ्या वाक्यांत उभय प्रकार केवल लक्षण आहे. कोणताच दोषप्रसंग नाही. उत्तर ३ पुनः जें म्हटलें की "अशेष वस्तु प्रमाणपद्धतीच्या अधिकारांत आहे" ते देखील निकृष्ट आहे. कारण त्याविषयी अर्थापत्ति प्रमाण आहे. ते असें — "अत्यंत असत नरविषाणाची प्रतीति कधी होत नाही व अत्यंत सत निरात्म्याच्या बाधाचा संभव नसणें हे दोन्हीही अन्यथा उपपन्न होत नसल्यामुळे उभयविलक्षणता रजताची आश्रयणीय आहे — असें. उत्तर ४ आता जें म्हटलें की — "उभय विलक्षणांत ही असिद्धि लक्षणांविरोध अबाध्य व सिद्धि सगत्य" अप्रतीतत्व अथवा अनुपपत्ति कोणत्याही नाही" तें देखील अबुद्धिमानाचे बोलणें आहे. कारण सत्त्व व असत्त्व यांच्या आवश्यक प्रतीतिमानालाच केवळ प्रयोजक आहेत. सदसद्विलक्षण नाहीत. उत्तर ५ पण याचा नियामक काय आहे? असेंही म्हटलें त्यावर गौरव दोष वाढू नये म्हणून इतरांनी उपपत्तीचा अभाव प्रसंग असें आम्ही म्हणतो. ते असें — असद्वैलक्षण्य असें सद्वैलक्षण्याला अबाधाकादि प्रतीतीप्रयोजक मानल्यास कल्पनागौरव दोष येतो. सन्मात्राला येत नाही. तसा सद्वैलक्षण्याला अप्रतीतिप्रयोजक मानल्यास येतो असन्मात्राला नाही. ही ख्याति (शुक्ति ही रजताचे रूपाने प्रतीति) (आम्ही सांगितलेल्या रीतीहून दुसऱ्या) दुसऱ्या रीतीने ही उपपन्न करणें शक्य नाही. तर असन्मात्र अज्ञान प्रयोजक आहे व सन्मात्र अबाध्य-

॥ टिप्पणी ॥

फ़ा "हीरख्याति" — या गुणभूत्याप्रश्नाला होत नाही अंत (= भ्रान्तीत) हीर खरोखर येतच. कारण सद्वैलक्षण्यामध्ये बाध्यत्व प्रयोजकत्व आहे व असद्वैलक्षण्याला भान प्रयोजकत्व आहे. अशी आशंका असताना सांगतात — 'हीरख्याति?' हा अर्थ — दोन्ही ठिकाणी कल्पना गौरव आहे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरणव्याख्यान ॥

प्रयोजकभाव असतांना सदसत्प्रकार वैलक्षण्य लक्षण प्रकारान्तराच्या आश्रयाने तीं उपपादन करणे शक्य आहे. व तीच्या उपपादन करण्याकरितां तुम्हां देखील प्रयत्न आहे. म्हणून मिथ्या आग्रह पुरे. आतां [उत्तरद] जो मनुभवविरोध सांगितला कीं — 'सत् इदं रजतं भाति' असा पूर्वानुभव व 'इदं रजतं नव्हे' असा असत्त्वाबद्दलचा उत्तरानुभव सदसत्वविलक्षणतेला विरुद्ध येतो? — तोही विरोध येत नाही; कारण शुक्तिकेतील 'इदं' त्याच्या (मिथ्या) संसर्गी प्रमाणे तिच्यातील सत्तेचा संसर्ग ही रज-तास मिथ्यात्व भासतो. कारण रजताची अन्य सत्ता उपलब्ध होत नाही. म्हणून पूर्वानुभव विरुद्ध नाही. किंवा ब्रह्माचे परमार्थ सत्व, आकाशादिकांचे व्यावहारिक अर्थक्रियासामर्थ्य [लक्षण] सत्व, व रजतादिकांचे अविद्योपाधिक प्रातिभासिक सत्व, असे त्रिविध सत्वाचा अंगीकार करून परमार्थ सत्वाच्या वैलक्षण्याच्या अभिप्रायाने अनिर्वाच्य [(सत्व)] लक्षणाचा आश्रय केल्याने अनुभवाच्या विरोधाचा परिहार होतो. पण तरी उत्तरानुभव विरोध आहेच? नाही कारण 'इदं रजतं नव्हे' हा प्रतिभासाचे येथील कालत्रयविशिष्ट लौकिक परमार्थ रजत प्रतियोगिनी असत्तेला अवलंबन करितो (मिथ्यारजत प्रतियोगिनी असत्ते

॥ टिप्पणी ॥

तरी सदसत् वैलक्षण्याला अज्ञान व अबाध्याचे प्रयोजकत्व असतां सदसत् रूपाने ख्यातिबाधांची उपपत्ति सांगावी लागेल. ती तर अनुपपन्न आहे. कारण सद् सत्वाचा एकोपाधीत विरोध आहे. आतां देशान्तरी सत्वाने व येथे असत्वाने त्यांची उपपत्ति होते असे ही नाही. कारण देशान्तरी सत्व असले तरी येथे त्याच्या अपरोक्षत्वाला प्रमाणाच्या अभावाने व त्याच्याशी इंद्रिय संबंधाच्या अभावामुळे येथे त्याचा काही उपयोग नाही. असे पूर्वीच निराकरण केले आहे. सदसत्वाचा प्रयोजकत्व असतांना सदसद्रूपाने सत्त्व व असद्विलक्षण्यामुळे भान अशी ख्याति बाधांची उपपत्ति होते. कारण एकोपाधीत दोन विरुद्ध पदार्थांच्या अभावाचा विरोध नाही. म्हणून त्यांच्याच प्रयोजकत्वाचा आश्रय केला पाहिजे. — असा: भगवंत उपपादन नसती त्यावर सांगतात 'व्रतिव उपपादन' 'इदं त्याच्या संसर्गी प्रमाणे' — अपरोक्षतेने अवभासमानत्वामुळे व अत्यंत असत्व असतां त्याची अनुपपत्ति असल्यामुळे व बाध्यत्वामुळे सतेची अनुपपत्ति असल्यामुळे 'इदं' त्याचा संसर्ग ही अनिर्वचनीय आहे. असे [अर्थ] [प्रतीयमान] प्रतीयमान रजत वस्तुतः अनिदंभूतत्व आहे कारण ते देशान्तरी सत् आहे. अशा अन्यथा ख्यातीच्या स्वीकाराने जसा अनुभवविरोध येत नाही कारण रजताला अधिष्ठानाच्या इदंतेचा मिथ्या संसर्ग भासतो कारण दोन इदंते चा अभाव आहे. त्याप्रमाणे आमच्या मतांतही अधिष्ठानाच्या सत्तेचा संसर्ग ही मिथ्या भासतो. त्याने अनुभवविरोध नाही असा अर्थ. पण शुक्तीतील 'इदं' त्याच्या प्रमाणे तिच्यातील सत्तेच्या रजतांत अवभासमानत्वामुळे अन्यथाख्यातीची शंका येते? अशी आशंका असतां सांगतात — 'किंवा ब्रह्मस्य' यांपैकी रजतातील प्रातिभासिक सत्वाच्या अंशांत अनुभव येतो त्याला पारमार्थिक व व्यावहारिक सत्वाच्या अपेक्षेने वैलक्षण्य असले तरी त्याच्या भानामुळे अन्यथाख्यातित्व येत नाही. असा अर्थ (वस्तुतः तर प्रथम पक्षांतही शुक्तीवरील रजताच्या आरोपामुळे शुक्तीतील सत्तेच्या त्याच्यातील प्रतिभासांतही दोष नाही)

माया — स्वाश्रयाला व्यामोहन करणारी विपरीत प्रवृत्तीला हेतु माया व स्वाश्रयाला व्यामोह करणारी विपरीत प्रवृत्तीला हेतु म्हणजे अविद्या असा माया व अविद्येंत भेद जाणावा. हा विषय विवरणांत पूर्वी आला असला तरी अनिर्वचनीयत्वाला त्या विस्तराच्या अनुरोधाने पुनः येथें आलेला आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विवरण व्याख्या

न्या.म. ११३।८

जानाहि) त्यामुळेच 'मिथ्याचे रजत भासले' असा परामर्श होतो. पण येथें लौकिक रजताची प्राप्ति नाही तरत्याचा प्रतिषेध कसा युक्त होतो? असेंही म्हणतां येणार नाही. कारण (मिथ्या) रजत प्रतिभास प्रसंगच त्याच्या (= लौकिक रजताच्या) प्रतिषेधाला निमित्त आहे. जें जेथें भासत विज्ञानाने प्राप्त होते त्याचा तर तेथें प्रतिषेध युक्तिमान नाही. कारण तसें मानल्यास शून्यवादिकांतही अति प्रसंग येतो. पण विभ्रान्ति मात्राने प्राप्ताचा प्रतिषेध होत असल्यामुळे अति प्रसंग नाही? हें देखील विकल्पाला सहन करीत नाही. कारण विभ्रान्ती ही ज्या अवस्थायुक्त वस्तूला प्राप्त करिते त्याहून दुसऱ्या अवस्थायुक्त वस्तूच्या अभावाला प्रतिषेध विषय करिते? किंवा त्या अवस्थायुक्त ही वस्तूच्या अभावाला? पहिल्या पक्षीं 'पूर्वी तेथें रजत होते आतां नाही' असा निषेध होईल. दुसऱ्या पक्षी (यथार्थ स्थली पूर्वज्ञानाच्या विरोधामुळे बहनाच्या पुरुषाच्या दृष्टादिगमनविषयक उत्तर ज्ञानाच्या अनुभवाप्रमाणे विभ्रमांतही) पूर्वानुभवाच्या विरोधामुळे या निषेध ज्ञानाची जागा होणार नाही. पण मागील अनुभव उत्पन्न होत असल्यामुळे (व त्याच्या पूर्वविज्ञानाच्या विषयाच्या अपहारानेच उदय होतो म्हणून) त्या अनुभवाच्या विरोधामुळे पूर्वीच्या अनुभवाला अनालंबनता आहे? हेंही युक्त नाही. कारण सर्व

न्या.म. १३२।३

२६२ | २६३

अनुभव आपल्या विषयास दाखविण्यांत शूर असतात. अन्यथा अति प्रसंग येतो (सत्य स्थलींही पूर्व विज्ञानाच्या विषयाच्या अपहाराचा प्रसंग येतो. पण सत्यमिथ्यात्व वैषम्यामुळे सदसत् व्यवहाराची सिद्धि होते असेंही नाही. कारण उत्तराला सत्यत्व असतां पूर्वीचा मिथ्यात्व व पूर्वीला मिथ्यात्व असतां उत्तराला सत्यत्व असा येथें परस्पराश्रय प्रसंग येतो.) म्हटलें आहे कीं-

"अन्यथैव यद्यनालंबना कथं मानोदयं कुर्यात्। इत्यादिक प्रकारेण बाह्यार्थ परिकल्पनाम्" (= एकाच काळीं संवित जर निरालंबन उत्पन्न होईल तर त्या दृष्टान्तानुरूप सर्व ज्ञानांना निरालंबनता प्राप्त होऊन सुगतमतसिद्धि होईल.) होन्हीं

॥ टिप्पणी ॥

पण मग 'हें रजत नव्हे' या प्रतिज्ञासाठी परमार्थ रजताभाव विषयता असतां प्रतीत रजताचे बाधाच्या अभावामुळे अवस्थान न राहील? त्यावर सांगतात- 'त्यामुळेच'? नाही रजताला अविद्योपादानत्व असल्यामुळे अधिष्ठान तत्वावबोधाने उपादान अशा अविद्येची निवृत्ति झाली असतां त्याची निवृत्ति होते म्हणून 'मागेच रजत मिथ्या भासले' असा परामर्श होतो. त्याने त्याच्या अवस्थानाचा प्रसंग येत नाही. असा अर्थ. पण उत्तर ज्ञान पूर्वज्ञानाच्या विषयाचा अपहार करून उत्पन्न होते. मग पूर्वज्ञान त्यांनी निरालंबन असें? असें सांगतात- 'म्हटलें आहे कीं'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ निवरणव्याख्यानं ॥

अनुभवांचा विरोधमात्र हें पूर्वी (अन्यथाख्यातिनिरासप्रसंगी, "ज्ञान जर दोन्हींना दाखवितें तर विशेष्य कोणता?
असा प्रश्न) विस्ताराने सांगितलेंच आहे. विभ्रान्तीतरतर विषयाचा अपहार न सांगतां हि अनिर्वा-
च्यविषयतेनें उपपन्न होते. जेंहि 'ख्यापुरुष ख्यातिबाधांची अन्यथा उपपत्ति (= उपपत्तीचे फक्त व्हावी.)
असतो सांगितली' असें म्हटलें तेंहि यानें निरस्त झालें. पुनः "असत् असून दिसणारें रजताचें (प्रभावामुळें
भावत्व असून) अनादित्व असतां अनंतत्व येऊन सर्वदा उपलब्धीमुळें अबाध्यापत्ति येते" असें जें म्हटलें ते
तसा अंगीकार नसल्यामुळें परास्त आहे. जें "कादाचित्कत्व विषयीं कारण सांगितलें पाहिजे" असें म्हटलें ते
खरें आहे. म्हणून अविद्यालक्षण कारणाचा येथें आश्रय केला जातो. आतां जें म्हटलें की 'अविद्या ज्ञान जे क्रिया
अभाव किंवा मिथ्याज्ञान दोन्हीही अद्रव्यत्वामुळें कस्याचे समवायी कारण असूं शकत नाही.' तें देखील असत्
आहे. कारण अनादि अनिर्वाच्य अविद्येचा (रजताच्या कारणरूपानें) आम्ही आश्रय केला आहे. कार्य तुच्छ असतां त्या तर
कारणभावाची अविरोधे उपपत्ति होते. इतकी अप्रामाणिकता आहे हे सिद्ध नाही. कारण कार्य जर तुच्छ असेल तर तिची उपप
त्ति होते. कारण कादाचित्क हें कारणावांचून नसतें. उपादानकारणावांचून तर निमित्तकारणमात्रापासून कोणतीहि कार्यसिद्धि होत
नाही. कारण ध्वंसावांचून उत्तरकार्याला उपादानकारणाचा नियम आहे. असत् कार्याला व साक्षात् सत्‌ उपादानता
युक्त नाही. कारण तसें असतां कुंभादिकांप्रमाणें कार्याला सत्यता प्राप्त होईल. समस्त सामर्थ्य विरहित असून असतां
ला तर उपादानता युक्त नाही. अशा रीतीनें सद्रूपता व उपादानता अनुपपन्न असतां त्या दोहोंनी विलक्षण (अनि-
र्वचनीय भावरूप) कारण त्याच्या परिणामानें कार्य अनुमानानें जाणावें. ज्याप्रमाणें सुखादिक पृथिव्यादिकांचे विकार
अनुपपन्न असल्यानें अष्ट द्रव्य विलक्षण आत्म्याला आपल्या आश्रयत्वानें अनुमापन करितात. पुनः त्या उपादानाला
सादित्व असल्यास ९२३१८ त्याच्या उपादानाच्या कल्पनेच्या प्रसंगामुळें अनवस्थादिक दोष येतो. म्हणून प्रवाह व संकोच्या
सहाय्यानें ते अनादीच जाणलें पाहिजे. येथें प्रयोग असा - विवादस्थान (मिथ्या रजत) अनादि अनिर्वचनीय उपादान

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरणव्याख्यान ॥

बाध व भासाचे अनुक्रम [illegible]

ओह. विपक्षांत (त्याला मात्र असत्य असता) बाधकाची उपपत्ति होत असतां कल्पित्व असल्यामुळे जें यथोक्त साध्य (अनादि अनिर्वचनीयोपादान) अनिर्वचनीय ज्याचें उपादान आहे असें नसेल तें यथोक्त साधन (सदसत् विलक्षण कार्य) नसतें जसें उभय वाद्यां-च्या अविवादास्पद स्थान (घटादि व आत्मा) वस्तु." जेंतें रजतादिकाचें उपादान, अनादि अनिर्वाच्य, दोन्ह आ-मच्या अविद्या सिद्ध होणारी रजतादिकांचें उपादान सेनर स्वप्रमाणानें (वरील अनुमानानें) प्रसिद्ध अ-सल्यामुळे न तिच्या रजतादिकांच्या उपादानतेविषयीं विवाद करूं नये. म्हणून अशाप्रकारें सांगितलेल्या दोहींनें सदसद्वैलक्षण्य हें अनिर्वाच्य लक्षण असतां (यासंबंधातींत) कोणत्याहि प्रकारचा दोष लेशही येत नाहीं. हें सिद्ध झालें.

१२८।११

दुसरे पुनः बाधाच्या विषयभावाला अनिर्वाच्यता लक्षण म्हणतात. असें असतां ही अतिव्याप्ति येत नाहीं कारण अनि-र्वाच्य आत्मादिकाचा बाध होत नाहीं. अव्याप्तीही येत नाहीं कारण अनिर्वाच्य रज्जुभुजंगादिकाला बाध्यत्वाचा नियम आहे. पण हा बाध म्हणजे कोणता? सांगतो- हा भेदाग्रहानें प्राप्त झालेल्या व्यवहाराचें निवारण नव्हे. असें पूर्वी (अख्यातिनिरा-सप्रसंगीं) सांगितलेच. विज्ञानाच्या विषयाचा अपहार हा नव्हे. कारण समान विषय व भिन्न विषय अशा विज्ञानांच्या योगानें त्याचा असंभव आहे. समानविषय, दुसऱ्या अनुभवानें तर दुसऱ्या अनुभवाच्या विषयाचा अपहार संभवत नाहीं कारण धारावाहिक विज्ञानांसही त्याचा प्रसंग येतो. भिन्नविषयक विज्ञानानेंही नव्हे; कारण स्तंभानुभवानेंही कुंभानुभवाच्या विषयाच्या अपहाराचा प्रसंग येतो. पण 'विरोध असतां' या विशेषणामुळे हा दोष येत नाहीं अ-सें होत नाहीं. कारण स्वविषयांत दूर अशा विज्ञानांच्या विरोधाभावाला पूर्वी सांगितलें आहे. पुनः विज्ञानांच्या विषयाचा अपहार असतां निवाके वक्तापत्ति येते. म्हणून कार्याशी सह अविद्या निवृत्ति यथार्थ बाध आहे असें आचार्य म्हणतात. व तसें असम-तो बाधाविषयत्वाच अनिर्वाच्यता सत्य. अशा रीतीनें सर्व निर्दोष आहे. २३८।८ दुसरे (विवरणाचार्य) तर प्रतिपन्न उपाधीत (एकवेळला अधिष्ठानावर प्राप्ताचा) प्रतिषेधाला बाध म्हणतात. व बाधक प्रत्ययाकडून एकवेळा बाधाच्या विषयभावाला अनिर्वाच्य लक्षण म्हणतात. या लक्षणांत ही व्यभिचार येत नाहीं. कारण सत्य चिदात्म्याचा प्रतिपन्न उपाधीत प्रतिषेध उप-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरणव्याख्यान ॥

लब्ध होत नाही. अत्यंत असत् शशशृंगादिकांच्या तरअ प्रतीतीने त्याच्या प्रतिषेधाची अनुपपत्ति आहे. सदसद्रूपवस्तु तर नाहीच की जेथें व्याभिचाराची शंका येऊं शकेल. आतां जर कोणी पूर्वोत्तर मनुष्याच्या आचारबळाने रजतादिकांना सदसद्रूपता म्हणेल तर त्या रजतादिकांच्या आभासाप्रमाणे अर्थ सद्भाव असतां त्याचे भ्रान्तिबाध कसे उपपन्न होतील? हें चिन्त्य आहे. पण सदसद्रूपाची सद्रूपानें प्रतीति भ्रान्ति आहे? तर काय आतां अपूर्णतेने उपलब्धीत भ्रान्ति आहे? मग असें असतां सर्व ज्ञानांना विश्रान्तिला दुर्बर आहे. कारण येथें कोणताही ज्ञानानें सर्वरूपानें अर्थ कळत नाही. असें म्हटले आहे कीं – "सर्वात्मनाऽर्थो ज्ञानेन केनचिन्नाहि गृह्यते" [ ] पण मग भ्रान्तिबाध नसावा? असे ही म्हणतां येणार नाही. कारण त्यांच्या प्रसिद्धीचा विरोध येतो. पण ती प्रसिद्धि भ्रान्ति आहे? मग तिचा बाध सांगितला पाहिजे. (४) तरी असें दूं देखील भ्रान्तिबाधांच्या आश्रय केला आहे तेव्हां मिथ्यात्व हट्ट धरून काय उपयोग? म्हणून जे सत् नसून असत् नसून सदसत् हीं नाही तर अनादि अनिर्वाच्य अविद्याकार्य (म्हणून अनिर्वाच्य) आहे वंध्येच्या मिथ्या निर्मोक आहे (५) असें ते विभ्रमाचे आलंबन आहे असें सिद्ध झाले.

तात्पर्य – "आत्मख्यातिरसत्ख्यातिरख्यातिः ख्यातिरन्यथा । तथाऽनिर्वचनख्यातिरित्येतत् ख्यातिपञ्चकम् ॥" [ ] अशा ह्या ख्याति पांच प्रकारच्या आहेत. त्यांत शून्यवादी असत्ख्यातिवादी असून आत्मख्याति, अख्याति व अन्यथाख्यातिवादी हे सत्ख्यातिवादी आहेत. सिद्धान्ती (वेदान्ती) हे अनिर्वचनीय ख्यातिवादी आहेत. शुक्तीत अपरोक्ष होणाऱ्या रजताचें बुद्धीत किंवा इतरत्र सत्व संभवत नसल्यामुळे, शून्यत्व असतां अपरोक्षत्वाचा असंभव असल्यामुळे, शुक्तीत सत्व असतां बाधाचा असंभव असल्यामुळे, त्याला सदसत् विलक्षणत्वच आहे.

॥ टिप्पणी ॥

(४) 'बाध सांगितला पाहिजे' – कारण बाधावांचून भ्रान्तीची सिद्धि होत नाही असा अर्थ. (५) 'वंध्येच्या मिथ्या निर्मोक' – याने ज्ञान व ज्ञेय या दोघांनाही अनिर्वाच्यत्व सांगितले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धर्मत्व कल्पना मा चक्षीत् इति। सर्वथाऽपि त्वन्यस्यान्यधर्मावभासतां न व्यभिचरति।

॥ व्याख्यान ॥

–समानता 'आचक्षीत्'–म्हणतात–'इति'–असें इति शब्द मतान्तरांच्या उपन्यासाच्या समाप्तिकरितां

आहे. या सर्व 1217 कल्पनाप्रकारांचे स्वमतानुसारित्व दाखवितात–'सर्वथाऽपि तु'–या सर्व प्रका-

रांतही निश्चयें करून 'अन्यस्य'–दुसऱ्यांला 'अन्यधर्मावभासतां'–अन्य आहे धर्म ज्याचा

अशा दुसऱ्याची जो अवभासमानता तिला–अवभासित्व नामक जें लक्षण =‘परत्र’ असें म्हटलें

असतां सामर्थ्यावरून परावभास सिद्ध होतो म्हणून जें सांगितलें त्याला ‘न व्यभिचरति’

=अध्यास सोडीत नाही. कसें? पहिल्या कल्पांत ज्ञानाकाराच्या किंवा बाहेर असलेल्या रजतादिकाच्या

शुक्तिच्या धर्मत्वानें अवभास असल्यामुळे अध्यास लक्षणाला सोडीत नाही. दुसऱ्यांत ही पृथक्

असलेल्या शुक्तिरजतांच्या अभिमानामुळे अपृथक् अवभास आहे म्हणून व तिसऱ्यांतही शु-

॥ विवरण ॥

इत्यादि.

–तिला अवभासित्व नामक जें लक्षण. पण लक्षण वाक्यांत ‘परस्य’ शब्द नसल्यामुळें ‘दुसऱ्याला दुसऱ्याच्या रूपानें अवभासित्व’

हें लक्षण कसें? हा दोष येत नाही कारण ‘परस्य’–दुसऱ्या ठिकाणी असें म्हटलें असतां सामर्थ्यावरून ‘परस्य’–दुसऱ्याचा

असा प्राप्त होतो. हें पूर्वीं सांगितलेंच आहे असें सांगतात–‘परत्र असें’ ‘अभिमानामुळें अपृथगवभास’ अख्यातिवा-

द्यानेंही मानस संसर्गज्ञान किंवा संसर्गाभिमान सांगितला पाहिजे असा अभिप्राय.

॥ विवरणव्याख्यान ॥

पण स्वरूपलक्षणाची अख्यातिमतांत अनुमति कशी? कारण संसर्गज्ञानाला त्यांनीं मानलेंच नाही? अशी आशंका असतां सांगतात–

‘अख्यातिवाद्यानेंही’. नेत्रानें अयथार्थ ज्ञानाचा अभाव असतांही मानस अयथार्थ ज्ञान अख्यातिवाद्यांकडून अंगीकारिलें जातें. कारण “

देहादावनात्मनि आत्मबुद्धिरविद्या” [ ] अशी सांख्यांची उक्ति आहे. असा अर्थ. प्राभाकरांकडूनही संसृष्ट व्यवहाराच्या

अनुपपत्तीनें संसर्गज्ञान अंगीकरणीय आहे असें सांगतात–‘संसर्गाभिमान’. पण त्यांच्या लक्षणांत अनुमति दाखविली नस- 36।16

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

1215

शिंपल्याच्या रजत रूपाने प्रतिभासनामुळे अध्यास लक्षणाला सोडीत नाही. पूर्वदृष्टत्व व स्मृतिरूप-
त्वाविषयीं तर सर्व मतांत मान्यता असल्यामुळे विवाद नाही असा अभिप्राय. तेथें 'स्मृतिरूपः पूर्व-
दृष्टावभासः' एवढें लक्षण असतां निरुपाधिक निरधिष्ठान अध्यासवादि पक्षांत ही लक्षणाची अ-

॥ विवरण ॥

पर्याय सर्व पक्षांत (=मतांत) स्मृतिरूपत्वें सांगितलेले कारण विषयजन्यत्व उपेक्षित आहे? यावर नाही असें सांगतात- 'पूर्व-
दृष्टत्व' पण अविद्यादि दोषव पूर्व भ्रम संस्काराच्या योगानेच उत्पन्न होणारा पदार्थ मात्र ज्ञानें विभ्रम आहेत. विभ्रम क-
ला वस्तु व तिच्या संयोगादि प्रमाणकारणाची अपेक्षा करीत नाही. म्हणून 'परत्र' हे पद अविवक्षित आहे? असें शून्य
वादी मानतो. त्यावर सांगतात- 'तेथें स्मृतिरूपः' तेथें=लक्षणवाक्यांत. पदार्थ मात्र ज्ञानतर विभ्रम नाही कारण

॥ विवरणव्याख्यान ॥

म्हणून तिचा असंभव आहे? अशी शंका घेता- 'पर्याय सर्वे' भ्रान्तीला संस्कार संप्रयोगादि व दोषजन्यत्व सर्वांनी मानले असल्या-
मुळे त्या लक्षणाची अनुपपत्ति न दाखविण्यांत दोष नाही असें सांगतात- 'यावर नाही' निरधिष्ठानवादि पक्षांत लक्षणाच्या अतिव्या-
प्तीच्या निरासाकरितां 'परत्र' पद अपेक्षित आहे असें व्याख्यानांत सांगितले. तेथें निरधिष्ठान पक्षात उपपन्न होत नाही कारण अधिष्ठान-
ज्ञान लक्षण कारणाच्या अभावाने भ्रमाचा असंभव आहे? अशी आशंका असतां त्या पक्षाला दाखवितात- 'पण अविद्यादि' पण
'परत्र भासः' एवढेंच म्हटले असतां पर्यादिकांना ही व्याप्ति येईल? अशी आशंका असतां तें इष्ट आहे असें सांगतो- 'पदार्थ मात्र ज्ञानें' पण अधि-
ष्ठानज्ञान असतांच भ्रम त्यांत होत असल्यामुळे तेही कारण आहे? अशी आशंका असतां 'हे' काराला ही समावेशित्व असल्यामुळे अधि-
ष्ठानाची सिद्धि नाही असें सांगतो- 'विभ्रम' हे निरुपपत्तिक आहे असें सांगतात- 'त्यावर सांगतात' पण अधिष्ठानरूपा वाच्या वस्तूनही
अविद्यादि दोषाने भ्रमोत्पत्तीचा संभव असल्यामुळे या निरुपपत्तिकाव अशी अशी आशंका असता काय पदार्थ मात्र ज्ञान भ्रम आहे? किंवा
अविद्यादिजनित ज्ञान? असा विकल्प करून पहिल्याचे निरसन करितात- 'पदार्थमात्रज्ञान'.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

तिच्याहि होईल. म्हणून तिच्या निवृत्तिकरितां 'परत्र' असें म्हटलें.

१२।८

पण हा पक्ष निरुपपत्तिक कसा? निरधिष्ठान अध्यास पूर्वदृष्ट नाही किंवा संभवत नाही म्हणून. पण केशोंडुकादि अवभास निरधिष्ठान दृष्ट आहे? नाही कारण त्याच्याहि तेजोवयव अधिष्ठान आहे. पण

॥ विवरण ॥ (=तसें लक्षण असतां)

शून्य ज्ञानाबाबतहि तथात्वप्रसंग येतो. परंतु दुसऱ्या ठिकाणीं दुसऱ्याचें ज्ञान विभ्रम आहे. म्हणून अविभ्रम असाहि पदार्थ ज्ञानात् (त्या लक्षणाला) लक्षणाची अतिव्याप्ति होते असल्यामुळें त्याला निरुपपत्तिकत्व आहे. शून्यवादी शंका घेतो - पण हा पक्ष निरुपपत्तिक याप्रकारांतरहि भ्रमत्व सिद्ध होते. तेव्हां त्याला साधिष्ठानत्व कसें? असा अर्थ

कसा? अविद्यादि जनित्वामुळें सर्व ज्ञानाला भ्रमत्व आहे. तेव्हां अधिष्ठानाची सिद्धि कशी?

तं. टी. १८।८

काय अधिष्ठान मात्राचें निराकरण करितोस? किंवा सत्य अधिष्ठानाचें? पहिला पक्ष बरोबर नाही कारण अविद्यादिकांप्रमाणें अधि-ष्ठानानेंहि ग्रहणाहि अन्वयव्यतिरेकानें सिद्ध आहे असें सांगतात- 'निरधिष्ठान अध्यास' पण व्यतिरेक असिद्ध आहे? अशी

शंका घेतो - 'पण केशोंडुकादि'? - हस्तानें मुद्रित लोचन रश्मीत जो ही केशपिंडावस्था तो केशोंडुक. मायाहस्त्यादि भ्रम 'आदि' शब्दाचा अर्थ आहे. केशोंडुकांतहि निरधिष्ठानत्व असिद्ध आहे? असें सांगतात- 'नाहि कारण' पण संवितवरच

३८।१

त्यांना इतरेतराधिष्ठानत्वानें साधिष्ठान भ्रम संभवत असतां तिसऱ्या सत्य वस्तूला अधिष्ठानत्व कल्पना युक्त नाही?

॥ विवरणव्याख्यान ॥

~~अनवस्था... ग्रासक... असा अर्थ~~

दुसऱ्या पक्षाचें उत्थापन करितो - अविद्या विकल्पानें उत्तर सांगतात 'वाच्य अधिष्ठानमात्राचें' पुढील - 'पण संवित' याच्यापूर्वीपर्यंत ग्रंथ स्पष्टार्थ आहे. 'पण ज्ञाताला संवित' येथें भ्रमाला साधिष्ठानत्व सांगितलें व तसें असल्यास सिद्धान्ताची इष्टसिद्धि होते. म्हणून त्याच्या असंगतीची शंका असतां दुसऱ्या (=सत्य अधिष्ठान नाही या) पक्षाचें उत्थापन करितो, असें सांगतात-

~~असें सांगतात~~ 'पण संवित' पण असत्याला अधिष्ठानत्वाची अनुपपत्ति असल्यामुळें सत्यच अधिष्ठान आहे अशी

॥ टीप ॥

व्यतिरेक - अधिष्ठानाच्यावाचून अध्यासाचा अभाव

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

रजताला संवित् व संवित्ला रजत असा बीजांकुराप्रमाणें परस्पराधिष्ठान अध्यास होईल? यानंतर नाहीं कारण तेथें ज्या बीजापासून जो अंकुर उत्पन्न होतो त्याच अंकुरापासून तें बीज उत्पन्न होत नाहीं. तर दुसऱ्या अंकुरापासून होते. येथें तर ज्या संवित्मध्ये जें रजत भासतें त्यांचाच परस्पराध्यास आहे.

॥ विवरण ॥

(अध्यासवाद)

अशी (अन्यथा) दुसऱ्या पक्षाला धरून शंका घेतो. 'पण रजताला' पण अध्यस्यमानाहून पहिल्याने अधिष्ठानाची सिद्धि मांगितली पाहिजे. तेथें इतरेतराधिष्ठानत्व असतां इतरेतरांच्या अपेक्षेनें त्यांची सिद्धि असल्यामुळे हें असमंजस आहे? त्यावर सांगतो 'बीजांकुराप्रमाणे' बीजांकुरादिकांत इतरेतराश्रयता नाही परंतु कारणपरंपरेने अनवस्था आहे असा परिहार करितात- 'यांत सारं नाही' पण येथेंही कारणपरंपरा आहे? यावर नाहीं असें सांगतात- 'येथें तर'.

7.

॥ विवरणव्याख्यान ॥

शंका घेतात- 'पण अध्यस्यमानाहून' अधिष्ठान ज्ञानाला कारणत्व असल्यामुळे अध्यस्यमानाच्या सिद्धीच्या पूर्वी त्याची सिद्धि मांगितली पाहिजे. वस्तुतः अधिष्ठानाचा बोध असतां अध्यस्यमानाची सिद्धि होत असतां अध्यस्यमानाच्या तंत्राने अधिष्ठानाची सिद्धि होते असें स्वरूपास कोणीही सिद्ध होणार नाही असा अर्थ- पण बीजांकुरांमध्ये ते इतरेतराधीनत्व असलं तरी हेतुहेतुमद्भावाप्रमाणे संवित् रजतांतही त्याचत्व (हेतुहेतुमद्भाव) नाहींं? असें सांगतो- 'त्यावर सांगतो'. पण दुसऱ्या अंकुराचा बीज जन्यत्व असल्यामुळे इतरेतराश्रयत्व कसें नाही? अशी आशंका असतां, ज्या बीज व्यक्तीपासून त्या अंकुरव्यक्तीचा जन्म होतो. त्या अंकुरापासून त्या बीजव्यक्तीचा जन्म असता इतरेतराश्रयत्व आहे? किंवा त्या जातीयापासून? पहिला पक्ष नाही. कारण बीजांकुरांत तसें मान्य नाही. 'बीजांकुरादिकांत' दुसऱ्या पक्षीं अनेक बीजांकुरव्यक्ती मानल्या असल्यामुळे इतरेतराश्रयत्व नाही असें सांगतात- 'परंतु' पण अशा रीतीनेच संवित्‌रजतपरंपरेचा आश्रय केला असल्यामुळे इतरेतराश्रयत्व नाही? अशी शंका घेतो- 'पण येथेंही' कार्यवैं कारणपरंपरा अनुभवाने सिद्ध आहे? किंवा दुसरीकडून? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितात- 'यावर नाही'.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

म्हणून हे दुर्घट आहे. बीजांकुरांतही दुसऱ्या बीजांकुर परंपरा मात्रानें अभिमतवस्तु (उपादान-कारणभाव) सिद्धि होत नाही. कारणप्रतीतिवरून व वस्तुन करून अन्वयिकारणाची आकांक्षा

॥ विवरण ॥

येथें जर संवित् रजताच्या इतरे तराध्यास आहे तर त्यांचीं मध्ये एकच मानली पाहिजे. बीजांकुरांत तर कारण परंपरेमुळे तशी नाही. ~~असा अर्थ~~ म्हणून येथें इतरेतराध्यय त्यायेत असा अर्थ. पण मग येथेंही रजत(अधिष्ठान) संवित् व रजत पूर्वे संवित् वर व ती स्वविषयावर व ती पूर्वे संवित् वर अशी परंपराच आम्ही कल्पित करितो असें असेल तर जर पूर्व पूर्व उत्तरोत्तराला अन्वितत्वानें अधिष्ठान आहे तर उत्तरोत्तराच्या अध्यासांत पूर्व पूर्वांच्या युगपत् अवस्थानामुळे क्षणिकत्वाची हानि होते. पण बीजांकुरांत अन्योन्य उपादानत्व असतांही युगपत् अवस्थान दिसत नाही. त्यावर सांगतात - 'बीजांकुरांतही' 'अभिमतवस्तुसिद्धि' - अन्वयी (उपादान) कारणत्वाची सिद्धि असा अर्थ. 'कारणप्रतीतीवरून' - ~~म्हणून~~

॥ विवरण व्याख्यान ॥

दुसऱ्याचा अनुवाद करितो - 'पण मग येथेंही' काय पूर्व पूर्वाला उत्तरत्र[1] अन्वितत्वानें अधिष्ठानत्व आहे? किंवा अनन्वितत्वानें?[2] असा विकल्प करून पहिल्याला[1] दूषित करितात - 'जर पूर्व पूर्व' संवित् च्या रजतावर अध्यास समयीं संविदधिष्ठान रजताला संवित् मध्ये अन्वितत्व असल्यामुळे रजताधिष्ठानाचीही तेथें अन्वितत्वानें उपलब्धि होईल. अशा रीतीनें पूर्व पूर्व व्यक्तींच्या सद्भावामुळे क्षणिकत्वाची हानि होईल असा अर्थ. त्याचें अनुसंधान करून व्याख्यानांत 'म्हणून हे दुर्घट आहे' असें सांगितले. ज्यामुळे तुं मानल्याप्रमाणे विषय विषयींच्या इतरे तराध्यासाला औत्पत्तिक आहे त्यामुळे संवित् व रजताची परंपरा कल्पना दुर्घट आहे असा अर्थ. किंवा बीजादिकाहून वैषम्याचा येथें उपसंहार आहे. पण संवित् व रजताला अन्वयित्वानें अधिष्ठानत्व असतांही बीजांकुराप्रमाणे त्यांचें युगपत् अवस्थान नाही? अशी शंका घेतात 'पण बीजांकुरां[redacted]त' दृष्टान्ताच्या असंमतीनें दूषित करितात - 'त्यावर सांगतात'. पण 'अभिमतवस्तुसिद्धि' येथें कार्यकारणभावाचें व्याख्यान आहे व त्यामुळे अन्वयरूपाविशेष्याचा विशेष घेतो? अशी आशंका असतां सांगतात - 'अन्वयिकारणत्वाची'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

निवृत्त होत नाही. मग येथेही निमित्तनैमित्तिकत्व असो? नाही. मग तेथेंही हें असे (निमित्तनैमि-

॥ विवरण ॥

असा अर्थ.
= कारण (अनुभवावरून) बीजादिक अनन्वित असल्यामुळे तेथें अन्वयि (उपादान) कारणाची आकांक्षा निवृत्त होत नाही असा अर्थ. म्हणून अन्वयी द्रव्य तेथें उपादान आहे व बीजादिकाळा अन्योन्य निमित्तता आहे. असा भाव. पण पूर्वक्षणवर्ति उत्तरक्षणी असलेल्याचा कारण आहे. अनुगत नाही. या पक्षांत पूर्वाळाही कार्यत्वाने दुसऱ्या कारणाची आकांक्षा उपरमाळा प्राप्त होत नसल्यामुळे अनुगत किंचित् कारण मानले पाहिजे तें हें सांगतात 'वस्तुवस्तु' मग येथेंही पूर्वाळा उत्तराप्रत बीजादिकाप्रमाणे अनन्वितत्वानेंच अध्यासाप्रत निमित्तता असो? अशी शंका घेतो - 'मग येथेही'
= बीजांकुरांतही
अदृष्टत्वामुळे येथें तसें नाही असें सांगतात 'नाही'. आम्माने आक्षेप घेतो - 'मग तेथेंही' ~~आम्माने आक्षेप घेतो मग~~

॥ विपरण व्याख्यान ॥

पण मग अन्वयी कारण नसो! या (~~दुसऱ्या~~) शंकेच्या निवृत्तिकरितां 'प्रतीति वस्तुत' इत्यादि म्हणून तें अनुपपन्न आहे कारण बीजादिकाने आकांक्षेच्या उपशम होतो? अशी आशंका असतां सांगतात - '~~कारण अनुभवावरून~~ बीजादिक अनन्वित असल्यामुळे' घर शरावादिकांच्या व कटक कुंडलादिकांच्या मृत्तिका सुवर्णाने अन्वितत्वाने उपलब्धीच्या अनुसार बीजांकुरांतही अनुगत निमित्त कारण आश्रयणीय आहे. असा अर्थ. पण बीजांकुरादिकांना अनन्वितत्वामुळे कारणत्व आहे तर दुसऱ्या उपादानाचे निरूपण करितां येत नसल्यामुळे अंकुरादि निरुपादान प्राप्त झाले अशी आशंका असतां सांगतात - 'म्हणून अन्वयी द्रव्य' अन्वयी द्रव्याचा अवश्य आश्रित्व असल्यामुळे असा म्हणून शब्दाचा अर्थ. बीजादिकांच्या आरंभकत्वाने तेथें अनुगत जे (भूत) अवयव ते उपादान आहे असा अर्थ. बीजादिकाचा वैयर्थ्यही नाही कारण निमित्तत्वाने त्याचा अर्थवत्व आहे असें सांगतात 'व बीजादिकाळा'. अनन्वितत्वाने अधिष्ठान (आकुंचना) पश्चात् उत्पन्न करितो - 'मग येथेंही' प्रमाणाभावामुळे असें नाही असें सांगतात 'अदृष्टत्वामुळे' बीजांकुराळा जन्यजनकत्व दृष्टत्वामुळे अध्यादिक जाते तसें अदृष्टत्वामुळे संवित् रजताळा नाही. असें सांगितले तेथें हे विवरणीय आहे की - कार्यसकळ बीजांकुरांत जन्यजनकत्व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

[दृष्टत्वा- येथें]
निरूपणाने कार्यकारणत्व) कसें? अशी आशंका असतां (दिसत असल्यामुळे (बीजांकुरांत) असे आहे. तेथें (संवित् शुक्तिरजतांत) तर दूर जाऊन स्थित झाले पाहिजे. अन्यथा हेतुपरंपरेलाच

॥ विवरण ॥

~~देशीं है असें कोणी? अशी आशंका असतां दिसत असल्यामुळे~~ ' हा भाव - बीजांकुरांत कार्यकारणभाव दृष्टप्रत्यक्षामुळे असल्यास ही त्यांचीच कार्यकारण परंपरा दृष्ट परंपरा त्यामुळे अनवस्था दोषाला धारण करीत नाही. संवित् रजतांच्या अधिष्ठान अधिष्ठेयतेने निश्चित नैमित्तिक भाव प्रथमत्र कल्प्य असल्यामुळे त्यांचीच पूर्वपूर्व निमित्त नैमित्तिक भाव कल्पना तर अंधपरंपराच होईल असा. [दृष्ट] अंधपरंपरेलाच दाखवितात - 'दिसत असल्यामुळे असें आहे.' 'दूर जाऊन' - अंधपरंपरेच्याच दूर जाऊन असा अर्थ. 'अनवस्थादोषालाच' = अंधपरंपरेलाच असा अर्थ. सर्व भ्रमांना दोन आकाराने अवभासत्व असल्यामुळे 'परत्र परावभासत्व' भ्रम आहे असें सांगितले. भ्रान्तिज्ञानाने प्रतिपन्न

॥ विवरण व्याख्यान ॥

दृष्ट आहे? केव्हां कांहीं ज्यातीत पहिल्यापक्षी 'दृष्टत्वामुळे' याचा भागाने असिद्ध आहे. दुसऱ्यापक्षी अदृष्ट स्थळींही बीजांकुरांना जन्यजनकते प्रमाणे प्रकृतांतही त्याचा संभव आहे? अशी आशंका असतां सांगतात - 'हा भाव.' बीजांकुरांत जन्यजनकभाव [क] क्वचित् प्रत्यक्ष असल्यामुळे अन्यत्रही त्याची कल्पना आहे. 'विदित बीजांकुर अदृष्ट स्थळींही जन्यजनकभाववत् आहेत. त्यांना बीजांकुरजातीयत्व असल्यामुळे संमत बीजांकुराप्रमाणे' म्हणून तेथेंही अनवस्था दोषाला कारण नाही. प्रस्तुतांत तर संवित् रजतांच्या अधिष्ठान अधिष्ठेय (= आधेय कथन) भाव कोठें हीं प्रत्यक्ष नसल्यामुळे त्यांची निश्चित नैमित्तिकभाव कल्पना अंधपरंपरा आहे. असा अर्थ. 'पुनः' म्हणजे निरवधिक बाधाभावांत दुसऱ्या हेतूचा उपन्यास केला जातो असें भासतें तें संगत नाही कारण पुढें कोणताही हेतूचा उपन्यास केलेला नाही? अशी आशंका असतां वृत्तकथनपूर्वक तात्पर्य सांगतात - 'सर्व भ्रमांना' 'हें रजत, हा सर्प' असें दोन आकाराने भ्रमाचे स्फुरण असल्यामुळे उपादानाचे ग्रहण केले पाहिजे असें सांगितले. संप्रत बाधक ज्ञानाच्या पर्यालोचनेने ही भ्रमाला सोपाधिकत्व.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अवलंबन करून कोठेंही स्थित नसलेला अनवस्थादोषाला अतिक्रमण करीत नाही. पुनः नाही असेंच बाधक ज्ञान कोठेही निरवधिक दिसत नाही. जेथेंही अनुमान किंवा आप्तवचनावरून 'सर्प नव्हे' असेंच ज्ञान दिसते, तेथेंही मग हें काय आहे? अशी अपेक्षा दिसत असल्यामुळें पुढें

१२।२०

असलेली वस्तुमात्र अबाधित असते. जगत्कारणांत प्रधानादिकांच्याही त्रिगुणत्वादिकाने लोणा-

॥ विवरण ॥

विषयरूपी अर्थात भ्रांति अंशाच्या अभावानें विशिष्ट अंशान्तर ज्ञानाला बाधकत्व असल्यामुळें हा साधिष्ठान भ्रम आहे, असे सांगतात – 'पुनः नाहि असेंच' पण अनुमान व आप्तवचनावरून सर्पाभावभ्रम करावा तर्क करता त्याच्या अभावाने विशिष्ट दुसरा अंश नाही? त्यावर सांगतात – 'जेथेंही अनुमान' तेथेंही अभावविशिष्ट वस्तुमात्र ग्रहण केले जाते. कारण विशेषाची आकांक्षा दिसते असा भाव. पण 'प्रधान नाही' इत्यादिकांत त्यांच्या अभावानें विशिष्ट दुसरी वस्तु ग्रहण केली जात नाही कारण त्यांना अन्यत्र अध्यस्तत्व नाही? त्यावर सांगतात – 'जगत्कारणांत प्रधानादिकांच्याही' अथवा सर्व भ्रमावभासांतही सा-

॥ विवरणव्याख्यान ॥

माधले जाते म्हणून विरोध नाही असा अर्थ. अंशान्तराच्या अभावानें विशिष्ट अंशान्तरांत ज्ञानाला बाधकत्व नियत नाही? अशी शंका घेतात – पण अनुमान? ज्याच्या योगानें व्याप्ति ज्ञानाच्या अनुसरून जाणले जातें तें अनुमान – लिङ्ग (हेतु). प्रमाणान्तर प्रक्षेप केला असतांही अप-जितत्वादि लक्षण असा अर्थ. मात्र शब्दाचे व्यावर्त्य सांगतो – 'त्याच्या अभावानें' पण वस्तुमात्र लक्षण अवधीचा संभव असतांही त्याच्या ग्र-हणाला बाधकत्व नाही? अशी शंका असतां सांगतात – 'तेथेंही' अंशान्तराचे ज्ञान बाधक आहे हें नियत नाही? अशी शंका घेतो – 'पण प्र-धान नाहीं इत्यादिकांत' 'परमाणु नाहीत' इत्यादि निषेध इत्यादि शब्दाचा अर्थ आहे. जगत्कारणांत त्रिगुणत्वादिकांची विप्रतिपत्ति असतां तेथें (जगत्) त्याच्या त्याच्यावरील प्रेयामुळें व्यभिचार नाही असें सांगतात – 'त्यावर सांगतात' 'अथवा' येथें अर्थाचा संबंध वादीलेल्या ज्ञानांतील बाध नाही हें प्रकारान्तरानें प्रतिपादन केलें जातें असें भासते. ते अयुक्त आहे कारण पूर्वी त्याचें प्रतिपादन केलेलें नाही? अशी आशंका असतां तात्पर्य सांगतात – 'अथवा सर्व'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

रबाध ज्ञानावधिकच असेतो. अथवाहं (सर्वभ्रान्तिवजगत्) सर्वलोकसाक्षिक (सर्वलोकाच्या जोमादी तो सर्वलोकसाक्षी चैतन्य तो अधिष्ठान व अवधि ज्याचा आहे असे) आहे. म्हणुन ते केशोंडुकादिकांसही जाणावे. त्याचा (=अर्थाचा) बाध झाला असतां त्याच्या संबंधाच्या बोधांत (व्यवहारात) अधिक केल्या जातो. बाध नाही. म्हणुन त्या अवधिपर्यंत सर्वत्र्या बाध होतो. त्याने बोध-

॥ विवरण ॥

साक्षीचैतन्य आलंबन विद्यमान असे त्यामुळे शंक्यमान निरधिष्ठान निरवधिक भ्रमबाधांतही साक्षीच अधिष्ठान व अवधि आहे असें सांगतात- 'अथवाहं सर्व?' चैतन्याला अधिष्ठानत्व मानले त्याचे फळ सांगतात - 'ते केशोंडुकादिकांतही?' त्यामुळे केशोंडुकादिकांतही साधिष्ठानत्वाची सिद्धि होते असा अर्थ. पण अर्थाच्या बाधाने ज्ञानाचाही बाध सिद्ध होत असल्यामुळे भ्रमाच्या बाध झाला असतां त्याला भासविणारे साक्षी चैतन्यही बाधित होईल? त्यावर सांगता त- 'त्याचा बाध?' 'बोध नाही' अधिष्ठानत्वानेही परिशेषामुळे असा भाव. उपसंहार करितात- 'म्हणून' त्याच्या विस्तार करितात- 'त्याने' = बोधत्वामुळे. ज्या अर्थी बोध आहे त्या अर्थी बाधित होत नाही असा अर्थ. याचा प्रयोग असा-

॥ विवरणव्याख्यान ॥

पण भासीला बाधित्व असल्यामुळे त्याला अधिष्ठानत्वादि अयुक्त आहे? अशी शंका घेतो- 'पण अर्थाच्या?' आश्रयाचा बाध झाला असतां त्याच्या अपेक्षेने असलेल्या अर्थज्ञान लक्षण साक्षीचाही बाध होतो असा अर्थ. काय विशिष्टाकाराचा बाध होतो? किंवा केवळाची असा विकल्प करून पहिल्याचा अंगीकार केला जातो असें सांगतात- 'त्यावर सांगतात त्याचा?' दुसऱ्याचा निरास करितात- 'बाध नाही?' अबाध्याच्या अबाधाविषयीं हेतु सांगतात- 'अधिष्ठानत्वानेही?' बाधाच्या साक्षित्वामुळे न पुनः दुसऱ्या भ्रमाच्या हेतु त्यामुळे चैतन्याचा बाध नाही असा अर्थ. 'त्याने' इत्यादि ग्रंथाने चिदधिष्ठानत्व सांगावयाचे असल्यामुळे पुनरुक्ति आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'त्याचा विस्तार?' विस्तार व्यर्थ आहे असें नाही. कारण दुसऱ्या शंकेच्या निरसनाच्याद्वारा त्याच्या विस्ताराचा संभव आहे. तो असा - 'विमत बोध बाध्य आहे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

मात्राच्या बाध्य होत नसल्यामुळे व स्वतः तर त्यांत विशेष उपलब्ध होत नसल्यामुळे कूटस्थ अ-
परोक्षैकरस नित्य तन्त्याबाधि सर्वांचा बाध आहे. पुनः अध्यस्तही असत्य नाही कारण तसें अ-

॥ विवरण ॥

'विमतबोध बाध्य नाही त्याला बाध्यत्व असल्यामुळे जे असे नसेल तें तसें नसते जसें रूप्यादि' पण 'विमत बोध बा-
ध्य आहे त्याला परिच्छिन्नत्व असल्यामुळे रूप्याप्रमाणे'. अशी आशंका असतां काय स्वाभाविक परिच्छिन्नत्व हेतु आहे!
किंवा औपाधिक? पहिला पक्ष नाही कारण त्याची असिद्धि आहे असें सांगतात- 'व स्वतः तर'. दुसऱ्या पक्षी [illegible]
[illegible] त्याचा व्यभिचार करितां 'तर' शब्द आहे. कारण औपाधिक परिच्छेद ज्यानें हा गगनाला अबाध्यत्व असल्यामुळें तेथें
व्यभिचार होतो असा अर्थ. विज्ञानवाद्याला अभिमत अधिष्ठानाहून विशेष सांगतात 'कूटस्थ'= उत्पत्त्यादि धर्म-
रहित (=निर्विकार) असा अर्थ. त्याविषयी हेतु सांगतात- 'अपरोक्षैकरस'. ज्ञानैकरस असा अर्थ. कारण "एकधै-
वानुद्रष्टव्यम्" [बृ. ४।४।२०] "प्रज्ञानघनः" [बृ. ४।५।१३] इत्यादि वाक्यें आहेत. अथवा स्वाभाविक विशेष
उपलब्ध होत नाही हें कसें? कारण उत्पत्त्यादि विशेष उपलब्ध होतो? अशी आशंका असतां सांगतात- 'कूटस्थ'.
साधन
साधिष्ठानभ्रम [illegible] च्या प्रसंगानें अध्यस्ताच्याही शून्यतेचा निरास करितात 'पुनः अध्यस्तही असत्य'.

॥ विवरणव्याख्यान ॥

त्याला बाध्य संबंधानें संबंधित्व असल्यामुळे संमताप्रमाणे' अशा अनुमानावरून बोधाच्या बाध्याची सिद्धि होते असल्यामुळे त्याचा
'बाध्यत्वामुळे' त्यापुढील साधिष्ठान [illegible]
अबाधित्व नाही? अशी आशंका असतां संबंध विशिष्ट आकाराला बाध्यत्व असतांही केवळाला बाध्यत्व नाही असा अर्थ. पण [illegible]
उप-
अशा व्याच्या असत्त्वाच्या निराकरणाला अधिष्ठानाच्या असत्त्वाच्या निरसनाच्या उपक्रमाही विरोध आहे? अशी आशंका असतां
घेतो' व्याख्यान
सांगतात- 'साधिष्ठान'. असत्त्व असतां प्रतिभासाचा असंभव आहे हें असंगत आहे. कारण काय असत् जाणून त्याचा निषेध केला-
जातो? किंवा न जाणून? पहिला पक्ष नाही कारण स्ववचनाचा विरोध येतो. दुसऱ्या पक्षीं तर असत् कळत नसतां त्याच्या निषेधाचा [illegible]-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

मतां भ्रान्तिभासाच्या असंभव येतो. पण सर्व हें असतच आहे असें तुमचेंही मत आहे? असें कोण म्हणतो? अनिर्वचनीय अनादि अविद्यात्मक असत्याचें तर आम्ही उद्घोषित केलें आहे. आतां जर विद्योदय झाला असतां अविद्येच्या निरुपाख्यत्वाचा (शून्यतेचा) अंगीकार करून

॥ विवरण ॥

कारण प्रत्यक्षावरून 'रजत आहे' अशा होणाऱ्या विशेष प्रतिभासाच्या असंभवाचा प्रसंग येतो असा भाव. कारण प्रतिभास मात्राचें निवारण असतां शून्यप्रकाशत नाही' अशा वाक्याला अबोधकत्व प्रसंग येतो. पण अध्यस्त सर्व शून्य आहे, असें तुमचें ही मत आहे? अशी शंका घेतो- 'पण सर्व हें' शून्याकडून भ्रमाची उपपत्ती हीं कथन केली च आहे. असें सांगतात- 'असें कोण म्हणतो?' भ्रमाचें सत्त्व उपपत्ति मात्र असत्त्व म्हणजे शून्यत्व नव्हे कारण त्याचा निषेधाचे प्रतियोगित्व आहे असा भाव. पण भ्रमाच्या स्वरूपाचें अनिर्वचनीयत्व असतांही बाध्यत्वानंतर शून्यत्व समान आहे? अशी शंका घेतो- 'आतां जर?'

॥ विवरण व्याख्यान ॥

असंभव आहे अशी शंका घेतो- 'कारण प्रत्यक्षावरून'. प्रथम हा दोष नसण्याचें कारण त्यांत हेतु सांगतात- 'कारण प्रतिभास' कारण असताचा प्रतिभास नसतां त्याच्या अनुवादाचें 'असत् असत नाही' अशा शब्द प्रयोगाची अनुपपत्ति आहे असा अर्थ. पण भ्रान्तिकाळीं सत्य मानलें असल्यामुळें 'सर्व हें असतच आहे' असें शंका करणें योग्य नाही? अशी आशंका असतां सांगतात 'पण अध्यस्त' काय अवे अभिमत आहे असें

विद्यावस्थेंत त्याचें असत्व म्हणजे जातो किंवा विद्यावस्थेंतील असा विकल्प करून पहिल्याचा निरास करितात- 'शून्याहून' पण 'व्यावृत्ति' पृथक्त्व. पण प्रपंचाचा असताहून वैलक्षण्य असतां शास्त्रीय असत्त्व व्यपदेश कसा? अशी आशंका असतां सत् वैलक्षण्याच्या अभिप्रायानें तो आहे असें सांगतात- 'भ्रमाचें सत्त्वाभावमात्र' येथें निर्णय कसा काय? अशी आशंका असतां सांगतात- 'कारण (व्याख्यानांत) रूपनिषेधाचें' कारण अप्रसक्त शून्याचा निषेध करणें असंभव आहे असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचें उत्थापन करितात- 'पण भ्रमाला?' विद्योदयानंतर असें दिसतें असत्व अंगीकार केलें तें असंगत आहे कारण पुढें असत्त्व असतां पूर्वीं दिसलें असत्त्व प्राप्त होतें तसें पूर्वीं सत्त्व असतां कदा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

असत्व सांगितलें जात असेल तर स्फुटाळ सांगावे. तसेंच बाधक ज्ञान 'हें रजत नव्हे' अशा रीतीनें विशिष्ट देशकाळ संबद्ध रजताला विशेषित करीत नच उदयाला येतें. त्याला देशकालान्तराशीं सं-

॥ विवरण ॥

भंगवाद्यांना सर्व वस्तु स्वकाळी वर्तमान असतांही विनाशाच्या नंतर शून्य च आहेत. असें संमत असल्यामुळें दोष नाहीं असें सांगतात- 'स्फुटाळ सांगावे.' पण सर्व वस्तूला विनाशाच्या नंतर शून्यता असो. विभ्रमानें गृहीत वस्तु तर बाधा-च्या नंतर शून्य होत नाही. परंतु ती देशान्तरादिगत असते? असें असेल तर तेथें काय बाधक ज्ञान च रजतादि-कांचें देशान्तरीं सत्व जाणवितें? किंवा येथें बाधाची अनुपपत्ती! बाधक ज्ञान तर नव्हे असें सांगतात- 'तसेंच बाधक ज्ञान.' विधोदयानंतर [illegible] निरुपाख्यता येते तसें बाधक ज्ञान प्रवृत्त होतें असा 'तसें' शब्दाचा अर्थ. कारण 'हें रजत नव्हे' परंतु देशकालान्तरीं रजत किंवा बुद्धींत रजत' असें कळत नाहीं असा भाव. [illegible] त्याचा [illegible]

तत्व दी. १५८।१२१ (= ज्ञप्य रीतीनें) दृश्य रीतीनें

वृ वाक्यहि

॥ विवरणव्याख्यान ॥

मिथ्या ही असल्याचा असंभव आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'सर्ववाद्यांना'. नष्ट व बाध्यांत विशेष आहे. अशी शंका येते- 'पण सर्व वस्तूला.' कारण निरुपाख्यत्व (शून्यत्व) असतां प्रतीत असल्याचा असंभव आहे असें जाणावें. व्यवसिकांतीनंतर स्फुरणाच्या प्रवाहादिकानें पूर्णत्व असल्या-मुळें उत्तरकाळीं कोणतेंही सत्व नसतें असा अर्थ. त्याहून वैषम्य सांगतात- 'विभ्रमानें गृहीत वस्तु तर'. इतरेतराभाव (भेद) ज्ञानाला बाध

कात्व असल्यामुळें त्यानें इतरेतराभाव (ऐक्य) बाधित केल्या जातो ऐक्य नव्हे. दोघांचा निषेध असतां कल्पना गौरव येतो असा अर्थ. पुढें सत्वाचा असंभव असल्यामुळें तुच्छत्व आहे? अशी आशंका असतां अन्यत्र सत्वामुळें शून्यत्व नाहीं असें सांगतो- 'परंतु ती.' प्रमाणाच्या अभावामुळें तेथें अन्यत्र ही सत्व नसतें असें सांगतात- 'तेथें काय.' बाधक बोधानें देशान्तरी सत्ता कळते असें म्हणणाऱ्या प्रत 'कारण तसें कळत नाहीं' असें हेतूचें उद्धरण अयुक्त आहे? अशी आशंका असतां काय अपरोक्ष बाधक बोधानें देशान्तरी सत्व कळतें असें म्हणतोस? किंवा शब्दापासून होणाऱ्या बाधकबोधावरून? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितात- 'कारण हें रजत नव्हे' 'रजत पुढें सत् नाहीं परंतु देशान्तरादिकांत आहे' असा आकाराची बुद्धिवृत्ति दिसत नसल्यामुळें असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचा निराकरण करितात- 'शब्द ही' पण 'सामर्थ्य नाहीं' हें कसें? कारण.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान ॥

संयाळा प्राप्त करीत नाही. कारण तसें करून नाहि. तसेंच दूर असलेल्या रज्जूला सर्प मानणारा त्या-स्याभिकरनाति भाग्हायें 'हा सर्प नव्हे' असें सांगितले असता सर्पाभावमात्राला जाणतो. त्याच्या

॥ विवरण ॥

जेवढा अर्थ सांगण्याचे सामर्थ्य असेल तेवढ्या अर्थाला प्रतिपादन करील. असा सांगितलेले देशान्तरवर्तित्व तर

दृ. तत्वदी. २५५।३

वाक्यार्थ नव्हे. असें सांगतात— 'तसेंच' रज्जूला सर्परूपाने ग्रहण करण्यांत विशेषाचे अग्रहण हेतु आहे असें सांगतात— 'दूर' पण रज्जूला सर्परूपाने ग्रहण करून 'हा सु' अशारीतीने ओरडणाऱ्या मनुष्याळा पाहून कृपेच्या योगाने कोणी बोलला 'भिऊं नको असा हा सर्प नाही' तेव्हां त्याच्या वचनावरून तो सर्पाच्या नास्तितेला जाणून स्वस्थ होतो. अशारीतीने सर्पाभावाच्या अधिकच्छन्त्वाने त्याला पुढील प्रवृत्तिरूप प्रतीति होते. म्हणून 'सर्पाभावमात्राला जाणतो' असें कसें म्हटलें? अशी आशंका असता सांगतात- 'त्याच्या देशान्तरस्थितीला' काय देशान्तरवर्तित्व पदांच्या अर्थ आहे? किंवा वाक्यार्थ? पहिला पक्ष नाही कारण त्याच्या वाचक पदाचा अभाव आहे. असें चित्तांत धारण करून दुसऱ्याचा निरास

॥ विवरणव्याख्यान ॥

